नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com




* वर्ष ५२ * अंक १२६ * * अकोला * रविवार, दिनांक ०९ नोव्हेंबर २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## थोडक्यात..

### अमेरिका भारताला देणार ११३ तेजस मार्क इंजिन



**नवी दिल्ली :** हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेडने अमेरिकन कंपनी जनरल इलेक्ट्रिकसोबत अंदाजे ८८७० कोटीचा करार केला ज्या अंतर्गत जीई भारताला ११३ जेट इंजिन आणि सपोर्ट पॅकेजेस पुरवेल. ही इंजिने ९७ मार्क-१ए हलक्या लढाऊ विमानांमध्ये (तेजस लढाऊ विमाने) बसवली जातील. ही इंजिने २०२७ ते २०३२ दरम्यान वितरित केली जातील.

### शपथविधीला येईन : मोदी



**बेतिया :** बेतिया येथील एका सभेत पंतप्रधान मोदी म्हणाले, बेतिया ही माझ्या बिहार निवडणूक प्रचाराची शेवटची सभा आहे.
११ नोव्हेंबर रोजी आपण केवळ जागा जिंकू नयेत, तर प्रत्येक बूथ जिंकला पाहिजे. मी विजयाच्या आत्मविश्वासाने निघत आहे. आता मी एनडीएच्या शपथविधी सोहळ्याला येईन.

जंगलराजचा पराभव करणे म्हणजे फक्त काँग्रेस आणि राजदचा पराभव करणे असे नाही. आपल्याला ही मानसिकता देखील पराभूत करावी लागेल. जंगलराज कुटुंब हे बिहारमधील सर्वात भ्रष्ट कुटुंब आहे; दिल्लीचा नामदार हा देशातील सर्वात भ्रष्ट आहे. या लोकांनी लाखो कोटींचे घोटाळे केले आहेत.

### २ दहशतवादी ठार

**श्रीनगर :** जम्मू आणि काश्मीरमधील कुपवाडा जिल्ह्यातील केरन सेक्टरमध्ये शनिवारी सुरक्षा दलांनी दोन दहशतवाद्यांना ठार केले. नियंत्रण रेषेवरून (एलओसी) घुसखोरी होत असल्याची गुप्त माहिती मिळाल्यानंतर भारतीय लष्कराने शुक्रवारी दहशतवाद्यांवर शोध मोहीम सुरू केली.

भारतीय लष्कराच्या चिनार कॉर्प्स या युनिटने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म वर म्हटले आहे की, शोध मोहिमेदरम्यान दहशतवाद्यांनी अंदाधुंद गोळीबार केला. सुरक्षा दलांनी प्रत्युत्तर देत दोन दहशतवाद्यांना ठार केले.

## रजिस्ट्री रद्द झाली असली तरी

# केसेस हटणार नाहीत!

### पार्थ पवार जमीन गैरव्यवहार प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची स्पष्टोक्ती

**महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८ :**
अजित पवार यांच्या कुटुंबाशी संबंधित जमीन व्यवहार प्रकरणाने मोठं वादळ निर्माण केलं आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीकडून १८०० कोटी रुपये किंमतीची जमीन केवळ ३०० कोटींमध्ये खरेदी करण्यात आली.
या व्यवहारामुळे शासनाची सुमारे १५२ कोटी रुपयांची फसवणूक झाल्याचा आरोप आहे. यावर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. अहवालात जो कोणी दोषी आढळून येईल त्यावर कारवाई होईल, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

फडणवीस म्हणाले, जी माहिती आहे त्यानुसार हा जो काही करार त्यांनी केला होता, त्यात पैशांची देवाण-घेवाण बाकी होती. परंतु, रजिस्ट्री झाली होती. दोन्ही पक्षांनी रजिस्ट्री रद्द करावी, असा अर्ज केला आहे. त्या अर्जाच्या अनुषंगाने त्यांना जे पैसे भरायचे असतात, कारण रजिस्ट्री रद्द करायची असेल तरी पैसे भरावे लागतात. त्यामुळे तशी नोटीस त्यांना पाठवण्यात आली आहे. त्यामुळे पुढची कारवाई जी होणार आहे ती होईल. तरी देखील जी काही क्रिमिनल केस दाखल झालेली आहे ती याने संपणार नाही.



त्या संदर्भातल्या ज्या काही अनियमितता आहेत, त्याला जो कोणी जबाबदार असेल त्याच्यावर पुढची कारवाई होईल, अशी माहिती फडणवीस यांनी दिली आहे.

**कोणालाही सोडले जाणार नाही**

पुढे बोलताना फडणवीस म्हणाले, यासोबतच आम्ही एक समिती स्थापन केली असून एक महिन्यात अहवाल मागवला आहे. याची किती व्याप्ती आहे, यात कोण कोण आहे याची माहिती घेतली जाणार आहे.

या संदर्भात पोलिसांनी देखील कारवाई केली असून दोघांना अटक करण्यात आले आहे. सगळ्या प्रकारची चौकशी केली जाणार आहे, यात कोणालाही सोडले जाणार नाही. जो काही घटनाक्रम समोर येत आहे, त्याच्या तळाशी पोलिस जाण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे याची संपूर्ण माहिती आल्यावरच यावर भाष्य करणे योग्य राहील, असे फडणवीस म्हणाले.

फडणवीस यांनी अभय दिले असल्याचे बोलले जात आहे. यावर पत्रकारांनी प्रश्न विचारला असता देवेंद्र फडणवीस म्हणाले, ज्यांना एफआयआर काय असतो हे समजत नाही, असेच लोक अशा प्रकारचा आरोप करू शकतात. एफआयआर दाखल करत असताना ज्या एक्सप्रेस पार्टीज असतात त्यांच्यावर गुन्हा दाखल होतो. यात जी कंपनी आहे, या कंपनीचे जे अधिकृत सिग्नेटरीज आहेत त्यांच्यावरच गुन्हा दाखल होऊ शकतो. पण लक्षात घेतले पाहिजे, ज्यावेळेस एखादा एफआयआर होतो त्यावेळेस ज्यांनी सही केले ते, ज्यांनी विक्री केली ते, ज्यांनी फेरफार केला ते, ज्यांनी चुकीचे रजिस्ट्रेशन केले ते, अशा सगळ्यांवर हा एफआयआर दाखल केलेला आहे.

अहवाल येऊ द्या, अहवालात जो कोणी दोषी असेल, जो कोणी आणि माज्या या मताशी किमान अजित पवार सुद्धा सहमत असतील की या अहवालात कोणीही दोषी आढळला तर कारवाई होईल, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

# रेल्वे सेवेत नवा अध्याय

### चार नवीन वंदे भारत एक्सप्रेस ट्रेन्सचा शुभारंभ





**वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ८ :**
भारताच्या रेल्वे सेवांमध्ये एक महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक टप्पा शनिवार, ४ नोव्हेंबर रोजी जोडला गेला, जेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वाराणसी येथून एकाच वेळी चार नवीन वंदे भारत एक्सप्रेस ट्रेन्सचा शुभारंभ केला. या अत्याधुनिक ट्रेन्सच्या प्रारंभामुळे भारताच्या रेल्वे नेटवर्कमध्ये नवा उच्चांक गाठला आहे. वंदे भारत एक्सप्रेसला आता देशभरातील प्रमुख रूट्सवर धावण्याची संधी मिळाली असून, त्याच्या माध्यमातून प्रवाशांना अधिक आरामदायक, वेगवान आणि आधुनिक प्रवास अनुभवता येईल.

या चार नवीन वंदे भारत ट्रेन्सच्या सुरूवातीसह भारतात वंदे भारत एक्सप्रेस ट्रेनच्या संचाची संख्या १६४ पर्यंत पोहोचली आहे, जे देशातील रेल्वे सेवांच्या आधुनिकीकरणाची दिशा स्पष्ट करते.

नवीन वंदे भारत एक्सप्रेस ट्रेन्सचे मार्ग विविध ऐतिहासिक, धार्मिक आणि व्यवसायिक केंद्रांना जोडतात. प्रत्येक ट्रेण हा त्याच्या मार्गावर आणि सुविधा म्हणून अनोखा आहे. पंतप्रधान मोदी यांनी या कार्यक्रमादरम्यान, 'मेक इन इंडिया' या अभियानाच्या अंमलबजावणीचे कौतुक करत या ट्रेन्सच्या विकासामध्ये भारतीय इंजिनियरिंगचा उत्कृष्टतेला वाव दिल्याचे सांगितले. चेन्नईतील इंटीग्रल कोच फैक्ट्रीने या ट्रेन्सची निर्मिती केली आहे, ज्यामुळे रेल्वेच्या आधुनिकीकरणाची प्रक्रिया गतीमान होईल.नवीन वंदे भारत एक्सप्रेस ट्रेन्सने पंढरपूर, खजुराहो, सहारनपूर आणि बेंगलुरु या प्रमुख ठिकाणांवर प्रवास करणा?या नागरिकांना आनंददायी आणि कार्यक्षम प्रवासाची संधी दिली आहे.

## १ ते १९ डिसेंबरपर्यंत संसदेचे हिवाळी अधिवेशन

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ८ :**
संसदेचे हिवाळी अधिवेशन १ डिसेंबर २०२५ रोजी सुरू होईल आणि १९ डिसेंबर २०२५ पर्यंत चालेल. संपूर्ण अधिवेशनात १५ बैठका होतील, अशी घोषणा केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी शनिवारी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर केली.

रिजिजू म्हणाले, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी १ डिसेंबरपासून हिवाळी अधिवेशन घेण्याच्या सरकारच्या प्रस्तावाला मान्यता दिली आहे. आपल्या लोकशाहीला बळकटी देणाऱ्या आणि लोकांच्या आकांक्षा पूर्ण करणाऱ्या फलदायी अधिवेशनाची आम्हाला अपेक्षा आहे. हे लक्षात घ्यावे की संसदेचे मागील पावसाळी अधिवेशन २१ जुलै ते २१ ऑगस्ट पर्यंत चालले होते. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी राज्यसभेचे तत्कालीन उपसभापती जगदीप धनखड यांनी राजीनामा दिला. त्यानंतर ऑपरेशन सिंदूर आणि बिहारमधील एसआयआरवर चर्चा करण्याच्या मागणीसाठी विरोधकांच्या निदर्शनांमुळे संपूर्ण अधिवेशन विस्कळीत झाले.
या अधिवेशनात एकूण २१ बैठका झाल्या. लोकसभेत १२० तास चर्चा करण्याचे नियोजन होते, परंतु त्यासाठी फक्त ३७ तासच वेळ देण्यात आला. राज्यसभेत फक्त ४१ तास चर्चा झाली. लोकसभेत बारा आणि राज्यसभेत १५ विधेयके मंजूर झाली. सर्वात जास्त चर्चेत आलेले विधेयक म्हणजे घटनादुरुस्ती विधेयक, जे अटकेत असलेले पंतप्रधान, मुख्यमंत्री आणि मंत्र्यांना काढून टाकेल. ते जेपीसीकडे पाठवण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

## तिर्थयात्रेसाठी जाणाऱ्या दोन तरुणांचा अपघातात मृत्यू

**महासागर प्रतिनिधी, सावनेर, दि. ८ :**
तीर्थयात्रेसाठी जामसावळीला जाणाऱ्या दोन तरुणांचा रस्ता अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. केळवद पोलिस स्टेशन परिसरातील टोल बूथजवळ हा अपघात झाला. मृतांची ओळख पटली आहे डिंकल कचरू वोटरे आणि चंद्रशेखर श्यामराव नवरेती. दोघेही मेकॅनिक म्हणून काम करत होते. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे आणि अधिक तपास सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आज पहाटे ५ वाजताच्या सुमारास हे दोघेही जामसावळीला सकाळच्या आरतीला उपस्थित राहण्यासाठी त्यांच्या दुचाकीवरून जात होते. केळवद टोल बूथजवळ विरुद्ध दिशेने येणाऱ्या एका भरधाव कारने त्यांच्या दुचाकीला धडक दिली.

धडक इतकी भीषण होती की दोघांचाही जागीच मृत्यू झाला. कारमध्ये दोन जण होते, त्यापैकी एक विवेक कमलाकर बाजुरकर गंभीर जखमी झाला. विवेकने छिंदवाडा येथून कार बुक केली होती आणि तो त्याच्या वडिलांच्या अंत्यसंस्कारासाठी भिवापूरला जात होता. अपघातानंतर कार चालक घटनास्थळावरून पळून गेला. माहिती मिळताच केळवद पोलिस स्टेशनचे प्रभारी आशिष ठाकूर पोलिस पथकासह घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी दोन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवले आणि जखमी विवेकला उपचारासाठी दाखल केले. पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे आणि फरार कार चालकाचा शोध घेण्यासाठी एक पथक छिंदवाडा येथे रवाना करण्यात आले आहे. तपास सुरू आहे.



# आज गली गली नागपूर सजायेंगे... राम आएंगे..

**महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८ :**
खासदार सांस्कृतिक महोत्सवाचा पहिला दिवस राममय झाल्यानंतर आज दुसऱ्या दिवशी तरुणाईचा लाडका गायक विशाल मिश्रा ने आज गली गली नागपूर सजायेंगेराम आएंगे हे गीत सादर करून नागपूरकरांचे 'मन ' जिंकले.
खासदार सांस्कृतिक महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी शनिवारी हनुमाननगरातील क्रीडा चौक येथील ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या पटांगणावर विशाल मिश्रा यांची लाइव्ह इन कॉन्सर्ट पार पडली.
मी लहान घरातून मोठे स्वप्न बघत आलो. मी तुमच्यातलाच आहे तुमच्यासाठी आहे.. मी तुमच्यावर खूप प्रेम करतो, माझा प्रत्येक शब्द, स्वर तुमच्यासाठी आहे, आयुष्यभर राहील, असे म्हणत विशाल मंचावरून खाली उतरला तेव्हा छोटया मुलांनी त्याचे भोवती गराडा घातला.
तू पहला पहला प्यार है मेरा, तुम हो तो सब आसान, कोई इतना खुबसुरत कैसे हो सकता है, मैं चाहू तुझको बेपनाह, क्या मुझे प्यार है, तेरे दिल पे हक मेरा है अशी गाणी सादर करून तरुणाईच्या हृदयाला हात घातला. आयुष्यभर तुमच्यासाठी असेच गाणे तयार करत राहील.






कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, नितीन गडकरी, आशिष जयस्वाल, आमदार प्रवीण दटके, सुलेखाताई कुंभारे, व महोत्सव समितीचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमांना नागपूरकरांचा मिळत असलेला वाढता प्रतिसाद हीच या महोत्सवाच्या यशाची पावती आहे. पण जागेअभावी बऱ्याच लोकांना महोत्सवातील कार्यक्रमाचा आस्वाद घेता येत नाही. त्यामुळे भविष्यात एक लाख क्षमता असलेले स्टेडियम नागपुरात तयार व्हावे, अशी अपेक्षा नितीन गडकरी यांनी व्यक्त केली.

स्थानिक आणि विदर्भातील कलावंतांना मंच देणारा आणि राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय दर्जाचे कलावंतांची कला बघण्याची संधी देणार खासदार सांस्कृतिक महोत्सव हा शहराला मिळालेला सुंदर उपहार आहे, असे म्हणत फडणवीस यांनी नितीन गडकरी यांचे अभिनंदन केले.

प्रा. अनिल सोले यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन बाळ कुलकर्णी व रेणुका देशकर यांनी केले. महोत्सवाच्या यशस्वितेसाठी उपाध्यक्ष डॉ. गौरीशंकर पाराशर, अशोक मानकर, दिलीप जाधव, सचिव जयप्रकाश गुप्ता, कोषाध्यक्ष प्रा. राजेश बागडी, सदस्य बाळासाहेब कुलकर्णी, हाजी अब?दुल कदीर, सारंग गडकरी, अविनाश घुशे, डॉ. दीपक खिरवडकर, संदीप गवई, संजय गुळकरी, रेणुका देशकर, गुड्डू त्रिवेदी, किशोर पाटील, चेतन कायरकर, आशिष वांदिले यांच्यासह अनेकांनी परिश्रम घेतले.

## लष्करी क्षेपणास्त्राचे टार्गेट चुकले...

**वृत्तसंस्था, जैसलमेर, दि. ८ :**
जैसलमेरमध्ये लष्करी सरावादरम्यान एक क्षेपणास्त्र चुकून बाहेर पडले. क्षेपणास्त्र आपले लक्ष्य चुकवून रेंजजवळील भदरिया गावाजवळ पडले.
क्षेपणास्त्र पडताच एक मोठा स्फोट झाला, ज्यामुळे आजूबाजूच्या गावांमध्ये भीतीचे वातावरण पसरले. कोणतीही जीवितहानी झालेली नाही. शनिवारी दुपारी ४ वाजता पोखरण फील्ड फायरिंग रेंजमध्ये ही घटना घडली. माहिती मिळताच स्थानिक पोलिस घटनास्थळी पोहोचले.

# मराठा समाज विखुरलेला नको

**महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. ८ :**
महाराष्ट्रात मराठा समाज मोठ्या संख्येत आहे. हा समाज पाटील, देशमुख, कुणबी, घाटोळे, 96 कुळी, अशा वेगवेगळ्या घटकांमध्ये विखुरलेला आहे. तो एकत्रित असला पाहिजे. त्यांनी एकमेकांना आपल्या नात्यागोत्यात सामावून घेतले पाहिजे. असे विचार भारताचे माजी कृषिमंत्री माननीय शरदचंद्रजी पवार यांनी व्यक्त केले.

कान्हेरी सरप येथील वेद नंदिनी ॲग्रो टुरिझम मध्ये आज संपन्न झालेल्या व किसान ब्रिगेडचे संस्थापक अध्यक्ष शेतकरी नेते प्रकाश पोहरे यांनी आयोजित केलेल्या शेतकरी संवाद कार्यक्रमात पाटील समाजाचे सचिव प्रदीप खाडे यांनी विचारलेल्या प्रश्नावर आपले मत व्यक्त करताना ते बोलत होते. सकल मराठा समाजातील पाटील, कुणबी, देशमुख, घाटोळे आदी घटकांच्या एकत्रिकणा बाबत आपले मत काय? असा तो प्रश्न होता.

यावर आपले विचार मांडताना मा. शरदचंद्र पवार म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात 18 पगड जाती होत्या. त्या सर्वांना सोबत घेऊन त्यांनी रयतेचे राज्य निर्माण केले होते. त्यात मराठा समाजही एकत्रितपणे सहभागी होता. माज्याही नातेसंबंधात मराठा समाजातील सर्वच घटक सहभागी आहेत. समाजाच्या एकत्रीकरणामुळे सर्वच आघाड्यावर त्यांची प्रगती होऊ शकते. असेही मत त्यांनी याप्रसंगी व्यक्त केले.

याप्रसंगी शेतकरी नेते प्रकाश पोहरे, माजी गृहमंत्री अनिल देशमुख, शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री हर्षवर्धन देशमुख, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ. संतोष कोरपे, माजी मंत्री खान मोहम्मद अझहर हुसेन, माजी आमदार शरद तसरे, गजाननराव दाळू गुरुजी, लक्ष्मणराव तायडे, ऋषी भाऊ पोहरे,कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिरीष धोत्रे, महादेवराव भुईभार, संग्राम गावंडे, माजी सभापती राजीव बोचे, भाई प्रदीप देशमुख, किसान ब्रिगेडचे राज्याध्यक्ष पुरुषोत्तम गावंडे, जिल्हाध्यक्ष दिवाकर गावंडे, डॉक्टर सुभाष कोरपे, प्रदीप खाडे, शरद वानखडे, अविनाश पाटील, देवराव हागे पाटील, दिनकर सरप,संदीप महल्ले पाटील व इतरही नेते प्रामुख्याने उपस्थित होते कार्यक्रमाचे संचालन धनंजय मिश्रा यांनी केले. यावेळी शेतकरी उपस्थित होते.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार यांचा कथित भूखंड घोटाळा हा एक गंभीर विषय असल्याचे म्हटले आहे. पार्थ पवारांचे प्रकरण एक गंभीर विषय आहे. स्वतः मुख्यमंत्री फडणवीस यांनी असे जाहीरपणे सांगितले आहे. मुख्यमंत्री एखादा विषय गंभीर असल्याचे सांगत असतील, तर त्यासंबंधी चौकशी करून वास्तव स्थिती समाजापुढे ठेवली पाहिजे, असे ते म्हणालेत.
शरद पवार म्हणाले, सरकारने कालच या प्रकरणी एक समिती स्थापन केली आहे. समिती अहवाल सरकारला सादर करेल. हा अहवाल प्राप्त झाल्यानंतर काय होते ते पाहू. पण राज्यात भाजप व त्यांच्या मित्रपक्षांचे सरकार आहे. काय कारवाई करायचे ते करतील, असेही ते म्हणाले.

# सहा महिन्याचं बाळ सोडून गेलेल्या मातेची बारा वर्षानंतर भेट

**अरूण कराळे, वाडी, दि. ८ :**
माझी आई आता नाही... या समजुतीत जगणाऱ्या बांगलादेशातील कुटुंबाला अखेर बारा वर्षांनंतर त्यांच्या आईचा आवाज पुन्हा ऐकायला मिळाला. सहा महिन्याचं बाळ सोडून घरून निघालेली शांतोना बेगम आज आपल्या मायदेशी सुखरूप परतली आहे. या मानवतेच्या कार्यामागे आहे दत्तवाडी येथील मानव विकास संस्थेचे संचालक राजाभाऊ जोध यांची अथक मेहनत आणि संवेदनशीलता.

२०१७ मध्ये नागपूरच्या सोनेगाव परिसरात रस्त्यावर भटकताना पोलिसांना शांतोना बेगम आढळून आली. न्यायालयीन आदेशानुसार तिला प्रादेशिक मनोरुग्णालय, नागपूर येथे मानसिक उपचाराकरिता दाखल करण्यात आले. सात वर्षे (२०१७ ते २०२४) तिच्यावर उपचार सुरू राहिले. सुरुवातीला ती स्वतःशी बोलणे, एकटी राहणे आणि विचारात गढून जाणे अशी लक्षणे दर्शवत होती. परंतु

### मानवतेचा विजय ■ राजाभाऊ जोध यांच्या वर्षभराच्या प्रयत्नांना यश

## बांगलादेशातील शांतोना बेगम अखेर घरी परतली

सातत्याने केलेले समुपदेशन आणि औषधोपचारांमुळे तिच्या मानसिक स्थितीत हळूहळू सुधारणा झाली.
यानंतर पुनर्वसनासाठी तिला मानव विकास प्रशिक्षण व पुनर्वसन केंद्र, खापा घुडन (ता. नरखेड) येथे दाखल करण्यात आले. येथे तिला घरचं वातावरण मिळालं. तिचा एक हात नीट चालत नसतानाही प्रशिक्षकांनी तिचं कौशल्य ओळखून तिला पायदान तयार करणे, दिवे रंगवणे,



ज्वेलरी मेकिंग आणि स्वच्छता कार्य अशा कौशल्यांमध्ये प्रशिक्षित केले.
नियमित समुपदेशनादरम्यान तीने आपला पत्ता बांगलादेश येथील असल्याचे सांगितले.
नंतर ईश्वर संकल्प संस्थेच्या माध्यमातून त्या पत्त्यावर चौकशी केली असता तिचं मूळ गाव व कुटुंबीयांचा शोध लागला. व्हिडिओ कॉलद्वारे तिचा कुटुंबाशी संपर्क झाला आणि सर्वजण भावनावश झाले. त्यांना वाटत होतं की ती आता या जगात नाही, पण बारा वर्षांनी आई-मुलाची भेट घडल्याने सर्वत्र आनंदाचा माहोल निर्माण झाला.

राजाभाऊ जोध यांनी पुढाकार घेऊन सोनेगाव पोलीस स्टेशन, नागपूर पोलीस आयुक्तालय, तसेच बांगलादेश हाय कमिशन यांच्याशी सतत पत्रव्यवहार करून सर्व प्रक्रिया पूर्ण केल्या. एका वर्षाच्या प्रयत्नांनंतर, अखेरीस शांतोना बेगमला बांगलादेश सीमारेषेवर तिच्या कुटुंबीयांच्या स्वाधीन करण्यात आले. या माणुसकीच्या कार्यामुळे नागपूरभर राजाभाऊ जोध संपूर्ण मानव विकास संस्थेचे निखील बागडे, पल्लवी धांडे, वैशाली काळमेघ रेतिक एवनते, यश रवी दंढरे, रतन लाल यांचं कौतुक होत आहे. एका हरवलेल्या आईला तिच्या मुलाशी पुन्हा एकत्र आणणे हीच खरी मानवतेची जिंकलेली लढाई ठरली.

## स्थानिक स्वराज्य निवडणुकांत व्हीव्हीपॅटचा मुद्दा न्यायालयात
# आयोगाला उच्च न्यायालयाची नोटीस

■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ८ :

राज्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर आता न्यायालयीन निर्णयाचा परिणाम होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. ईव्हीएम यंत्रणेसोबत व्हीव्हीपॅट बसविण्याची मागणी करणाऱ्या काँग्रेस नेते प्रफुल्ल गुडधे यांनी दाखल केलेल्या याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने राज्य निवडणूक आयोगाला नोटीस बजावली आहे. न्यायालयाने आयोगाला 18 नोव्हेंबरपर्यंत उत्तर दाखल करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे निवडणुकीपूर्वीच मतदान प्रक्रियेबाबतचा हा वाद तापण्याची शक्यता आहे.




राज्य निवडणूक आयोगाने नुकताच निर्णय घेतला होता की, येणाऱ्या स्थानिक स्वराज्य निवडणुकीत व्हीव्हीपॅट यंत्रणांचा वापर केला जाणार नाही. या निर्णयाला आव्हान देत प्रफुल्ल गुडधे यांनी याचिका दाखल केली. त्यांच्या याचिकेत म्हटलं आहे की, मतदाराला स्वतःचं मत कोणत्या उमेदवाराला दिलं गेलं हे व्हीव्हीपॅटद्वारे स्पष्ट दिसतं, त्यामुळे ही यंत्रणा पारदर्शकतेसाठी आवश्यक आहे. जर व्हीव्हीपॅट वापरणं शक्य नसेल, तर आयोगाने मतपत्रिकांद्वारे मतदान घेण्याचा पर्याय स्वीकारावा, अशीही मागणी त्यांनी केली आहे. यावर सुनावणी करताना न्यायमूर्ती अनिल किलोर यांच्या खंडपीठाने आयोगाकडून स्पष्टीकरण मागवले आहे. दरम्यान, न्यायालयाने स्पष्ट केलं आहे की निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि मतदारांचा विश्वास अबाधित ठेवणं अत्यावश्यक आहे. त्यामुळे आयोगाने घेतलेल्या निर्णयामागील कारणे न्यायालयासमोर मांडावी लागतील. याचिकाकर्त्यांनी सांगितले आहे की, व्हीव्हीपॅट यंत्रणेमुळे मतदारांचा विश्वास वाढतो, कारण त्यांना त्यांच्या मताची नोंद योग्य उमेदवाराकडे गेल्याचं प्रत्यक्ष दिसून येतं. देशातील संसदीय आणि विधानसभा निवडणुकांमध्ये व्हीव्हीपॅटचा वापर होत असताना, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मात्र तो वापरला जात नाही, हे योग्य नाही, असेही गुडधे यांनी न्यायालयासमोर मांडले आहे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाला असून, 2 डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. 246 नगरपालिका आणि 18 नगरपंचायतींसाठी निवडणुका पार पडणार आहेत. 3 डिसेंबर रोजी निकाल जाहीर होईल. दरम्यान, उमेदवारांच्या अर्ज भरण्याची प्रक्रिया 10 नोव्हेंबरपासून सुरू होणार आहे. या पार्श्वभूमीवर, न्यायालयाने दिलेल्या नोटिशीमुळे निवडणूक आयोगावर दडपण वाढलं आहे. आयोग आता व्हीव्हीपॅटच्या वापराबाबत कोणती भूमिका घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

या प्रकरणामुळे निवडणुकीपूर्वी राजकीय वातावरण आणखी तापण्याची शक्यता आहे. काँग्रेसने या मुद्द्यावर सरकार आणि निवडणूक आयोगावर निशाणा साधला आहे, तर आयोगाकडून तांत्रिक आणि व्यवस्थापकीय कारणे देत व्हीव्हीपॅट न वापरण्याचा निर्णय योग्य असल्याचं सांगितलं जात आहे. मात्र, न्यायालयात 18 नोव्हेंबरपर्यंत आयोगाने दिलेलं उत्तरच या प्रश्नावर अंतिम दिशानिर्देश देईल. व्हीव्हीपॅटचा वापर होणार का किंवा मतदान मतपत्रिकांद्वारेच घ्यावं लागेल का, याचा निर्णय आगामी काही दिवसांत स्पष्ट होईल आणि त्यावरच राज्यातील स्थानिक स्वराज्य निवडणुकांचा पुढील मार्ग अवलंबून असेल.

## लाडकी बहीण ई-केवायसीसाठी मुदतवाढ


■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८ :

राज्यातील महिलांसाठी सुरू करण्यात आलेल्या लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना सरकारकडून मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. या योजनेत महिलांना दरमहा आर्थिक सहाय्य दिले जाते. मात्र पुढचा हप्ता मिळवण्यासाठी लाभार्थ्यांनी आपले ई-केवायसी पूर्ण करणे आवश्यक आहे. सरकारने या प्रक्रियेची अंतिम तारीख 18 नोव्हेंबर निश्चित केली आहे. परंतु आतापर्यंत केवळ 80 लाख महिलांनीच केवायसी पूर्ण केली, अशी माहिती मिळाली आहे. अजून लाखो महिला या प्रक्रियेत सहभागी झालेल्या नाहीत, त्यामुळे अनेकांकडून केवायसीची मुदतवाढ मागणी होत आहे. दरम्यान, महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी या संदर्भात महत्त्वाचे विधान केले आहे. त्यांनी सांगितले की, आतापर्यंत सुमारे 80 लाख महिलांचे ई-केवायसी पूर्ण झाले आहे. 18 नोव्हेंबरपर्यंत आणखी लाभार्थ्यांचे केवायसी पूर्ण होतील, अशी अपेक्षा आहे. मात्र जर सर्वांनी प्रक्रियेत भाग घेतला नाही, तर परिस्थिती पाहून सरकार योग्य निर्णय घेईल. त्यांच्या या वक्तव्यानंतर केवायसीची मुदतवाढ होण्याची शक्यता अधिक बळावली आहे.

महिलांच्या सुविधेसाठी सरकारने केवायसी प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने सुरू केली आहे. लाभार्थ्यांना संकेतस्थळावर जाऊन आवश्यक माहिती भरून केवायसी करावी लागते. मात्र, अनेक महिलांना या प्रक्रियेत अडचणी येत आहेत. काहीवेळा वेबसाइट लोड होत नाही, तर काही वेळा ओटीपी मिळत नाही.

## पार्थ पवारांच्या वादग्रस्त जमीन व्यवहारातील
# शीतल तेजवानी फरार

■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ८ :



पुण्यातील कोरेगाव पार्क परिसरातील 40 एकर शासकीय जमिनीच्या वादग्रस्त व्यवहाराने राज्याच्या राजकारणात मोठे वादंग निर्माण केले आहे. या प्रकरणात उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार आणि त्यांचे मामेभाऊ दिग्विजय पाटील हे भागीदार असल्याचे समोर आले आहे. अमेडिया प्रायव्हेट लिमिटेड, या कंपनीमार्फत हा व्यवहार करण्यात आला असून, यात शासकीय नियमांचे उल्लंघन आणि मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे आरोप आहेत. सहजिल्हा निबंधक संतोष हिंगाणे यांनी बावधन पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, या प्रकरणात जमीन विक्रेती शीतल तेजवानी, अमेडिया कंपनीचे भागीदार दिग्विजय पाटील आणि सह-दुय्यम निबंधक रवींद्र तारु यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, या प्रकरणातील मुख्य संशयित शीतल तेजवानी सध्या फरार असल्याची माहिती समोर आली आहे. शीतल तेजवानीविरुद्ध दोन गुन्हे दाखल असून, तिचा मोबाईल फोन बंद आहे. ती आपल्या पतीसह देशाबाहेर पळून गेल्याचा पोलिसांना संशय आहे. बावधन पोलिसांनी तिच्या परदेश प्रवासाबाबत इमिग्रेशन विभागाकडून माहिती मागवली आहे. शीतल तेजवानीचा गुन्हेगारी इतिहास मोठा असून, यापूर्वी तिने सेवा विकास बँकेला 41 कोटींचा फटका दिला होता. तिचा पती सागर सुर्यवंशीसोबत तिने बनावट कागदपत्रांच्या आधारे दहा कर्जे घेतली आणि त्यांचा गैरवापर केल्याचे उघड झाले होते. या प्रकरणात ईडीने त्यांच्यावर कारवाई करत सुमारे 45 कोटी रुपयांची मालमत्ता जप्त केली होती.

शीतल तेजवानी आणि तिचा पती सागर सूर्यवंशी यांच्या विरोधात 2019 मध्ये सहकार विभागाने ऑडिट अहवालाद्वारे अनियमिततेचा पदार्फाश केला होता. त्यानंतर 2021 मध्ये सागर सूर्यवंशीला सीआयडी आणि पिंपरी चिंचवड पोलिसांनी अटक केली होती. त्यावर जामिनावर सुटताच 2023 मध्ये ईडीने पुन्हा त्याला अटक केली. या सर्व घटनांनंतरही शीतल तेजवानीने पुण्यातील सरकारी जमीन व्यवहारात सहभाग घेतल्याने अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.

# कोल्हापुरात ऊस दर आंदोलन चिघळले : स्वाभिमानी शेतकरी संघटना आक्रमक

■ महासागर प्रतिनिधी, कोल्हापूर, दि. ८ :

कोल्हापूरमध्ये दत्त दालमिया साखर कारखान्याच्या विरोधात स्वाभिमानी शेतकरी संघटनेने पुकारलेले ऊस दर आंदोलन चिघळले आहे. ऊस वाहतूक रोखण्याच्या प्रयत्नात असताना, कारखाना समर्थकांनी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांना "ऊस वाहतूक रोखून दाखवाच" अशी धमकी देत त्यांच्या अंगावर धावून जाण्याचा प्रयत्न केला. यामुळे शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते अधिक आक्रमक झाले, आणि दोन्ही गटांमध्ये जोरदार हमरीतुमरी झाली. मात्र, पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्यामुळे पुढील अनर्थ टळला.

दत्त दालमिया साखर कारखान्याने एफआरपीची मोडतोड करून गाळप सुरू केल्याच्या विरोधात स्वाभिमानी शेतकरी संघटनेने कारखान्याची संपूर्ण ऊस वाहतूक रोखली. यावेळी कारखाना समर्थकांनी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांना धमकी दिल्याचा आरोप करण्यात आल्याने शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते पुन्हा आक्रमक झाले, ज्यामुळे दोन्हीकडील कार्यकर्त्यांमध्ये चांगलीच बाचाबाची झाली.

सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यातील सर्वपक्षीय साखर कारखानदार एकत्रित येऊन उसाला पहिली उचल म्हणून 3400 ते 3450 रुपये प्रति टन देत आहेत, जी



स्वाभिमानी शेतकरी संघटनेला मान्य नाही. संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी स्पष्ट केले आहे की, ऊस परिषदेत मागणी केलेल्या 3751 रुपये दराबाबत तोडगा न निघाल्यास, कार्यकर्त्यांनी भूमिगत होऊन आंदोलनाची तीव्रता वाढवावी. सध्या सांगली, कोल्हापूर आणि कर्नाटक सीमाभागात ऊस आंदोलनाची तीव्रता वाढत असून, गळीत हंगाम सुरू होण्यापूर्वी राज्य सरकारने साखर कारखानदार आणि शेतकरी संघटना यांच्यात मध्यस्थी करून तोडगा काढणे अपेक्षित होते, पण राज्य सरकार आणि कारखानदार याकडे दुर्लक्ष करत असल्याचे मत राजू शेट्टी यांनी व्यक्त केले आहे.

दरम्यान, कर्नाटकमध्ये ऊस दरासाठी सुरू असलेल्या शेतकऱ्यांच्या आंदोलनाला अखेर यश मिळाले आहे. राज्य सरकारने उसाला प्रती टन 3,300 रुपये इतका दर जाहीर केला आहे. दर जाहीर होताच बेळगाव जिल्ह्यातील गुर्ला पूर येथे आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांनी गुलाल उधळून आणि फटाके फोडून आपला आनंद साजरा केला.

गेल्या काही दिवसांपासून हे आंदोलन दिवसेंदिवस चिघळत चालले होते आणि दोन मंत्र्यांनी केलेले मध्यस्थीचे प्रयत्न देखील निष्फळ ठरले होते. अखेरीस, शेतकऱ्यांनी शुक्रवारी सायंकाळपर्यंत दर जाहीर करण्याची मागणी केली होती. त्यानुसार, आज मुख्यमंत्री सिद्धारामय्या यांच्या अध्यक्षतेखाली बंगळूरू येथे बैठक पार पडली आणि या बैठकीत हा नवीन दर जाहीर करण्यात आला.

## मनोज जरांगेच्या अडचणीत वाढ
### मुंबई पोलिसांनी बजावले चौकशीचे समन्स

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८ :



मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या अडचणी वाढल्या असून, मुंबईतील आझाद मैदान पोलिसांनी त्यांना चौकशीसाठी हजर राहण्याबाबत नोटीस बजावली आहे. जरांगे पाटील यांना येत्या 10 तारखेला (नोव्हेंबर) चौकशीसाठी आझाद मैदान पोलिस ठाण्यात हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. पोलिसांनी ही नोटीस जरांगे पाटील यांच्यासह त्यांचे सहकारी विरेंद्र पवार यांना देखील पाठवली आहे.

काही महिन्यांपूर्वी मुंबईतील आझाद मैदानात मनोज जरांगे पाटलांनी मराठा आरक्षणासाठी आंदोलन केले होते. या आंदोलनामुळे सध्या जरांगे पाटील अडचणीत आले आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हे समन्स जरांगे पाटील यांनी आझाद मैदानात केलेल्या उपोषणादरम्यान झालेल्या कथित उल्लंघनांशी संबंधित आहेत. मनोज जरांगे आणि त्यांच्या सहकाऱ्यांवर आझाद मैदानावरील आंदोलनादरम्यान पोलिसांनी घालून दिलेल्या नियम आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन केल्याचा आरोप आहे. या आंदोलनासाठी कोणतेही अधिकृत परवानगी न घेतल्याचा आरोप करत पोलिसांनी आझाद मैदान पोलिस ठाण्यात मनोज जरांगे पाटील आणि इतर सहकाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल केला होता. या पार्श्वभूमीवर आता पोलिसांनी समन्समध्ये मनोज जरांगे-पाटील आणि इतर पाच जणांना 10 नोव्हेंबर रोजी सकाळी 11 ते दुपारी 1 वाजेच्या दरम्यान आझाद मैदान पोलिस स्टेशनमधील तपास अधिकाऱ्यांसमोर हजर राहण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले.

मनोज जरांगे पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी 27 ऑगस्टपासून आझाद मैदानात साखळी उपोषण केले

## सीएसएमटी येथील कर्मचाऱ्यांवर कारवाईची शक्यता
# रेल्वे प्रशासनाचा चौकशी करण्याचा निर्णय

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८ :

मुंब्रा रेल्वे अपघातानंतर रेल्वे कर्मचाऱ्यांनी केलेल्या आंदोलनामुळे मुंबई आणि उपनगरांतील प्रवाशांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागला. या आंदोलनाचा फटका ठाणे आणि मुलुंड परिसरातील रेल्वे प्रवाशांना बसला. दादर ते ठाणे मार्गावरील अनेक गाड्या काही काळ थांबल्या होत्या. त्यामुळे सकाळच्या आणि संध्याकाळच्या गर्दीच्या वेळी शेकडो प्रवासी स्थानकांवर अडकले. काही प्रवासी लोकल वेळेवर न मिळाल्याने ट्रॅक ओलांडून जाण्याचा प्रयत्न करत होते, त्यावेळी दुर्दैवाने लोकलची धडक बसून पाच जणांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर रेल्वे प्रशासन आणि पोलिसांनी या आंदोलनाची सखोल चौकशी करण्याचा निर्णय घेतला आहे.




मुंब्रा अपघातानंतर अभियंत्यांवर दाखल झालेल्या गुन्ह्याच्या विरोधात रेल्वे कर्मचाऱ्यांनी सीएसएमटी येथे मोठं आंदोलन केलं. या आंदोलनाला परवानगी होती का? आंदोलन अचानक उग्र का झालं? आणि मोटरमननी गाड्या थांबवण्याचा निर्णय का घेतला? याची सविस्तर चौकशी करण्याचे आदेश रेल्वे पोलिसांना देण्यात आले आहेत. प्राथमिक माहितीनुसार, रेल्वे कर्मचारी संघटनांनी केवळ निषेध नोंदवण्यासाठी पत्रव्यवहार करण्याची योजना आखली होती. मात्र, काही कर्मचाऱ्यांनी अचानक कामबंद आंदोलन सुरू केल्याने परिस्थिती बिघडली. या संपूर्ण घटनेचा अहवाल रेल्वे पोलिसांकडून वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठवला जाणार असून, त्यानंतर आंदोलनकर्त्यांविरोधात कायदेशीर कारवाई होण्याची शक्यता आहे.

रेल्वे कर्मचारी संघटनांच्या म्हणण्यानुसार, दोन अभियंत्यांवर दाखल करण्यात आलेला गुन्हा अन्याय्य आहे. त्यांच्या मते, मुंब्रा अपघातात अभियंत्यांची चूक नसून, ही दुर्घटना नैसर्गिक कारणांनी घडली. या निषेधार्थ नॅशनल रेल्वे युनियन ऑफ मॅन्युअल वर्कर्सने सीएसएमटी येथे मोर्चा काढला. या आंदोलनात मोटरमन, अभियंते आणि तांत्रिक कर्मचारी सहभागी झाले होते. त्यामुळे मध्य आणि हार्बर मार्गावरील गाड्या काही काळ थांबल्या होत्या. प्रवाशांच्या वाढत्या नाराजीनंतर रेल्वे प्रशासनाने युनियन नेत्यांशी चर्चा सुरू केली आणि अखेर सायंकाळी साडेसहा वाजता लोकल सेवा पुन्हा सुरू करण्यात आली.

रेल्वेचे जनसंपर्क अधिकारी स्वप्नील लीला यांनी दिलेल्या माहितीनुसार, आंदोलनामुळे सुमारे दीड तास लोकल सेवा ठप्प होती. प्रवाशांची गैरसोय लक्षात घेऊन डीआरएम आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने चर्चेची बैठक घेतली. युनियन नेत्यांशी झालेल्या चर्चेनंतर गाड्या पुन्हा सुरू करण्यात आल्या. ज्या अभियंत्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे, त्यांचा दोष निश्चित होईपर्यंत त्यांना शिक्षा देणे योग्य नाही, अशी मागणी आंदोलकांनी केली होती.

## शिक्षक व पदवीधर मतदार संघांच्या निवडणुकांसाठी मतदार नोंदणी सुरु

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८ :

भारत निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार पुणे, नागपूर व औरंगाबाद विभागातील पदवीधर मतदार संघ, तसेच पुणे व अमरावती विभागातील शिक्षक मतदार संघांच्या द्विवार्षिक निवडणुकांसाठी मतदार याद्या नव्याने तयार करण्याची प्रक्रिया सुरू आहे. निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार, 6 नोव्हेंबर 2025 पर्यंत पात्र पदवीधर आणि शिक्षकांकडून अनुक्रमे प्रपत्र 18 व 19 मध्ये प्राप्त झालेल्या अर्जांवर संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी पात्रता-अपात्रतेचा निर्णय घेतील. त्यानुसार 25 नोव्हेंबर 2025 रोजी प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात येतील. यानंतर 25 नोव्हेंबर ते 10 डिसेंबर 2025 या कालावधीत नागरिकांना या यादीविषयी दावे व हरकती सादर करण्याची संधी मिळेल. तसेच, 6 नोव्हेंबरनंतरही पदवीधर आणि शिक्षकांना प्रपत्र 18 व 19 द्वारे मतदार नोंदणी करण्याची मुभा असेल. शिक्षक आणि पदवीधर मतदार संघांसाठी ऑनलाईन नोंदणीची सुविधा देखील उपलब्ध आहे. इच्छुकांनी या संकेतस्थळावर जाऊन अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. त्यामुळे अद्याप अर्ज सादर न केलेल्या पात्र पदवीधर व शिक्षकांनी तात्काळ आपली नोंदणी करून घ्यावी, असे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने कळविले आहे.

## एसटी कर्मचाऱ्यांचा रखडलेला पगार सोमवारी खात्यात जमा होणार

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८ :

राज्य सरकारने एसटी महामंडळाला सवलतमूल्याचा निधी न दिल्याने एसटी कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात पगार जमा होऊ शकलेला नाही. दर महिन्याच्या ७ तारखेला कर्मचाऱ्यांना पगार मिळतो. परंतु, सवलतमूल्याची रक्कम मिळण्यास विलंब झाल्याने एसटी कर्मचाऱ्यांचा पगार रखडला. आता राज्य सरकारने एसटी महामंडळाला सप्टेंबर २०२५ च्या सवलतमूल्याच्या प्रतिपूर्तीपोटी ४७१.०५ कोटी रुपये निधी वितरित करण्यास गृह विभागाने मंजुरी दिली आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात सोमवारी पगार जमा होईल, असे सूत्रांनी सांगितले. एसटी महामंडळाच्या माध्यमातून प्रवास करणाऱ्या राज्यातील हजारो प्रवाशांसाठी विविध सवलती योजना आहेत. या योजनांच्या माध्यमातून प्रवासी तिकीट दरात ३३ टक्क्यांपासून १०० टक्क्यांपर्यंत सवलत देण्यात येते.

यात ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत तिकीट भाडे, महिलांसाठी अर्धे तिकीट योजनेचा समावेश आहे. या सवलतींचे उत्तरदायित्व राज्य सरकारचे आहे. त्यामुळे ६७ टक्के ते पूर्णपणे तिकीटाचे भाडे राज्य सरकार भरते. एसटी महामंडळाला सप्टेंबर २०२५ च्या सवलतमूल्याच्या प्रतिपूर्तीपोटी ४७१.०५ कोटी रुपये इतका निधी देण्यात येणार आहे. याद्वारे एसटी महामंडळातील सुमारे ८३ हजार कर्मचाऱ्यांच्या ऑक्टोबर महिन्यातील वेतनाचा प्रश्न सुटला आहे.

# मंत्री सरनाईकांनी २०० कोटींची जमीन फक्त ३ कोटींना घेतली

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८ :

मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्वतःच्या शिक्षण संस्थेसाठी मोक्याच्या ठिकाणी 4 एकर जमीन, ज्याचे बाजारमूल्य 200 कोटी रुपये आहे, ती अवघ्या तीन कोटी रुपयांमध्ये खरेदी केली आहे. तुम्ही महाराष्ट्र लुटून खा, आम्ही डोळे बंद करून बसतो, असे काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, मंत्री प्रताप सरनाईक यांच्या प्रकरणातील सविस्तर माहिती लवकरच उघड करणार आहे. मंत्र्यांना स्वतःच्या चॅरिटेबल संस्थेच्या नावावर इतक्या कमी किमतीत अशी जागा घेता येते का? असा सवाल त्यांनी केला आहे. या आरोपांवर राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी म्हटले आहे की, केवळ माध्यमांमध्ये बोलण्याऐवजी वडेट्टीवार यांनी तक्रार दाखल केल्यास सरकार नक्कीच चौकशी करेल. तक्रारीशिवाय कारवाई करणे शक्य होत नाही.



### विजय वडेट्टीवारांचा आरोप

मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्वतःच्या शैक्षणिक संस्थेला मीरा-भाईंदर-मधील चार एकर प्राइम लँड जिची किंमत 200 कोटी रुपये आहे ही 3 कोटी रुपयांमध्ये घेतली. मंत्र्यांना स्वतःच्या संस्थेच्या नावाने अशी जमीन घेता येते का? हे जर होऊ शकत असेल तर तुम्ही महाराष्ट्र लुटून खा आम्ही डोळे बंद करत बसतो. लुटा आओ लुटो महाराष्ट्र बेचो अशी म्हणायची परिस्थिती या सरकारच्या माध्यमातून आली आहे. हे घोटाळे थांबवण्यासाठी कारवाई करण्यात यावे.

# वंदे मातरम गीताच्या १५० व्या वर्षानिमित्त विशेष कार्यक्रम
## हे केवळ गीत नाही, ती एकतेची व मातृत्वाची भावना :आशिष शेलार

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ८ :

वंदे मातरम या गीताचा बारकाईने अभ्यास केल्यास त्याचे अनेक अन्वयार्थ लागतात. हे गीत कोणासाठी ऊर्जागीत, तर कोणासाठी समर आणि समर्पण गीत आहे. या गीताने भारतीय स्वातंत्र्य चळवळीस शक्ती दिली आणि आजही ते भविष्याचा वेध घेताना दिशा देत आहे, असे गौरवोद्गार राज्याचे सांस्कृतिक कार्य आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी काढले.

महाराष्ट्र शासनाचा सांस्कृतिक विभाग, पुणे पुस्तक महोत्सव आणि वंदे मातरम सार्धशती जयंती समारोह समिती यांच्या संयुक्त विद्यमाने या गीताच्या 150 व्या वर्षानिमित्त बालगंधर्व रंगमंदिरात एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



यात संगीत राज्य नाट्य स्पर्धा विजेत्या कोलाज क्रिएशन्स निर्मित 'संगीत आनंदमठ' या संगीत नाटकाचा मोफत प्रयोग सादर करण्यात आला.

यावेळी मिलिंद सबनीस लिखित आणि विश्वकर्मा पब्लिकेशनतर्फे प्रकाशित 'ध्यास वन्दे मातरमचा' या पुस्तकाचे प्रकाशन शेलार यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर भारतीय जनता पक्षाचे शहर अध्यक्ष धीरज घाटे, राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण आणि संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील, पुणे पुस्तक महोत्सवाचे मुख्य संयोजक राजेश पांडे, राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे निदेशक युवराज मलिक, विश्वकर्मा प्रकाशनाचे कार्यकारी संचालक विशाल सोहनी, मिलिंद सबनीस, मकरंद केळकर आणि विश्वकर्मा प्रकाशनाचे संपादक संदिप तापकीर आदी मान्यवर उपस्थित होते.

ॲड. आशिष शेलार पुढे म्हणाले की, वंदे मातरम् या गीतास संविधानात राष्ट्रगीत म्हणून संबोधले आहे. हे गीत क्रांतिकारकांसाठी प्रेरणागीत, तर इंग्रजांविरोधात लढणाऱ्यांसाठी युद्धगीत देखील आहे. राज्य, भाषा, प्रांत आदी सारे भेद या गीताने विरून जातात, त्यामुळे हे एकतेचे गीत झाले आहे. यात मातृत्वाचा गौरव केला असल्याने हे मातृगीत देखील आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी "विरासत से विकासतक" हे जे स्वप्न पाहिले आहे, त्या परंपरेला पूरक असे हे गीत आहे. 2047 मध्ये भारताच्या स्वातंत्र्याचे शतक पूर्ण होत आहे. त्यावेळी भारत नक्की कसा असावा याबाबत 139 कोटी भारतीयांनी एकत्र येत जे स्वप्न पाहिले आहे, त्या ध्येय प्राप्ती आणि ध्येय पूर्तीसाठी हे गीत दिशादर्शक ठरेल, असे मत शेलार यांनी व्यक्त केले. यावेळी बोलताना राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले की, शिवाजी महाराज की जय, जय श्रीराम या घोषांप्रमाणेच वंदे मातरम हा घोष देखील मनाच्या गाभाऱ्यातून येतो. ही घोष वाक्ये रचनात्मक आणि संघर्षात्मक आहेत.


### जाहीर नोटीस

या नोटीसद्वारे जाहीर करण्यात येते की अर्जदार गिरणी संकेत क्र. २८. बॉम्बे डाईंग (स्प्रिंग मिल) प्राधान्य क्र. WT- १३१, गाळा क्र. ४, C , ९,९०८ हा श्री दत्ताराम धाकु नलावडे यांना म्हाडा गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या वतीने दिनांक : ०१/०३/२०२० रोजी वितरीत करण्यात आले, परंतु श्री दत्ताराम धाकु नलावडे यांचे दिनांक : २५/०६/२०२३ रोजी निधन झाले असून त्यांच्या पश्चामा त्यांची पत्नी त्या त्यांचा मृत्यु त्यांच्या आधी झाला असून दिनांक : २९/०६/२०२१ रोजी निधन झाले असून त्यांच्या पश्चात वारसदारांची नावे खालील प्रमाणे आहेत.

१) मुकेश दत्ताराम नलावडे - मुलगा वय ३४ वर्ष

२) राकेश दत्ताराम नलावडे मुलगा वय ३६ वर्ष -

द बाम्बे डाईंग मिल लिमिटेड (स्प्रिंग मिल) यांचे कडुन कामगारांच्या वारसांना लाभ मिळण्यासाठी मला वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे, तरी ज्या कोणाची सदर वारस हक्काबद्दल काहीही आक्षेप असतील तर त्यांनी पुराव्यासह ही नोटीस प्रसिद्ध झाले पासून ७ दिवसांच्या आत तहसिलदार कार्यालय एफ नॉथ विभाग दंडाधिकारी शाखा जिल्हा अधिकारी यांचे कार्यालय जुने जकात घर शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१, यांच्याशी संपर्क साधावा

अर्जदार

मुकेश दत्ताराम नलावडे



## थोडक्यात



### तिशीनंतर सर्वांनी रक्तदाब तपासा

**अकोला :** धावपळीच्या आजच्या आणि ताणतणावाच्या जीवनशैलीत उच्च रक्तदाब, मधुमेह आणि हृदयरोगांचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. याच पार्श्वभूमीवर शासनाने ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये (पीएचसी) 'ईसीजी' यंत्रांची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. तिशीपुढील प्रत्येक नागरिकाने नियमित रक्तदाब तपासणी करून घ्यावी, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.असंतुलित आहार, व्यायामाचा अभाव आणि आजारांकडे दुर्लक्ष यामुळे अनेकांना हृदयविकाराचा झटका येण्याचे प्रमाण वाढले आहे. योग्य वेळी निदान न झाल्यास गंभीर परिणाम भोगावे लागतात. हे टाळण्यासाठी ग्रामीण भागात मोफत 'ईसीजी' तपासणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. हातरूण प्राथमिक आरोग्य केंद्रात नुकतीच अशाच प्रकारची घटना घडली. बोरगाव वैराळे येथील ४६ वर्षीय रुग्ण छातीत दुखत तक्रारीसह असल्याच्या उपचारासाठी दाखल झाला होता. त्यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. नलिनी तायडे आणि डॉ. प्रियंका पवार यांनी तत्काळ तपासणी करून 'ईसीजी' केली.

### अकोल्याची बाजारपेठ ओसाड

**अकोला :** दिवाळीच्या खरेदीच्या धामधुमीनंतर अकोल्यातील बाजारपेठा पुन्हा शांत झाल्या आहेत. काही दिवसांपूर्वी ग्राहकांनी फलवलेल्या गल्लीबोळांमध्ये आता ओस पडलेले दृश्य दिसत आहे. ऑनलाईन प्लॅटफफॉर्मवरील मोठ्या सवलती आणि आकर्षक ऑफर्समुळे नागरिक मोबाईलकडे वळल्याने स्थानिक व्यापाऱ्यांना फटका बसला आहे. ॲमेझॉन, फ्लिपकार्ट, मिंत्रा यांसारख्या संकेतस्थळांवर दररोज येणाऱ्या डिस्काउंट जाहिरातींनी तरुण वर्गाला आकर्षित केले आहे. कपडे, जोडे, मोबाईल, ॲक्सेसरीज आणि छोट्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंची विक्री मोठ्या प्रमाणात ऑनलाईनकडे झुकली आहे. मोठ्या दुकानांकडे काही प्रमाणात ग्राहक टिकले असले, तरी लहान दुकानदार विक्रीअभावी अडचणीत आले आहेत. वाढते भाडे, विजेची बिले आणि कामगारांचे वेतन यामुळे व्यापाऱ्यांवर आर्थिक ताण निर्माण झाला आहे. दरम्यान, ऑनलाईन खरेदीचे सर्व अनुभव सुखद नसतात. आकर्षक फोटो पाहून घेतलेली वस्तू दर्जाहीन निघते, चुकीचा साईझ किंवा खराब माल मिळण्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. फेसबुकवरील अनोळखी पेजवरून खरेदी करणाऱ्यांना फसवणुकीचा धोका असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. ऑनलाईन सवलतींच्या या लाटेत अकोल्यातील पारंपारिक व्यापार टिकवणे व्यापाऱ्यांसाठी मोठे आव्हान ठरले आहे.

### नि:शुल्क योग शिबिर

**अकोला :** स्थानिक नेहरू पार्कचे संचालक बी. एस. देशमुख यांनी दि. १० नोव्हेंबर ते २० नोव्हेंबर २५ दरम्यान सकाळी ५.४५ ते ७.३० वा.पर्यंत नि:शुल्क योग शिबीराचे आयोजन करण्यात येत आहे. शिबीरात शिवतेज प्रतिष्ठानचे योगगुरू मनोहर इंगळे हे गोरक्षनाथांच्या हठ योगावर आधारीत प्राणायाम, आसन, ध्यान धारणाचे मार्गदर्शन करून रोज श्रीमद भागवतातील एका अध्यायावर विवेचन करतील. योगनृत्यावर अनुराधा इंगळे या सराव करून घेतील. महिलांची आसन व्यवस्था वेगळी राहील. सदर शिबिराचा लाभ मानसिक शांती, आम्लपित्त, गुडघेदुखी, अनियंत्रीत रक्तदाब, शुगर, वातविकारानी ग्रस्त नागरिकांनी घ्यावा.

# अकोल्यातील 'शेतकरी संवाद' कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

## शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेऊन उपाययोजनांवर भर; किसान ब्रिगेडचे प्रकाश पोहरे यांनी सादर केले प्रभावी प्रेझेंटेशन

### शरद पवारांचा शेतकऱ्यांशी थेट संवाद

**▪अकोला,दि ८ (प्रतिनिधी) :**

देशाचे माजी कृषिमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरदचंद्र पवार यांच्या उपस्थितीत शनिवारी अकोल्यातील पोहरे फार्म, कान्हेरी येथे 'शेतकरी संवाद' हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. किसान ब्रिगेडच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमादरम्यान शरद पवार यांनी शेतकऱ्यांच्या समस्या प्रत्यक्ष ऐकून घेतल्या आणि त्या सोडविण्यासाठी शासन, सहकारी संस्था आणि समाजाने एकत्रितपणे प्रयत्न करण्याची गरज असल्याचे सांगितले. हवामान बदल, वाढते उत्पादन खर्च, बाजारभावातील चढउतार आणि सिंचन व्यवस्थेतील अडचणी यावर त्यांनी सविस्तर चर्चा केली. या कार्यक्रमाला माजी मंत्री अनिल देशमुख, अकोला-वाशीम जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ.




संतोषकुमार कोरपे, माजी मंत्री व शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, माजी राज्यमंत्री अझहर हुसेन, माजी आमदार लक्ष्मणराव तायडे, अकोला कृषी उत्पन्न बाजार समितीचे अध्यक्ष शिरीष धोत्रे यांसह अनेक मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. किसान ब्रिगेडचे अध्यक्ष प्रकाश पोहरे यांनी या प्रसंगी प्रभावी पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन सादर करून शेतकऱ्यांची कशी लूट केली जात आहे याचे विस्तृत विवेचन केले. त्यांनी शासनाने शेतकऱ्यांची तात्काळ कर्जमुक्ती करावी, अशी आग्रही मागणी यावेळी केली. तसेच ज्येष्ठ नेते महादेवराव भुईभार, भाई प्रदीप देशमुख आणि इतर मान्यवरांनी शेतकऱ्यांच्या समस्यांवर विचार मांडले. कृषी, सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक आणि उद्योग क्षेत्रातील विविध मान्यवरांनीही कार्यक्रमात सहभाग घेतला. आयोजकांच्या आवाहनानुसार कार्यक्रम साधेपणाने पार पडला.

कोणत्याही हार-फुलांचा समारंभ न करता शेतकऱ्यांनी थेट संवाद साधला. किसान ब्रिगेडचे दिवाकर गावंडे, शरद वानखडे, धनंजय मिश्रा, साहेबराव मोरे, कृपाल तात्या, नाना वराडे, भगवंत गवळी आणि प्रदीप गावंडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या शेवटी शरद पवार यांनी शेतकऱ्यांना आधुनिक शेती पद्धती अंगीकारण्याचे, शेतमालाचे मूल्यवर्धन करण्यावर भर देण्याचे आणि एकत्रित प्रयत्नांद्वारे शेती क्षेत्र अधिक सक्षम बनवण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे संचालन धनंजय मिश्रा यांनी केले तर आभार प्रदर्शन शरद वानखड़े यांनी केले.

## मराठा समाज विखुरलेला नको एकत्रीकरण हवे : शरदराव पवार

**▪अकोला,दि ८ (प्रतिनिधी) :**

महाराष्ट्रात मराठा समाज मोठ्या संख्येत आहे. हा समाज पाटील, देशमुख, कुणबी, घाटोळे, ९६ कुळी, अशा वेगवेगळ्या घटकांमध्ये विखुरलेला आहे. तो एकत्रित असला पाहिजे. त्यांनी एकमेकांना आपल्या नात्यागोत्यात सामावून घेतले पाहिजे. असे विचार भारताचे माजी कृषिमंत्री माननीय शरदचंद्रजी पवार यांनी व्यक्त केले.

कान्हेरी सरप येथील' वेद नंदिनी ॲग्रो टुरिझम ' मध्ये आज संपन्न झालेल्या व किसान ब्रिगेडचे संस्थापक अध्यक्ष शेतकरी नेते प्रकाश पोहरे यांनी आयोजित केलेल्या ' शेतकरी संवाद ' कार्यक्रमात पाटील समाजाचे सचिव प्रदीप खाडे यांनी विचारलेल्या प्रश्नावर आपले मत व्यक्त करताना ते बोलत होते. सकल मराठा समाजातील पाटील, कुणबी, देशमुख, घाटोळे आदी घटकांच्या एकत्रिकणा बाबत आपले मत काय ? असा तो प्रश्न होता. यावर आपले विचार मांडताना मा. शरदचंद्र पवार म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात १८ पगड जाती होत्या. त्या सर्वांना सोबत घेऊन त्यांनी रयतेचे राज्य निर्माण केले होते. त्यात मराठा समाजही एकत्रितपणे सहभागी होता. माझ्याही नातेसंबंधात मराठा समाजातील सर्वच घटक सहभागी आहेत. समाजाच्या एकत्रीकरणामुळे सर्वच आघाड्यावर त्यांची प्रगती होऊ शकते. असेही मत त्यांनी याप्रसंगी व्यक्त केले. याप्रसंगी शेतकरी नेते प्रकाश पोहरे, माजी गृहमंत्री अनिल देशमुख, शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री हर्षवर्धन देशमुख, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ. संतोष कोरपे, माजी मंत्री खान मोहम्मद अझहर हुसेन, माजी आमदार शरद तसरे, गजाननराव दाळू गुरुजी, लक्ष्मणराव तायडे, ऋषी भाऊ पोहरे,कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिरीष धोत्रे, महादेवराव भुईभार, संग्राम गावंडे, माजी सभापती राजीव बोचे, भाई प्रदीप देशमुख, किसान ब्रिगेडचे राज्याध्यक्ष पुरुषोत्तम गावंडे, जिल्हाध्यक्ष दिवाकर गावंडे, डॉक्टर सुभाष कोरपे, प्रदीप खाडे, शरद वानखडे, अविनाश पाटील, देवराव हागे पाटील, दिनकर सरप,संदीप महल्ले पाटील व इतरही नेते प्रामुख्याने उपस्थित होते.



## एटीएम कार्डची अदलाबदली करून महिलेची २४ हजार ७०० रुपयांनी फसवणूक

**मूर्तिजापूर :** शहरातील एस.बी.आय. बँकेच्या एटीएममध्ये पैसे काढण्यासाठी गेलेल्या महिलेची अनोळखी इसमाने चलाखीने फसवणूक करून तब्बल २४ हजार ७०० रुपये लांबविल्याची घटना शुक्रवारी दुपारी १ वाजताच्या दरम्यान समोर आली आहे. या प्रकरणी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्राप्त माहितीनुसार, फिर्यादी बेबी मधुकर खंडारे (४४) रा. राजुरा घाटे या ७ नोव्हेंबर रोजी दुपारी आठवडी बाजाराकरिता आणि शिलाई मशीन दुरुस्तीच्या कामासाठी मूर्तिजापूर येथे आल्या होत्या. मशीन दुरुस्तीसाठी पैसे काढण्यासाठी त्या एस.बी.आय. बँकेच्या एटीएममध्ये गेल्या.

त्यावेळी एटीएममधून पैसे न मिळाल्याने त्यांनी बाजूला उभ्या असलेल्या एका अनोळखी इसमाला मदत मागितली. त्या व्यक्तीने एटीएम कार्ड टाकून पिन विचारला आणि पिन नंबर पाहून घेतला. त्यानंतर त्याने एटीएम कार्ड बाहेर काढून चलाखीने कार्डची अदलाबदल केली. तो म्हणाला, तुमचे कार्ड लॉक झाले आहे.

## अकोट मतदार सघांतील तीन नगर पालीकासाठी भाजपातर्फे ईच्छुकाची झाल्या मुलाखती



**▪अकोला,दि ८ (प्रतिनिधी) :**

भारतीय जनता पक्षाच्या वतीने नगरपालिका निवडणुकीमध्ये लढू इच्छिणाऱ्या अध्यक्षपदाचे उमेदवार व सदस्य म्हणून निवडणूक लढवणाऱ्या उमेदवार सर्व घटकांमध्ये उमेदवारांची झुंबड लागली असून बाराबलूतेदार, जाणते आणि नवीन कार्यकर्ते तिकिटासाठी इच्छुक असून त्यांची आज तेल्हारा, हिवरखेड आकोट येथे उमेदवाराची चाचणी आमदार रणधीर सावरकर खासदार अनुप धोत्रे , संघटन मंत्री डॉक्टर उपेंद्र कोटेकर, पालकमंत्री एडवोकेट आकाश फुंडकर ,आमदार प्रकाश भारसाकळे संतोष शिवरकर, डॉक्टर अमित कावरे विजय अग्रवाल माधव मानकर राजेश नागमते अंबादास उमाळे ॲड रूपाली काकडे, जयश्री फुंडकर, योगेश गोतमारे डॉक्टर संजय शर्मा हरीश टावरी, मंगेश दुतोंडे, गणेश रोटे आदींच्या मार्गदर्शनात घेण्यात आल्या. ओबीसी साठी हिवरखेड व अकोट तर एस सी वर्गासाठी तेल्हारा नगराध्यक्ष येथे घेण्यात आली आहे पक्षाच्या वतीने पक्ष निरीक्षक नेमण्यात आले होते त्यांनी आता अहवाल पाठवल्यानंतर आता इच्छुकांची व सध्याची परिस्थिती या संदर्भात निवडणूक संचालन समिती यांनी आज ऊमेद्वाराची मते जाणून घेतली. विविध पक्षातील कार्यकर्ते भारतीय जनता पक्षाच्या तिकिटावर लढण्यात इच्छुक असून आकोट येथे ३१ हिवरखेड २१ तर तेल्हारा १९ जागेसाठी मुलाखती घेण्यात आल्या जवळपास ओबीसी जागेसाठी ४३२ उमेदवारांनी मुलाखती घेण्यात आल्या.

## अखेर बेपत्ता इसमाचा मृतदेह आढळला

**▪बोरगाव मंजु,दि ८ (प्रतिनिधी) :**

येथील रामजी नगरस्थित एक ४० वर्षीय इसम बेपत्ता झाल्याची तक्रार नातेवाईकांनी १ नोव्हेंबरला पोलिस ठाण्यात दिली होती. नातेवाईकांसह पोलिसांनी शोध घेतला असता मिळून आले नाही. अखेर शनिवारी (दि. ८) नोव्हेंबरला बोरगाव मंजू शेत शिवारात बेपत्ता इसमाचा मृतदेह आढळला. देविदास खिल्लारे (४०), रा. बोरगाव मंजू असे मृतकाचे नाव आहे. प्राप्त माहितीनुसार, बोरगाव मंजू येथील नातेवाईकांनी पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती की देविदास खिल्लारे (४०) हे १ नोव्हेंबरला घरात कुणालाही काहीही न सांगता घरुन बेपत्ता झाले आहेत. उशिरापर्यंत घराबाहेर गेलेल्या देविदास खिल्लारे घरी परतले नाहीत, नातेवाईकांनी शोधाशोध घेतला परंतु मिळुन आले नाहीत.

### 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत पातुर पोलीसांनी पकडला

## म्हैसची वाहतुक करणारा कंटेनर

### ५१ हेले सह ४८ लाखाचा मुदेमाल जप्त...!

**▪अकोला,दि ८ (प्रतिनिधी) :**

७.११.२०२५ रोजी पोलीस स्टेशन पातुर चे पोलीस निरीक्षक याना माहीती मिळाली की, एका कंटेनर दाटीवाटीने कुरपणे बांधुन म्हैस ची वाहतुक करीत आहे. अशा माहीती वरून पातुर पोलीसांनी सावरखेड टोल नाका येथे नाकाबंदी केली. मिळालेल्या माहीती प्रमाणे एक कंटेनर ज्याचा क. एच. आर ७३ बी ००५६ हा सावरखेड टोल नाक्यावर आला असता पोलीसांनी सदर कंटेनर ट्रक थांबविला असता त्यामध्ये म्हैस जातीचे ५१ हेले दाटीवाटीने कुरपणे, दोरीने बांधुन कोणतीही सुविधा न पुरविता कंन्टेनर मध्ये चालक नासीर खान जुबेर खान वय २३ वर्ष रा. ग्राम घासेरा ता. जि. नुह राज्य हरियाण हा वाहतुक करताना मिळुन आला. पोलीसांनी सदर कंटेनर पोलीस स्टेशन ला आणुन त्यामधील म्हैस जातीचे ५१ हेले त्याची किंमत ८,००,०००/- रूपये व एक कंटेनर क. एच आर ७३ बी ००५६ किंमत ४०,००,०००/ रुपये असा एकुण ४८,००,०००/रूपयाचा मुददेमाल पोलीसांनी जप्त करून चालक नासीर



खान जुबेर खान वय २३ वर्ष रा. ग्राम घासेरा ता. जि. नुह राज्य हरियाण याचे विरुध्द गुन्हा नोंद केला आहे.सदरची कारवाई मा. पोलीस अधिक्षक श्री. अर्चित चांडक साहेब, अपर पोलीस अधिक्षक श्री. बी चंद्रकांत रेडडी सा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. गजानन पडघन सा. यांचे मार्गदर्शनाखाली पो. नि. हणमंत डोपेवाड, पो. हे.कॉ. मनोज ठाकुर ब.नं. १३९३, पो.कॉ. नदिम ब.नं. २३७५, चालक पो.हे.कॉ. ठाकरे ब.नं.२०१ यांनी केली आहे.

### हवामानात बदल,अकोल्यात वाढला गारवा हिवाळ्याची चाहूल

**अकोला :** दिवाळीनंतर वातावरणात झालेल्या अचानक बदलामुळे अकोल्यात आता थंडीची चाहूल लागली आहे. मागील आठवड्यात झालेल्या मुसळधार पावसानंतर हवेत गारवा वाढला असून, शहरात दोन दिवसांपासून थंड वाऱ्यांनी चांगलीच हजेरी लावली आहे. आज, दिनांक ७ नोव्हेंबर रोजी अकोल्याचे किमान तापमान १५.२ अंश सेल्सिअस, तर कमाल तापमान ३१.७ अंश सेल्सिअस इतके नोंदवले गेले.या तापमानातील घसरणीमुळे नागरिकांना सकाळच्या वेळेत गारठा जाणवू लागला.

## जिल्ह्यात सोयाबीन नोंदणीला वेग

**▪अकोला,दि ८ (प्रतिनिधी) :**

केंद्रशासनाच्या आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत जिल्ह्यातील शेतक-यांकडून मूग, उडीद व सोयाबीन पिकांची खरेदी नाफेडमार्फत करण्यात येणार असून या योजनेसाठी शेतक-यांची ऑनलाइन नोंदणी प्रक्रिया ३० ऑक्टोबरपासून सुरू झाली आहे. तर प्रत्यक्ष खरेदी १५ नोव्हेंबरपासून सुरू होणार आहे.या खरेदीसाठी नाफेडकडून जिल्ह्यात विविध खरेदी केंद्रे कार्यान्वित करण्यात आली आहेत. नाफेडमार्फत मूग ८ हजार ७६८ रुपये, उडीद ७ हजार ८०० रुपये तर सोयाबीन ५ हजार ३२८ रुपये प्रतिक्विंटल दराने खरेदी केली जाणार आहे. नोंदणीसाठी शेतक-यांनी आधारकार्ड, सातबारा उतारा, पीकपेरा नोंद व बँक पासबुकची मूळ कागदपत्रे सोबत आणावीत. नोंदणी प्रक्रिया ऑनलाइन असून शेतक-यांची प्रत्यक्ष उपस्थिती आवश्यक आहे.

## शिवसेना अकोला पूर्वची आढावा बैठक सपन्न



**▪अकोला,दि ८ (प्रतिनिधी) :**

शिवसेनेचे जिल्हा प्रमुख श्रीरंग पिंजरकर यांच्या मार्गदक्षना खाली येणाऱ्या जि.प.व प.स. च्या निवडणुकी संदर्भात नेहरू पार्क येथील शिवसेना जिल्हा कार्यालय येथे आढावा बैठक पार पडली. पंचायत समिती चे माजी सभापती व प.स.सदस्य भास्कर अंभोरे यांच्या सह शेकडो कार्यकर्त्यांनी शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या कार्याला प्रभावित होऊन संपर्क प्रमुख गोपीकिशन बाजोरिया यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा प्रमुख श्रीरंग पिंजरकर यांच्या नेतृत्वात आज शिवसेना पक्षात प्रवेश केला. बैठकीला जिल्हा प्रमुख श्रीरंग पिंजरकर यांनी येणाऱ्या निवडणुकी मध्ये आपले उमेदवार मोठ्या संख्येने कसे निवडून येतील याबाबत मोलाचे मार्गदशन केले.यावेळेस उपजिल्हा प्रमुख गोपाल म्हैसने, तालुका प्रमुख विजय वानखडे,मागासवर्ग विभागाचे चे जिल्हा अध्यक्ष जे.पी.सावंग महिला अध्यक्षा अर्चना धांडे ॲड. कुलदीप इंगळे निवासी उपजिल्हा प्रमुख अविनाश मोरे, जिल्हा सचिव सतीश गोपनारायण, शहर समन्वयक पप्पू चौधरी,उपशहर प्रमुख स्वप्नील देशमुख, ज्ञानेश्वर जानोकर, महेश बगेरे,फिरोज खान,उपतालुका प्रमुख सागर अवारे,आकाश वकटे,वीरू सिंग ठाकूर, राज हनपुडे शिवसैनिक मोठया संख्येने हजर होते.

# संत सोनाजी महाराज रथोत्सव यात्रा सोहळा संपन्न

## यात्रेनिमित्त लाखोलोकांनी घेतला शिस्तबद्धपद्धतीने महाप्रसादाचा लाभ

**▪अकोला,दि ८ (प्रतिनिधी) :**

संग्रामपूर तालुक्यातील सोनाळा येथे श्री संत सोनाजी महाराज यात्रेला पाच नोव्हेंबर पासून सुरुवात झाली. पाच तारखेला भव्य अशा रथाला तेल लावन्यात येते सहातारखेला रथाला पुर्ण झेंडु फुलानी नारळानी सजविन्यात येऊन गुरुवारी रात्री बारा वाजता रथोत्सवाला सुरुवात होऊन पुर्ण सोनाळा नगरी प्रदक्षनेनतंर आज शूक्रवारला दिनांक ७ नोव्हेंबर रोजी दुपारी बारा वाजता मंदीर समोर रथा समोरच काल्याचे अभंग होऊन दहीहंडी सोहळा व महाप्रसादाचा कार्यक्रम लाखो भाविकांच्या समवेत सोनाळ्यातील लेकी बाळी पाहूने लाखो याञेकरु यांचे साक्षीने येथील पार पडला. सर्व वारकरी मिरवनूकीतील दिड्या भजने यांच्यासह गोविंदा गोविंदा श्री सोनाजी महाराज की



जय अशा जयघोषात सर्व सोनाळा नगरी चैतन्यमय झाली होती. दुपारी बारा वाजे नंतर श्री संत सोनाजी महाराज यांची महाआरती होऊन संपूर्ण महाप्रसादाला सुरुवात झाली. यात्रेसाठी येणाऱ्या सर्व भक्तांची योग्य सोय करून ग्रामपंचायत यांनी अतिशय व्यवस्थितपणे सर्व व्यवस्था करून सर्व व्यवसायिकांना जागा उपलब्ध करून दिल्या. सर्व याञेतील पार्कींग सर्व व्यवस्था टुनकी बावनबीर हिवरखेड मार्गावर खुल्याजागेत केली होती. तसेच सोनाळा येथील पोलीस स्टेशन सह सर्व पोलीस कर्मचारी यांनी तगडा बंदोबस्त ऊपविभागीय अधिकार्याचे मार्गदर्शनात तैनात केला होता. व्यवस्थापकीय आव्हाहनाला लाखोलोकानी प्रतीसाद दिला १५१ क्विंटल ज्वारीच्या भाकरी व उडदाची डाळ तसेच अंबाडीची भाजी मूंगाची दाळ अशा प्रकारचा सर्वांनी महाप्रसाद घेतला.

# तोंडाला काळे फासण्याचा दिला वंचितने इशारा

■अकोला,दि ८ (प्रतिनिधी) :
जिल्हा परिषदेतील बांधकाम विभागातील अनागोंदी कारभाराला वाचा फोडली. त्यानंतर वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांनी थेट जिल्हा परिषद कार्यकारी अभियंत्याला घेराव घातला. जिल्हा परिषदेतील कोट्यावधीच्या कामांच्या खिरापती नियमबाह्यपणे वाटल्याचा आरोप वंचित पदाधिकारी राजेंद्र पातोडे यांनी केला आहे. कार्यकारी अभियंता इंगळे यांना या विषयी वंचित पदाधिकाऱ्यांनी जाब विचारला. कोणाच्या आदेशाने शेकडो कामे वाटप करण्यात आले. त्याच बरोबर त्यांनी कुठल्या आधारावर कोट्यावधीचे कामाची खिरापत वाटली अशी विचारणा केली. कोट्यावधीच्या कामांचे परस्पर वाटत अधिकाऱ्यांनी केले की लोकप्रतिनिधींचा त्यांच्यावर दबाव आहे असा प्रश्न या निमित्त उपस्थित करण्यात आला. जिल्हा परिषदेतील कोट्यावधीच्या कामांच्या खिरापती इलेक्शन लागू होण्यापुर्वी होण्याची शक्यता आहे.

जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी व उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दूर्लक्षामुळे कोट्यावधीचा घोळ जिल्हा परिषदेत सुरु आहे. या संपुर्ण विषयात मोठा घोळ झाल्याची चर्चा जिल्हा परिषद वतुर्ळात असून जिल्हा परिषदेचे कार्यकारी अभियंता हे काम वाटप समितीच्या बैठकीत उपस्थित असताना त्यांना त्या विषयीची आठवण नसल्याचे चित्र असून बाबु सुट्टीवर असल्याचे कारण पुढे करत त्यांनी माहिती लपविण्याचा प्रयत्न केला.

# कृषी उत्पन्न बाजार समितीत सोयाबीनची आवक वाढली

■अकोला,दि ८ (प्रतिनिधी) :
अकोला कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये सोयाबीनची आवक वाढली आहे. बाजार समितीच्या आवारात सोयाबीनच्या गंज्या लागलेल्या दिसतात. शहरी तसेच ग्रामीण भागात सोयाबीन खरेदी प्रक्रिया सुलभ व्हावी. यातील अडथळे दूर करण्यात यावे अशी म ागणी शेतकरी करीत आहेत.

अकोला कृषी उत्पन्न बाजार समिती म ध्ये दररोज १५ ते २० हजार कट्टे सोयाबीन आवक होत आहे. बाजार समिती मध्ये जिकडे तिकडे सोयाबीनच्या गंज्या दिसत आहे. मॉईश्चर असलेल्या सोयाबीनला ३९०० ते ४५०० रूपये क्विंटल भाव मिळत आहे. तरबिजवाई किंवा सीड क्वालिटी सोयाबीनला ५५०० ते ७५०० एवढा भाव मिळत आहे. ग्रामीण भागातील शेतकरी अजूनही सोयाबीन नोंदणी प्रक्रिया सुलभ व्हावी अशीमागणी करीत आहेत.

ऑनलाईन नोंदणी त्यांना करता येते. परंतु बरेच शेतकरी तालुका ठिकाणी रांग



लावून सोयाबीन नोंदणीची वाट पाहतात. रात्री जागून सकाळी नोंदणी केली

जाण्याची प्रतिक्षा करतात. परंतु तालुका खरेदी विक्री केंद्रावर त्यांना विपरीत अनुभव येतो. त्यामुळे मध्यंतरी बार्शीटाकळी, बाळापूर येथे बराच गोंधळ झाला. तहसीलदारांना हस्तक्षेप करावा लागला. तसेच पोलिसांना देखील पाचारण करण्यात आले होते. सोयाबीन खरेदी सुरू होताना संबंधित प्रशासनाने शेतक-यांची गैरसोय होणार नाही याला प्राधान्य देणे आवश्यक आहे. परंतु दरवेळी ओरड होते. शेतकरी त्रस्त होतात. असे होऊ नये म्हणून यंत्रणा व्यवस्थित कार्यरत राहणे आवश्यक असते. अजूनही गलथानपणा असेल तर तो तातडीने दूर करावा अशी मागणी केली जात आहे.

## सारडा बंधूना एक वर्षाचा सश्रम कारावास

**अकोला :** सारडा ऑईल इण्डस्ट्रीज आणि मारोती उद्योगचे भागीदार गजानन रामपाल सारडा आणि भरत रामपाल सारडा यांना दोन प्रकरणात प्रत्येकी एक वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा तसेच प्रत्येकी १० हजारांचा दंड ठोठावला आहे. तसेच या दंडाची रक्कम न भरल्यास दोन महिने अतिरिक्त तुरूंगवासाच्या शिक्षेचे जिल्हा ग्राहक तकार निवारण आयोगने आदेश दिले आहे. जिल्हा ग्राहक तकार निवारण आयोगाने कमलकिशोर अग्रवाल विरूध्द सारडा ऑईल इण्डस्ट्रीज व कमलकिशोर विरूद्ध श्री मारोती उद्योग, या मुळ प्रकरणात विरूध्द पचास असे आदेश दिले होते की, त्यांनी तकारकर्त्यास संयुक्तीकपणे व वेगवेगळे १ लाख रुपए १ एप्रिल २०१७ पासून ८ टक्के वार्षिक व्याजाने परत करावे. तसेच शारिरीक, मानसिक व आर्थीक त्रासाबद्दल नुकसान भरपाई म्हणुन ५ हजार रुपए आणि सदरप्रकरणाचा खर्च

# वारीचे मंहत कृष्णानंद महंत यांनी सूरूकेलेल्या गोमाता भंडाऱ्याला हजारो लोकांची उपस्थिती



■अकोला,दि ८ (प्रतिनिधी) :
वारखेड फाटा येथे वारी हनुमानचे मठाधिपती महंत स्वामी कृष्णा नंदजी भारती महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने व वारखेड वाशियांचे सहयोगाने महाराजाचे नियोजनात या भव्य व विशाल अशा गोमाता भंडारा आयोजन केले होते हा भंडारा सोनाजी महाराज यात्रेच्या दिवशीच असतो तीन किलोमिटर सोनाळा येथे भव्य तर हिवरखेड सोनाळा रोडवरील दोन जिल्हा सिमेवर वारखेड फाट्यावर असतो जवळपास २५ ते ३० वर्षापासून या भंडाऱ्याची परंपरा कायम आहे गोमातेवर प्रेम करा गोरक्षन करा असा संदेश महंत कृष्णानंद भारती हे या भंर्डायातुन देत असतात सुरुवातीला २५ किलोचा सूरु झालेला भंडारा आज रोजी १५ पोते ज्वारी व २किंटल उडीद डाळ पर्यंत गेला ज्वारीची भाकर व उडदाची डाळ भंडाऱ्याचे हे खास वैशिष्ट्य आहे विशेष म्हणजे या भंर्डाया मध्ये कोणत्याही प्रकारचे नैसर्गिक प्रदूषण होत नाही कारण सर्व महाप्रसाद हा ताटामध्ये देण्यात येतो तसेच सर्व पंचक्रोशीतील नागरिक या भंडारा मध्ये म्हनजे सोनाळ्यात महाप्रसादाला गर्दी असेल तर वारखेड फाट्यावर उपस्थित राहून यामधे जेवतात सोनाळा येथे सोनाजी महाराजाचा सूद्दा हाच आवडीचा अबांडीभाजी ऊडदाचे वरन व भाकरीचा नैवेद म्हनुस महाप्रसाद असतो सोनाळ्यावरुन परतनारे भावीक भक्त असे दिवसभरात जवळपास दहा ते पंधरा हजार भाविकानी येथे महाप्रसादाचा आस्वाद घेतला

## तेल्हारा नगरपरिषद निवडणूक २०२५

# शिवसेना (उबाठा गट) स्वबळावर रिंगणात

■तेल्हारा,दि ८ (प्रतिनिधी) :
आगामी तेल्हारा नगरपरिषद निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर स्थानिक राजकारणाला चांगलीच रंगत आली आहे. या निवडणुकीत शिवसेना (उबाठा गट) स्वबळावर लढण्याचा निर्धार केला असून, पक्षाच्या वतीने म यााताई गजानन थाटे या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार म्हणून दि.८ रोजी घेतलेल्या पत्रकार परिषदेत जाहीर केल्या.

शिवसेना उभाटा गटाने ङ्गस्वबळावर लढू, विकास घडवू! हा नारा देत जनतेशी थेट संपर्क मोहिमेला सुरुवात केली आहे. मायाताई थाटे या समाजकार्य, महिला सक्षमीकरण आणि स्थानिक विकासासाठी ओळखल्या जातात. मागील काही वर्षांपासून त्यांनी विविध सामाजिक उपक्रमांद्वारे जनतेचा विश्वास संपादन केला आहे. पक्षाच्या



कार्यकर्त्यांमध्ये उमेदवारी जाहीर होताच उत्साहाचे वातावरण असून,उबाठा गट स्वबळावर विजय मिळवेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. मायाताई थाटे यांनी जनतेशी संवाद साधताना म्हटले, आमचा लढा सत्तेसाठी नव्हे, तर तेल्हाराच्या सर्वांगीण विकासासाठी आहे.

आम्ही जनतेच्या विश्वासावर आणि शिवसेनेच्या विचारांवर उभे आहोत.ङ्ख त्यामुळे विजय आमचाच होणार असा दृढ विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला यावेळी शिवसेनेचे तालुकाप्रमुख अजय पाटील गावंडे तेल्हारा शहर प्रमुख विवेक खारोडे वैशाली इंगोले नगराध्यक्ष पदाचे उमेदवार मयाती थाटे सविताताई मोरखडे गजानन मोरखडे सचिन थाटे सुधाकर गावंडे मनीष गवळी पंकज कवर हेमंत अवचार गौरव धुळे स्वप्निल सुरे अमित आप्पा घोडेस्वार गोपाल जायले यांच्यासह शिवसेनेचे कार्यकर्ते पदाधिकारी व कार्यकर्ते यांची बहुसंख्य उपस्थिती होती.

# अकोला स्टेशनवर 'वंदे मातरम'चे सामूहिक गायन

## राष्ट्रीय गीताचा १५० वर्षांचा गौरव!

■अकोला,दि ८ (प्रतिनिधी) :
भारताचे राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम' याला १५० वर्ष पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने, आज अकोला रेल्वे स्टेशनवर देशभक्तीपर वातावरणात सामूहिक गायनाचा एक स्फूर्तीदायक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. स्टेशन प्रबंधक संतोष कवडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम उत्साहात पार पडला, ज्यामुळे स्टेशनवर राष्ट्रीय एकात्मतेचे वातावरण निर्माण झाले.या सामूहिक राष्ट्रगीत गायनामध्ये स्टेशनचे कर्मचारी, वेंडर, कुली आणि प्रवासी अशा १०० हून अधिक लोकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. यात



सुमारे ५० स्टेशन स्टाफ आणि ५० प्रवाशांचा समावेश होता. या कार्यक्रमाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे, प्लॅटफफॉर्म क्रमांक ०२ वर गाडीच्या प्रतीक्षेत असलेल्या प्रवाशांनीही आपल्या जागेवर उभे राहून राष्ट्रगीताचे गायन केले. बंकिमचंद्र चॅटर्जी यांनी १८७५ मध्ये रचलेले आणि स्वातंत्र्यलढ्यात प्रेरणा देणारे 'वंदे मातरम', १८९६ मध्ये गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांनी प्रथम सार्वजनिकरित्या गायले होते. याच गौरवशाली गीताच्या १५० व्या वर्षाचा उत्सव अकोला स्टेशनवर साजरा करण्यात आला, ज्यामुळे उपस्थित प्रत्येकाच्या मनात देशभक्तीची भावना अधिक दृढ झाली.

# शेतातून फवारणी करून आल्यानंतर युवक बेपत्ता

**मूर्तिजापूर :** तालुक्यातील सुलतानपूर येथील ३१ वर्षीय ऋषिकेश गजानन चांगोले हा युवक ४ नोव्हेंबर रोजी दुपारी शेतातून फवारणी करून आल्यानंतर बेपत्ता झाल्याची तक्रार मूर्तिजापूर ग्रामीण पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. प्राप्त माहितीनुसार, फिर्यादी मयुर शामसुंदर काकोडे सुलतानपूर यांनी दिलेल्या जबानी रिपोर्टमध्ये सांगितले की, सकाळी सुमारे आठ वाजता ऋषिकेश गजानन चांगोले हा आपल्या मावस भावासोबत शेतात फवारणीसाठी गेला होता. दुपारीच्या सुमारास दोघे घरी परतले असता, काही वेळानंतर ऋषिकेश गजानन चांगोले घरातून बाहेर गेला आणि त्यानंतर तो परतलाच नाही. परिसरात सर्वत्र शोध घेतला असता तो मिळून आला नाही. बेपत्ता झालेल्या ऋषिकेश गजानन चांगोले (३१), उंची सुमारे ५ फूट ३ इंच, रंग गोरा, अंगाने सडपातळ असून अंगात निळ्या रंगाचे शर्ट आणि काळ्या रंगाची पॅन्ट होती. कोणी त्याला पाहिल्यास जवळच्या पोलीस स्टेशनला कळवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# लेखी आश्वासनानंतर आंदोलनाची सांगता

## 'घरकुल'साठी एआयएमआयएमचे बेमुदत उपोषण

■अकोला,दि ८ (प्रतिनिधी) :
प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत (घरकुल) प्रभाग क्रमांक १, २ आणि ७ मधील नागरिकांना न्याय न मिळाल्यामुळे ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन (एआयएमआयएम) तर्फे सलग तीन दिवस बेमुदत उपोषण करण्यात आले. शेवटी अकोला महानगरपालिकेकडून लेखी आश्वासन मिळाल्यानंतर उपोषण मागे घेण्यात आले.या उपोषणाचे नेतृत्व आसिफ अहमद खान व जावेद पठाण यांनी केले. सलग तीन दिवस अकोला मनपा मुख्यालयाबाहेर त्यांनी बेमुदत उपोषण सुरू ठेवले. ज्यामध्ये अनेक



झोपडपट्टी भागातील नागरिकांनीही सहभाग घेतला. मनपाच्या वतीने उपायुक्त विजय पारतवार आणि नगररचना अधिकारी गावंडे यांनी उपोषणस्थळी येऊन आंदोलनकर्त्यांना लेखी आश्वासन दिले की, प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत प्रभाग क्रमांक १, २ आणि ७ मधील पात्र नागरिकांना न्याय मिळावा यासाठी आवश्यक कार्यवाही तत्काळ सुरू करण्यात येईल. मनपाच्या अधिका-यांनी उपोषण मागे घेण्याची लेखी विनंतीही केली, त्यानंतर एआयएमआयएमच्या पदाधिका-यांनी उपोषण स्थगित केले. दरम्यान, शासकीय रुग्णालयातील डॉक्टर्सची टीम उपोषणस्थळी दाखल झाली होती. डॉक्टरांनी उपोषणकर्त्यांची तब्येत खालावल्याचे सांगून त्यांना रुग्णालयात दाखल होण्याचा सल्ला दिला.

# शासकीय सोयाबीन खरेदी १५ नोव्हेंबरपासून

**अकोला :** शासकीय सोयाबीन विक्रीसाठीची नोंदणी सध्या सुरू असून, प्रत्यक्षात खरेदीची प्रक्रिया शनिवार, १५ नोव्हेंबरपासून सुरू होणार आहे. पुढील ९० दिवसांपर्यंत ही खरेदी होणार आहे. दरवर्षी ऑक्टोबर महिन्यात हमी भावाने सोयाबीनची खरेदी सुरू होते. मात्र, यंदा ऑक्टोबर महिना संपत असतानाही सोयाबीन खरेदीला मुहूर्त मिळाला नाही. खरिपात प्रचंड नुकसान झाल्याने शासकीय खरेदी लवकर सुरू होण्याची अपेक्षा शेतकऱ्यांना होती. शासनाने यंदा प्रती क्विंटल ५३२८ एवढा हमीभाव निश्चित केला आहे. सध्या सोयाबीन काढणी अंतिम टप्प्यात आहे. अल्पभूधारक शेतकऱ्यांनी खुल्या बाजारात सोयाबीनची विक्री करत आहे. खुल्या बाजारात ४ हजार ते ४४७० एवढा भाव भाव मिळाला.

MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

## E-Tender Notice

Chandrapur Super Thermal Power Station MAHAGENCO, invites bid offers from reputed and experienced Companies to Participate in the Competitive bidding Process to following O&M Tenders.

| S. N. | Tender NO (Rfx No) / Descricption / Estimated Cost in Rs. |
|---|---|
| 1 | EM-II / Rfx No. 3000063045 / Annual Maintenance Contract for Lighting and misc electrical works at various locations of Unit-5, 6, 7 & ODP for 2 years CTPS, Chandrapur / Rs. 9902159.20/- |
| 2 | BM-II / Rfx No. 3000063080 / Work of IN-SITU repairing and servicing of various High-pressure Valve Actuators at Unit-5 AOH & at U-6 during Shut Down, 500 MW, CSTPS, Chandrapur / Rs.748219/- |
| 3 | TM-I / Rfx No. 3000063040 / Work of Painting of various tanks, coolers & pipelines on turbine side at Unit-3 & 4, CSTPS, Chandrapur as and when required basis / Rs. 827612.50/- |
| 4 | TECH / Rfx No. 3000063145 / Managing of Chummery Guest House at CSTPS, Chandrapur as per scope of work for two years / Rs.14342955/- |
| 5 | CHP-D / Rfx No. 3000063049 / Procurement of Apron Feeder Chain Links and Pan Bolts installed at CHP-D CSTPS / Rs.4085100/- |

Above floated tender published in MAHAGENCO online Portal. For the detailed Tender document, interested bidders should visit SRM Website **https://eprocurement. mahagenco.in for (Sr. No. 01 to 05)** For any query Contact No. 8554991818.

**Sd/-**
**CHIEF ENGINEER (O&M)**
**CSTPS, CHANDRAPUR**

# १०९८ बाल हक्कांचा जीवनदायिनी धागा

■अकोला,दि ८ (प्रतिनिधी) :
मुले म्हणजे राष्ट्राचे भविष्य, आणि या भविष्याला सुरक्षित, निरोगीआणि आनंदी ठेवणे ही आपली सर्वांची जबाबदारी आहे. दुर्दैवाने,आजही अनेक बालकं शोषण, अत्याचार, घरगुती हिंसा, भिक्षामागणारी मुलं, बालमजुरी किंवा दुर्लक्ष यांसारख्या समस्यांना सामोरं जात आहेत. अशा प्रत्येक वेळी 'चाइल्ड हेल्पलाईन - १०९८' हाक्रमांक त्या बालकांसाठी आशेचा किरण ठरतो. ही सेवा भारत सरकारचा महिला व बालविकास मंत्रालयांतर्गत चालवली जाते आणि ती पूर्णपणे मोफत व २४ तास उपलब्ध असते. या क्रमांकावर कोणतीही मुल संकटात असलेलं, हरवलेलं किंवा त्रासात असलेलं ङ्ख थेट फोन करून मदत मागू शकतं.

तसंच, नागरिकांनाही एखाद्या बालकावर होणारा अन्याय, अत्याचारकिंवा दुर्लक्ष दिसल्यास १०९८ वर फोन करून तात्काळ माहिती देता येते.या सेवेच वैशिष्ट्य म्हणजे ती केवळ ऐकून घेत नाही, तर कृती करते.फोन मिळाल्यानंतर चाइल्डलाइनची स्थानिक टीम तात्काळ घटनास्थळी पोहोचवते, पोलिस, बाल कल्याण समिती आणि सामाजिक




संस्थांशी समन्वय साधून त्या बालकाला सुरक्षित ठिकाणी नेते. नंतर त्या मुलाला निवारा, अन्न, वैद्यकीय मदत, समुपदेशन, शिक्षण आणि आवश्यक असल्यास पुन्हा कुटुंबाशी पुनर्वसन यासारखी मदत दिली जाते.ही हेल्पलाईन फक्त एक क्रमांक नाही, तर हजारो मुलांच्या आयुष्यातील उजेडाचा दरवाजा आहे. अनेक मुलांना या माध्यमातून नवीन जीवन मिळालं आहे काही शाळेत परतले, काहींच आयुष्य सुरक्षित झालं, तर काहींना प्रेमळ आश्रय मिळाला.

# चोरट्यांनी ट्रॅक्टरच पळवला

**अकोला :** बोरगाव पोलिस स्टेशन अंतर्गत मंजु असलेल्या पळसो बढे येथील शेतकरी विशाल रेवस्कर यांचा ट्रॅक्टरच ट्रॉलीसह अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना समोर आली असून या प्रकरणी अज्ञात आरोपीविरुध्द बोरगाव मंजु पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. दि. ५ नोव्हेंबर रोजी रेवस्कर यांनी सायंकाळी शेतातील कापसाचे गाठोडे आणल्यानंतर रिकामा ट्रॅक्टर क्र. एम.एच. ३० ए. झेड. ८१९२ व ट्रॉली क्र. एम. एच. २८ ई. ११७ अंदाजे किंमत ५ लाख रुपये आपल्या राहत्या घरामागे राहणाऱ्या देवीकर यांच्या घरासमोर उभा करुन ठेवला होता. सकाळी मात्र हा ट्रॅक्टर व ट्रॉली उभा करुन ठेवलेलाही आढळून आला नाही. त्यामुळे बोरगांव मंजु पोलिस स्टेशनला तक्रार दाखल करण्यात आली. ट्रॅक्टर चोरीच्या या घटनेमुळे ग्रामीण कास्तकार भयभीत झाले आहे. पोलिस विभागाकडून राबविल्या जात असलेल्या प्रहारचा प्रभाव कमी होऊ लागला आहे. आणि गुन्हेगारांना भयवाटेनासे झाले आहे. अशी धारणा ग्रामस्थांची होत आहे.

# कार्तिक पौर्णिमेनिमित्त शुकदास महाराजांना अभिवादन

**मूर्तीजापूर :** कार्तिक पौर्णिमेनिमित्त शुकदास महाराज यांना अभिवादन करण्यात आले. जीवनात प्रत्येक माणसाला एका गुरुची आवश्यकता असते. योग्य मार्गदर्शन आणि नेतृत्व समाजात एक चांगला माणूस म्हणून उभे राहण्याचे उदाहरण ठरते. त्यामुळे चांगले जीवन जगण्यासाठी संतांचे आशीर्वाद मिळणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन हिवरा आश्रमाचे विश्वस्त व मूर्तिजापूर येथील सुभाष दूध डेअरीचे संचालक तसेच नुकतेच निवडून आलेले जिल्हाध्यक्ष, दूध उत्पादक संघ अकोला येथील अध्यक्ष प्रशांत हजारी यांनी केले.या प्रसंगी आमदार अमित झनक व प्रशांत हजारी यांनी शुकदास महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. कार्तिक पौर्णिमेच्या शुभप्रसंगीआदिवासी समाजाचे तीर्थक्षेत्र असलेल्या भौंरद येथे भगवान मल्लकेश्वर मंदिराच्या परिसरात गुरुवर्य शुकदास महाराज यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ भव्य शोभायात्रा व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.गेल्या अनेक वर्षांपासून हा उत्सव आदिवासी बांधवांकडून अत्यंत उत्साहात व आनंदात साजरा केला जातो. सुमारे ४० वर्षांपूर्वी महाराजांनी येथे शाळा आणि रुग्णसेवा सुरू करून आदिवासी बांधवांना अशिक्षा आणि अंधश्रद्धेच्या जोखडातून बाहेर काढून त्यांच्या जीवनातज्ञानाचा प्रकाश आणला. आजयेथे सुमारे ५० हजार आदिवासी बांधव तसेच शहरांतील उच्चभ्रू लोकांनी एकत्र बसून महाप्रसादाचा लाभ घेतला. या कार्यक्रमास आमदार अमित झनक व प्रशांत हजारी यांची सामाजिक विषयावर चर्चा झाली. शिक्षण घेऊन मोठे अधिकारी, व्यापारी बनलेले अनेक माजी विद्यार्थीही उपस्थित होते.

RNI NO-46973/1986 Mahasagar Akola
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak. Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak. **Local Editor** Purushottam Madhukarrao Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८८ महासागर अकोला
**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, मिला स्केअर, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक**
**स्थानिक संपादक : *पुरूषोत्तम मधुकरराव ढोले, फोन : ९८८१४८९४७९* (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील.)**

# १ ट्रिलियन डॉलर म्हणजे किती रे भाऊ?

जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती एलन मस्क यांनी पुन्हा एकदा असे काही साध्य केले आहे जे कॉर्पोरेट इतिहासात कधीही घडले नाही. असे कधीच घडले नाही. टेस्ला कंपनीचे सीईओ म्हणून त्यांना एक ट्रिलियन डॉलर्सच्या सॅलरी पॅकेजसाठी मान्यता मिळाली आहे. भारतीय रुपयांमध्ये ही रक्कम 88 लाख कोटींच्या बरोबरीची आहे. एवढी रक्कम मोजण्यासाठी दोन्ही हातांची बोटे कमी पडतील. मेंदू कदाचित ते प्रक्रिया करू शकत नाही. अखेर एक ट्रिलियन डॉलर्स म्हणजे किती मोठी रक्कम असते, त्यातून काय खरेदी करता येते आणि ते कसे मिळवायचे? मस्क यांना काय करावे लागेल?

---------------

एक ट्रिलियन डॉलर्सच्या पगार पॅकेजसह मस्क काय खरेदी करू शकतात? असा प्रश्न अनेकांना भेडसावत असावा. तर एखाद्याचे उत्पन्न किती आहे हे समजून घेण्याचा एक मार्ग म्हणजे त्या रकमेतून काय खरेदी करता येईल ते पाहणे. मस्क सैद्धांतिकदृष्ट्या त्यांच्या १ ट्रिलियन डॉलर्सच्या वेतन पॅकेजचा वापर अनेक देश खरेदी करण्यासाठी आणि मंगळावर जाण्यासाठी करू शकतात. मंगळावर वसाहत स्थापन करू शकतात.

देश विकत घेणे ही फक्त एक काल्पनिक गोष्ट आहे, परंतु जर एखादा देश कधीही विकला गेला तर त्याचे मूल्य मोजण्याचे सर्वात योग्य साधन म्हणजे त्याचा जीडीपी.

सौदी अरेबिया आणि नेदरलँड्सचा जीडीपी सुमारे १.२ ट्रिलियन डॉलर्स आहे. त्यानुसार, मस्क त्यांच्या पॅकेजमध्ये आणखी काही बचत जोडून या देशांना खरेदी करू शकतात. जर फक्त पॅकेजेसमध्ये खरेदी करायची असेल, तर ०.९३ ट्रिलियन डॉलर्सच्या जीडीपीसह स्वित्झर्लंडदेखील पर्याय असू शकतो.

जर मस्क यांना दोन देश खरेदी करायचे असतील तर ०.५४ ट्रिलियन डॉलर्सच्या जीडीपीसह सिंगापूर आणि ०.५४ ट्रिलियन डॉलर्सच्या जीडीपीसह इस्त्रायलदेखील एक पर्याय असू शकतो.

जगातील सर्व देशांचा एकूण जीडीपी १११ ट्रिलियन डॉलर्स आहे. त्यापैकी फक्त १९ देशांचा जीडीपी एक ट्रिलियन डॉलर्सपेक्षा जास्त आहे. उर्वरित १७० हून अधिक देशांचा जीडीपी यापेक्षा कमी आहे. मस्क यांच्याकडे १७० हून अधिक देश खरेदी करण्याचे पर्याय आहेत.



### मंगळावर बांधता येईल १० लाख लोकसंख्येचे शहर

सध्या मस्क यांची स्पेसएक्सच्या अंतराळयानाद्वारे एक टन वस्तू अवकाशात पाठवण्याचा खर्च २ लाख डॉलर्स आहे. येत आहे. मस्क यांना हा खर्च कमी करायचा आहे. मस्क म्हणाले होते की जर प्रति टन खर्च एक लाख डॉलर्स असेल तर दहा लाख टन वस्तू पाठवणे शक्य होईल. हा खर्च १०० अब्ज डॉलर्स असेल. हा मस्क यांच्या पॅकेजचा दहावा भाग आहे.

नासाच्या मते, मंगळावर शहर बांधण्याचा एकूण खर्च ६०० अब्ज डॉलर्स असेल. याचा अर्थ मस्क यांच्याकडे वसाहतीच्या उर्वरित खर्चासाठी पुरेसे पैसे शिल्लक राहतील.

तथापि, मंगळावर जिवंत शहर स्थापन करण्यात मोठी आव्हाने आहेत. मस्कची स्पेसशिप कंपनी, स्पेसएक्सने मंगळावर अशा वसाहतीची कल्पना केली आहे.

नौदलातील सर्वात महागडे साधन म्हणजे विमानवाहू जहाजे. अमेरिकेतील सर्वात प्रगत आणि अणुऊर्जेवर चालणारी विमानवाहू जहाज 'गेराल्ड आर फोर्ड' आहे. त्याची किंमत अंदाजे १३ अब्ज डॉलर्स आहे. मस्क यांच्या पॅकेजमधून अशा ७७ युद्धनौका खरेदी करता येतील. तथापि, अमेरिकेकडे सध्या असे फक्त एकच जहाज आहे, तर अमेरिकन नौदलाकडे सध्या एकूण ११ विमानवाहू जहाजे आहेत.

अमेरिकेतील चार सर्वात श्रीमंत स्पोर्ट्स लीग म्हणजे NFL, NBA, MLB आणि NHL. या सर्व १२४ संघांची किंमत ५१० अब्ज डॉलर्स आहे. याशिवाय, युरोपमधील टॉप ५ फुटबॉल लीग - इंग्लिश प्रीमियर लीग, ला लीगा, बुंडेस्लिगा, सेरी ए आणि लीग १. जर या ९६ संघांचा समावेश केला तर सर्वांचे एकूण मूल्य अंदाजे १९३ अब्ज डॉलर्स आहे. म्हणजे सर्व संघ खरेदी केल्यानंतरही, मस्क यांच्याकडे सुमारे ३०० अब्ज डॉलर शिल्लक राहतील. जर मस्क यांनी आयपीएल आणि त्याच्या सर्व संघांना खरेदी केले तर त्यांना फक्त २.५ अब्ज डॉलर द्यावे लागतील.

५ सर्वात श्रीमंत स्टुडिओमध्ये पहिले नाव वॉल्ट डिस्नेचे आहे. त्याचे मूल्यांकन २१० अब्ज डॉलर्स आहे. त्यानंतर सोनी, युनिव्हर्सल स्टुडिओ, वॉर्नर ब्रदर्स डिस्कव्हरी आणि पॅरामाउंट ग्लोबल यांचा क्रमांक लागतो. जर मस्क यांनी हे पाच खरेदी केले तर त्यांना ५७४ अब्ज डॉलर्स खर्च करावे लागतील. वाचवलेल्या पैशात काही रक्कम जोडून ते सुमारे ४६५ अब्ज डॉलर्सच्या मूल्यांकनासह नेटफ्लिक्सदेखील खरेदी करू शकतात.

जगातील १० सर्वात मोठ्या विमान कंपन्यांमध्ये डेल्टा, युनायटेड, सिंगापूर, एअर चायना आणि टर्किश यांचा समावेश आहे. जर आपण या सर्वांचे बाजारमूल्य मोजले तर ते २३२ अब्ज डॉलर्स इतके आहे. जरी मस्क यांनी हे सर्व विकत घेतले तरी त्यांच्या पॅकेजमध्ये ७०० अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त रक्कम शिल्लक राहील.

टोयोटा, शाओमी, बीवायडी, फेरारी एनव्ही, जनरल मोटर्स, मर्सिडीज-बेंझ ग्रुप, फोर्ड मोटर्स, बीएमडब्ल्यू एजी आणि होंडा या सर्व मोठ्या कार कंपन्यांचे मूल्यांकन सुमारे ९५६ अब्ज डॉलर्स आहे. जरी मस्क यांनी हे सर्व विकत घेतले तरीही त्यांच्याकडे जगातील अनेक अब्जाधीशांपेक्षा जास्त पैसे शिल्लक राहतील.

जगातील सर्वात महागडे शहर न्यूयॉर्क आहे. त्याच्या घरांचे मूल्य म्हणजेच प्रत्येक घर, इमारत किंवा कोणत्याही प्रकारच्या रिअल इस्टेट मालमत्तेचे एकूण मूल्य ४.६ ट्रिलियन डॉलर्स आहे.

या यादीत नवव्या क्रमांकावर अमेरिकेतील कॅलिफोर्नियातील सॅन दिएगो शहर आहे. ते अलीकडेच १ ट्रिलियन डॉलर गृहनिर्माण बाजार क्लबमध्ये सामील झाले आहे. तर मुंबईतील घरांची किंमत सुमारे ९५१ अब्ज डॉलर्स आहे. जर मस्क यांना हवे असेल तर ते संपूर्ण सॅन दिएगो आणि मुंबई खरेदी करू शकतात.

मस्क यांना १ ट्रिलियन डॉलर्सचे पगार पॅकेज हे वार्षिक नाही, तर १० वर्षांत दिले जाणारे आहे. 'पे पॅकेज' ६ नोव्हेंबर रोजी टेस्लाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ७५% भागधारकांनी या निर्णयाला मान्यता दिली. हा निर्णय प्रत्यक्षात एक करार आहे, ज्याअंतर्गत मस्क यांना १२ टप्प्यांत एकूण १ ट्रिलियन डॉलर्स मिळतील. ही रक्कम टेस्लाच्या शेअर्सच्या स्वरूपात मिळेल.

सध्या टेस्लाकडे सुमारे ३५२ कोटी शेअर्स आहेत. यापैकी मस्क यांच्याकडे सुमारे १३% म्हणजेच ४१ कोटी शेअर्स आहेत. या करारानुसार, त्यांना सुमारे १२% म्हणजेच ४१ कोटी शेअर्स अधिक मिळतील. तथापि, कराराच्या प्रत्येक भागाशी काही अटी जोडल्या आहेत, ज्या मस्क आणि त्यांच्या कंपनीला पूर्ण कराव्या लागतील...

सध्या टेस्लाचे बाजारमूल्य १.५ ट्रिलियन डॉलर्स आहे. कंपनीचे मूल्य २ ट्रिलियन डॉलर्सपर्यंत पोहोचल्यावर मस्क यांना पॅकेजचा पहिला भाग मिळेल. त्यानंतर, कंपनीचे मूल्य प्रत्येक वेळी ५०० मिलियन डॉलर्सने वाढून ८.५ ट्रिलियन डॉलर्सपर्यंत पोहोचेल, अगदी मस्क यांनाही वाटा मिळत राहील.

टेस्लाने २००८ मध्ये कार बनवण्यास सुरुवात केली, आतापर्यंत टेस्ला फक्त ८० लाख कार बनवू शकली आहे. पुढील दहा वर्षांत त्यांना १.२ कोटी अधिक कार बनवाव्या लागतील.

पॅकेजचा दुसरा भाग टेस्लाकडे १० लाख रोबोटॅक्सी असतील तेव्हा उपलब्ध होईल. हे काम गेल्या काही महिन्यांपासून सुरू आहे. सध्या ऑस्टिन शहरात काही रोबोटॅक्सी कार्यरत आहेत.

टेस्ला 'ऑप्टिमस' नावाचा एक ह्युमनॉइड रोबोट बनवत आहे. सध्या त्याचे सुरुवातीचे नमुने बनवण्यात आले आहेत. अटीनुसार, कंपनीला १० लाख ऑप्टिमस बनवावे लागतील, ज्याची अंदाजे किंमत सुमारे २०,००० डॉलर्स आहे. संपूर्ण पॅकेज मिळविण्यासाठी, मस्क यांना २०३५ पर्यंत कंपनीत नेतृत्वाच्या भूमिकेत राहणेदेखील आवश्यक आहे.

# 'अजात' चे मॉडेल जगाला देणारे समाज सुधारक गणपती महाराज

**(कालच्या अंकावरून पुढे)**

याच समाजाने अनेकवेळा गणपती महाराजांचा सवर्णांच्या तावडीतून सोडविले, वाचविले, सवर्णांनी त्यांना जिवंत होळीत जाळण्याचा प्रयत्न केला होता, परंतु 'अजात' मानव समाजाने तो निष्प्रभ करून टाकला आणि त्यामुळे संस्थेची चौकट अधिक मजबूत केली



जातीच्या आधारावर सवलती देणाऱ्या सरकारने आणि त्या सवलती उचलणाऱ्या समाजाने अजात मानव समाजाचा कधीही विचार केला नाही, 'जात' ही व्होटबॅंक असल्यामुळे तिचे महत्व कमी होत नाही. राजकीय सामाजिक जीवनात मानवाला अर्थ असताना विशिष्ट जातीचे लोक विशिष्ट सवलती आपल्या पदरी पाडून घेत असताना 'अजात' असलेल्या समाजाने सवलतीसाठी आपले हात सरकार व समाजापुढे पसरविले नाही.

**अरूण सोपानराव कराळे**
**दत्तवाडी, नागपूर.**
**९०९६३२६२७२**

सार्वजनिक ठिकाणी, चावडीवर, देवळात अस्पृश्यांना प्रवेश देण्याच्या संदर्भात साने गुरुजी व त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आंदोलने उभारलीत. डॉ. आंबेडकरांमुळे दलितांना नवजीवन प्राप्त झाले. पण त्या अगोदर भट आणि पुरोहितशाहीला शह देण्याचे, प्रस्थापितांच्या विरोधात दंड थोपटण्याचे, अस्पृश्यता समूळ निवारण्याचे महान कार्य पूर्वी हरिभक्त परायण असलेल्या गणपती महाराजांनी जे केलं त्याला जगाच्या इतिहासात तोड नाही.

साऱ्या समाजसुधारकांच्या यादीत समाजसुधारणेचा बादशहा शोभावा, असा हा समाजसुधारक. त्यांच्या या कार्याबद्दल त्यांचा नागपूरच्या भोसल्यांनी, कोल्हापूरच्या शाहू महाराजांनी इतकेच नव्हे, तर म. गांधीजींनी त्यांचा गौरव केला. सन्मान केला.

गणपती महाराजांनी साऱ्या जगाला आदर्श मानव समूहाच एक मॉडेल दिलं. त्यात कोणतीही जात कोणत्याही मानवसमूहाला चिकटली नाही.

जात नाही, वर्णाभिमान किंवा वर्गाभिमान नाही. मानवतेच्या समानतेच्या रांगेत अखिल मानव समाजाला त्यांनी एकाच पंक्तीत बसविले.जातीत माणूस नाही. माणूस हीच एक जात. आम्ही जात्याभिमानी नाही. जात-पात-धर्मभेद हे ईश्वरनिर्मित नसून मानवनिर्मित आहे म्हणून जातीचं जोखड मानेवर ठेवून जीवन जगण्याची आवश्यकता नाही.

जातीवरून माणसांची उच्च-नीचता ठरविली जात असेल; माणसाच्या व्यक्तिमत्त्वावर, त्यांनी प्रस्थापित केलेल्या समाजावर विपरीत परिणाम होणार असेल किंवा संपूर्ण मानवसमाज उन्नत होणार नसेल, विकसित होणार नसेल तर ती जात काढून टाकणे आवश्यक आहे. त्यापेक्षा 'अजात' बरी आहे.

जातीतून माणूस ओळखला जात असेल अन मेल्यावरही जात सुटत नसेल, तर ती जात नष्ट करणे हे मानवजातीच्या हितासाठी आवश्यक आहे.

■ ■ ■

# भारतीय निवडणूक आयोगाने आपली स्वायत्तता सिध्द करावी

भारतीय निवडणूक आयोगाची स्थापना २५ जानेवारी १९५० रोजी झाली. हा दिवस ' राष्ट्रीय मतदार दिन ' म्हणून साजरा केला जातो. भारतीय निवडणूक आयोग नावाची संस्था असते. ती संपुर्ण देशातील निवडणूकीवर आपले नियंत्रण ठेवून असते. हे जनतेला तेंव्हा कळले जेंव्हा टी.एन.शेषन सारखे निवडणूक आयुक्त भारतीयांना लाभले.

त्यांनी बिहार मधील निवडणूकीतील गुंडागर्दीला आळा घातला. अनेक राजकारणी लोकांना निवडणूक आयोगाचा हिसका दाखवून सळो की पळो करून सोडले. मतदान केंद्र ताब्यात घेऊन, अधिकारी व कर्मचारी लोकांना धमकावून बॅलेट पेपरच्या पेट्या पळवून नेल्या जात होत्या. मतदारांना हाकलून लावून बॅलेट पेपरवर शिक्के मारून मतपेटीत टाकले जात होते. या सर्व प्रकारांना शेषन यांनी आळा घातला होता. म्हणून आजही त्यांचे स्थान मतदारांच्या हृदयात स्थिर आहे.



**मिलिंद गड्डमवार**
**(मुक्त पत्रकार)**
**राजुरा जि. चंद्रपूर.**
**9511215200**

भारतीय संविधानाच्या कलम ३२४ नुसार स्थापन केलेली निवडणूक आयोग ही एक स्वायत्त संस्था आहे. ती देशातील सर्व निवडणूकांचे संचलन करते आहे. यावर नियंत्रण ठेवते आहे. निवडणूकीच्या काळात केंद्र व राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचा निवडणूकीसाठी वापर केला जातो आहे.

निवडणूकीसाठी स्वतंत्र यंत्रणा नसल्याने निवडणूकीच्या काळात सर्व सरकारी कार्यालयातील दैनंदिन कारभार हा प्रभावीत होतो आहे. यामुळे जनतेची कामे रखडली जातात आहेत. भारतात वर्षभर कुठे ना कुठे निवडणूका या सुरूच असतात. यासाठी मनुष्यबळ आयात करावे लागते आहे.

निवडणूक आयोगाकडे मनुष्यबळाची कमतरता असल्याने मतदार यादी ही अद्ययावत केली जात नाही. यामध्ये अनेक चुका आढळून येतात. यात वारंवार योग्य त्या सुधारणा करून सुधारीत यादी मतदारांसमोर ठेवणे हे निवडणूक आयोगाचे काम आहे. परंतु असे होत नसल्याने आणि या सुधारणांसाठी अधिकारी वर्गाला जवाबदार पकडण्यात येत नसल्याने मतदार यादीतील गोंधळात दिवसेंदिवस वाढ होतांना दिसते. हे लोकशाही व्यवस्थेसाठी चांगले लक्षणं नाही.

निवडणूक आयोगावर अनेक प्रकारचे आरोप होत आहेत. ते याच कारणाने. निवडणूक आयोग विरोधकांना विश्वासात घेऊन निवडणूक तारखा जाहीर करीत नाही असा आरोप केला जातो आहे. मतदानासाठी जाणाऱ्या मतदारांना कुठल्याही सोयी सुविधा पुरविल्या जात नाहीत. भर उन्हात, पावसात मतदान करावे लागते आहे. साधी पिण्याच्या पाण्याची, बसण्याची पणं सोय केली जात नाही.

मतदान हे ठरलेल्या वेळेतच झाले पाहिजे. याचे तंतोतंत पालन केले गेले पाहिजे. यासाठी उमेदवारांनी व पक्षांनी पणं साथ दिली पाहिजे. शेवटच्या तासात, टप्प्यात पैसे घेऊन मतदान करणारे तसेच बोगस मतदान करणारे सक्रीय होतात. त्यांना विविध पक्षांचे पाठबळ असल्याने पोलींग बुथवर गर्दी होत असते. याकडे सर्वच राजकीय पक्ष दुर्लक्ष करतात.

निव्वळ निवडणूक आयोगावर आगपाखड करणे सोपे काम असते.नवनवीन तंत्रज्ञान वापरून कुठूनही मतदान हे करता आले पाहिजे. तरच बोगस मतदानाची टक्केवारी ही कमी होऊ शकते. यामुळे मतदानाच्या टक्केवारीत पणं वाढ होऊ शकते. ईव्हीएमचे महत्व कमी करण्यासाठीचे उपाय शोधून काढले गेले पाहिजे.ते न करता ईव्हीएम वर सारा दोष टाकून मोकळे होने हे सोपे काम झाले आहे.

भारतीय निवडणूक आयोगाने मतदारांच्या प्रश्नांना बगल देता कामा नये. त्याची समाधानकारक सोडवणूक झाली पाहिजे.मतदार हा मतदानाप्रती आस्वस्थ असला पाहिजे. एकूण झालेले मतदान आणि प्रत्यक्षात पडलेले मतदान याचे आकडे जुळले गेले पाहिजेत. मतदान केल्यानंतर कुणाला मत पडले हे मोबाईलवर कळण्याची व्यवस्था करण्यात यावी.

मतदानाचा ओटीपी मोबाईलवर आला पाहिजे. आता तर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीत मोबाईल मतदान केंद्रावर नेण्यासाठीची बंदी ही घातली गेली आहे. हा मतदारांच्या गळचेपीचा प्रकार आहे.तो निषेधार्ह आहे.

मतदार जर आपल्या मतदानाप्रती शासंक असेल तर हे चांगले लक्षणं ठरू शकत नाही. लोकशाही प्रक्रीयेसाठी हे चांगले लक्षणं ठरू शकत नाही.याची नोंद निवडणूक आयोगाने घेतली पाहिजे.

■ ■ ■

# आमचं अस्तित्व आमच्या प्रतिभेवर उभं

भारताच्या कन्यांनी पुन्हा एकदा जगाला दाखवून दिलं की, क्रीडा म्हणजे केवळ विजय किंवा पराभव नाही. ती असते आत्मा, मूल्यं आणि देशाचं स्वाभिमान उचलून धरण्याची जिद्द! महिला क्रिकेटच्या अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिका संघ हरला, पण हा पराभव केवळ स्कोअर बोर्डवरचा आहे. वास्तविक, हरले मनुचे विचार, ते विचार जे स्त्रियांना सीमांत ठेवू पाहतात. तरीही या पराभवात एक गूढ विजय दडलेला आहे. हा विजय आहे संविधानाचा, समतेचा आणि स्त्रीशक्तीच्या उदयाचा!




काल मैदानावर भारतीय कन्या दमदार खेळत होत्या. घाम, मेहनत आणि आत्मविश्वासाने भरलेल्या! त्यांच्या प्रत्येक चौकारात आणि झेलात एक घोषणा होती. आम्ही दुर्बळ नाही, आम्ही भारताची शक्ती आहोत. कधीकाळी स्त्रियांना घरापुरतं मर्यादित ठेवणाऱ्या मनुस्मृतीच्या विचारांनी त्यांना दुर्बळ, गौण ठरवलं. पण जेव्हा स्मृती मंधाना, हरमनप्रीत, जेमिमाह आणि दीप्ती यांसारख्या मुली चौकार-षटकारांनी मैदान दणाणवतात, तेव्हा मनुचे सगळे नियम धुळीला मिळतात. त्या प्रत्येक धावेमागे स्त्रीच्या शतकानुशतकांच्या संघर्षाची प्रतिध्वनी होती. तो झंकार होता बदलाचा, समानतेचा आणि आत्मसन्मानाचा.



**प्रविण बागडे**
**नागपूर.**
**9923620919**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेलं भारतीय संविधान हे केवळ कायद्याचं पुस्तक नाही, ते आहे सामाजिक न्यायाचं जिवंत घोषवाक्य आणि ते सामाजिक न्यायाचा प्राण आहे. महिला क्रिकेट संघाने त्या तत्त्वांना प्रत्यक्षात उतरवलं आहे. जात, धर्म, प्रांत, वर्ग, किंवा लिंग यांच्या पलिकडे जाऊन, केवळ भारतीय म्हणून खेळणं!

कशाला ही न जुमानता केवळ भारत या नावाने त्यांनी जगाशी सामना केला.

मैदानावर धावताना या मुली सांगत होत्या, आम्ही समानतेसाठी झगडणाऱ्या भारताच्या मुली आहोत.

हो, निकाल आपल्या बाजूने नव्हता, पण मैदानावर भारतीय झेंड्याखाली उभ्या असलेल्या त्या बारा मुलींच्या नजरेत जो आत्मविश्वास होता, तो हजार विजयांपेक्षा मोठा होता आणि तीच खरी क्रांती होती. त्यांनी दाखवून दिलं की पराभवातही क्रांती असते. तो पराभव होता जुन्या रूढींचा आणि विजय होता नव्या स्त्रीशक्तीचा.

त्यांनी सिद्ध केलं की भारतात आज स्त्रिया फक्त खेळत नाहीत, त्या इतिहास लिहित आहेत. त्या ह्यमनुच्या पराभवाचा आणि संविधानाच्या विजयाचा साक्षात पुरावा आहेत.

हा सामना हरल्यावर आपण डोकं खाली न करता, संविधानाच्या मूल्यांनी प्रेरित होऊन उंचावलेलं ठेवलं पाहिजे. कारण ही लढत केवळ क्रिकेटची नव्हती, चेंडू आणि बॅटची नव्हती. तर ती होती विचारांची, समतेची, आणि मानवी प्रतिष्ठेची. आज मनु हरला हे फक्त वाक्य नाही, तर तो एक इतिहासाचा क्षण आहे, जो सांगतो की भारत आता पूर्णपणे नव्या युगात प्रवेश करत आहे, जिथे प्रत्येक मुलगी स्वतःचं स्वप्न स्वतः लिहिते आणि प्रत्येक विजयात संविधानाचा नाद घुमतो!

आता भारतीय समाजाला खरी ओळख मिळाली आहे. त्यांनी दाखवून दिलं की महिला क्रिकेट संघाचं हे पराभवातील यश आपल्याला सांगून जातं. विजय म्हणजे फक्त ट्रॉफी नव्हे; समानतेचं आणि सन्मानाचं रक्षण हाच खरा विजय आहे. भारतीय महिला क्रिकेट संघाला आपण सलाम करतो. जयहिंद!!

■ ■ ■

## वंदे मातरम भारतीय संस्कृतीच्या रक्षणाचा उद्घोष

**वाचक लिहितात**

भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील प्रेरणा गीताला सात नोव्हेंबर या दिवशी १५० वर्षे पूर्ण झाली. स्वातंत्र्य यज्ञवेदीतील समिधा ठरलेल्या वंदे मातरम या गीताला राष्ट्रीय गीताचा दर्जा देण्याचा निर्णय संविधान सभेने २४ जानेवारी १९५० या दिवशी घेतला.

वंदे मातरम या दोन शब्दांच्या उच्चाराने सहस्त्रो भारतीयांनी देशासाठी स्वतःच्या प्राणांचा त्याग केला आणि लाखो भारतीय स्वातंत्र्य संग्रामात सहभागी झाले.

वंदे मातरम या शब्दाचा दुसरा अर्थ त्याग, बलिदान, हौताम्य आणि राष्ट्रप्रेम आहे परंतु याकडे धर्माच्या चष्म्यातून पाहणारे काही जण राष्ट्रीत्वाचे प्रतीक असलेले वंदे मातरम म्हणायला सिद्ध नाहीत. राष्ट्रीयत्वापेक्षा जे लोक कट्टर वादाकडे झुकत असतील तर ते भविष्यात भारतीय राज्यघटना,कायदे, संसद आणि संस्कृती यांवारही आक्षेप घ्यायला कमी करणार नाहीत.

वंदे मातरम राष्ट्रीयत्वाचा जागर आहे. प्रत्येकाने राष्ट्रीयत्व जपायला हवे. वंदे मातरम कोणत्या धर्माचे धोतक नाही तर राष्ट्रीयत्वाचे धोतक आहे.

वंदे मातरमच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने याचा जागर सामूहिक गायन, परिसंवाद, चर्चासत्रे, प्रदर्शने,निबंध स्पर्धा,वक्तृत्व स्पर्धा,फलक प्रसिद्धी आदी विविध माध्यमातून करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला आहे आपण सर्वांनी त्यात मोठ्या संख्येने सहभागी होऊन आपले राष्ट्रप्रेम जोपासू या.

■ **लीना मकरंद गाडगीळ, पनवेल**

## वंदे मातरम् : देशभक्तीची अखंड प्रेरणा

भारताचे राष्ट्रगीत वंदे मातरम् याची रचना बंकिमचंद्र चटर्जी यांनी केली. स्वातंत्र्याच्या महासंग्रामात या गीताने असंख्य स्वातंत्र्यसेनानींच्या हृदयात देशप्रेमाची ज्योत प्रज्वलित केली.

वंदे मातरम् हे केवळ गीत नाही, तर भारतीय स्वातंत्र्यलढ्यात क्रांतीकारकांना इंग्रजांविरुद्ध लढण्यासाठी शक्ती देणारा महामंत्र होता.

वंदे मातरम् म्हणजे स्वातंत्र्याचा संकल्प आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची ताकद!

स्वातंत्र्यपूर्व काळात हे गीत परकीय सत्तेविरुद्ध वापरण्यात आलेले प्रेरणास्त्रोत व शस्त्र होते. तसेच समाजात एकता निर्माण करण्याचे कार्य या गीताने तेव्हापासून ते आजपर्यंत केले आहे.

यंदा ह्वंदे मातरम्ह गीताला १५० वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यानिमित्त ७ नोव्हेंबर २०२५ पासून ते ७ नोव्हेंबर २०२६ पर्यंत देशभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन होत आहे.

या कार्यक्रमांत सर्वसामान्य नागरिक, विद्यार्थी, शाळा, महाविद्यालये आणि सामाजिक संस्था सक्रिय सहभाग घेणार आहेत. विशेषतः आजच्या तरुण पिढीला या गीताच्या प्रेरणादायी इतिहासाशी जोडण्याचा हा अत्यंत स्तुत्य उपक्रम आहे. या निमित्ताने प्रत्येक भारतीयाने देशसेवेची प्रेरणा घ्यावी आणि मातृभूमीशी एकनिष्ठ राहण्याचा संकल्प करावा.

■ **सौ. प्रिया बागडदेव, छिंदवाडा.**

# बदलत्या ऋतूमध्ये कानाचं इंफेक्शन



जेव्हा हवामान बदलते तेव्हा तापमान आणि हवेतील आर्द्रतेत बदल होतो. यावेळी, कानात बॅक्टेरिया आणि विषाणू त्वरीत वाढतात आणि संसर्गाचा धोका वाढतो. जेव्हा सर्दी, खोकला, फ्लू किंवा अनुनासिक अडथळा येतो तेव्हा कानाच्या आतील दाब बदलतो, ज्यामुळे कान जड होणे किंवा वेदना यासारख्या समस्या उद्भवू शकतात.

सुरुवातीच्या लक्षणांमध्ये कान दुखणे, किंचित भुणभुणणे, ऐकण्याची थोडीशी समस्या आणि कधीकधी सौम्य पाणचट स्त्राव यांचा समावेश असू शकतो. ही समस्या लहान मुले, वृद्ध आणि प्रतिकारशक्ती कमी असणाऱ्यांमध्ये जास्त दिसून येते. जर कानात तीव्र वेदना, चक्कर येणे किंवा खूप जडपणा असेल तर डॉक्टरांना भेटणे आवश्यक आहे.

ऋतू बदलताना केवळ कानातच नव्हे तर कानातही संसर्ग होणे, कान बंद होणे, दाब बदलणे आणि आवाज येणे अशा समस्या उद्भवू शकतात. अनेक वेळा मोठ्याने आवाज ऐकून अस्वस्थ होते . यावेळी, सायनस आणि घशाचा संसर्ग देखील वाढतो, ज्याचा कानावर परिणाम होऊ शकतो. त्याच वेळी, जेव्हा थंड हवा थेट कानात आदळते तेव्हा चिडचिड लवकर वाढते, विशेषतः दुचाकी चालवताना. जर काळजी घेतली नाही तर कानाची समस्या वाढू शकते आणि संसर्ग लवकर पसरू शकतो.

तज्ञांच्या मते, तापमानात अचानक होणाऱ्या बदलांपासून कानाचे संरक्षण करणे ही सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. थंड हवा थेट कानावर येऊ नये, दुचाकी चालवताना कान झाकून घ्या. सर्दी-खोकला हलक्यात घेऊ नये, कारण यामुळे अनेकदा कानात संसर्ग वाढतो.

कान जास्त स्वच्छ करण्याचा प्रयत्न करू नका आणि कापसाची कळी जास्त खोलवर घालू नका, यामुळे चिडचिड वाढू शकते. जर आपल्या डॉक्टरांनी कानात थेंब किंवा औषधे लिहून दिली असतील तर संपूर्ण कोर्स करा. आंघोळ करताना कानात पाणी जाणे टाळावे.

जर वेदना जास्त असेल तर हलके उबदार कॉम्प्रेस, पुरेसे पाणी पिणे आणि विश्रांती घेणे मदत करते. कान ओढणे, अस्वस्थता येणे किंवा मुलांमध्ये वारंवार रडणे हे संसर्गाचे लक्षण असू शकते, त्याकडे दुर्लक्ष करू नका. जर आपल्याला १-२ दिवसात सुधारणा दिसत नसेल किंवा चक्कर येत असेल तर डॉक्टरांना वेळेवर भेटणे महत्वाचे आहे. उपाय म्हणून, कान कोरडे आणि स्वच्छ ठेवणे महत्त्वाचे आहे. वेदना, खाज, पाणी येणे किंवा ऐकण्यात अडचण जाणवल्यास लगेच डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

हिवाळ्याच्या काळात, कानात इन्फेक्शन होण्याचा धोका वाढतो. बॅक्टेरिया आणि विषाणू सहजपणे कानात प्रवेश करू शकतात. कान स्वच्छ करताना कापसाच्या काड्या वापरणे टाळावे, कारण त्या कानातील नैसर्गिक मेण अधिक आत ढकलतात आणि इन्फेक्शनची शक्यता वाढवतात.

■ ■ ■

## अशोकायन

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



### टाळू शकता..!

जशी करणी
तशी भरणी
शाश्वत सत्य
आहे जिवणी ..!

बाभळीचे रोप लावले
तर येणारच त्यास काटे
नको यावयास दुःखाश्रु
भविष्यात डोळ्यावाटे ..!

विचार करुनच
करावी कृती
जीवनी ना येई
पश्चातापाची स्थिती ..!

# दुर्मिळ मेंदू व मणक्याच्या आजाराने ग्रस्त मुलावर यशस्वी शस्त्रक्रिया

## एमजेपीजेवाय योजनेअंतर्गत शालिनीताई मेघे हॉस्पिटलमध्ये बाल न्यूरोसर्जरी क्षेत्रात महत्त्वपूर्ण यश

**नागपूर दि. ०८ नोव्हेंबर :** नागपूरच्या वानाडोंगरी येथील १०२० बेड्सच्या शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर (एसएमएचआरसी) येथे एक गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली. नागपूर येथील मोठा ताजबाग परिसरातील दीड वर्षांच्या मुलाला पाठीत मोठी सूज आणि मेंदूत पाणी साचण्याची समस्या (हायड्रोसेफेलस) होती. त्या मुलावर मेंदू आणि मणक्याची गुंतागुंतीची शस्त्रक्रिया एकाच वेळी यशस्वीपणे करण्यात आली.

त्या मुलाच्या पाठीच्या खालच्या भागात मोठी सूज असल्यामुळे तो पाठीवर झोपूही शकत नव्हता. त्यामुळे त्याला शालिनीताई मेघे रुग्णालयातील बालरोग विभागात दाखल करण्यात आले. सिनियर न्यूरोसर्जन डॉ. परेश कोरडे यांच्या मार्गदर्शनाखाली मुलाची सखोल तपासणी करण्यात आली. तपासणीत त्या मुलाला सॅक्रल मेनिंगोमायलोसील नावाचा मोठा गाठीसारखा विकार असून, त्यासोबत आर्नोल्ड चियारी मॉलफॉर्मेशनमुळे मेंदूत पाणी साचण्याची (हायड्रोसेफेलस) समस्या असल्याचे निदान झाले.

सविस्तर समुपदेशनानंतर मुलाच्या पालकांनी मेंदू आणि मणक्याच्या दोन्ही विकारांवर एकाच वेळी शस्त्रक्रिया करण्यास संमती दिली. उपचार करणाऱ्या डॉक्टरांच्या टीमने शस्त्रक्रियेपूर्वी संभाव्य धोके समजावून सांगितले. यात गुदद्वाराच्या क्षेत्राजवळील भाग असल्याने संसर्ग होण्याची शक्यता, मेंदूतील द्रव (सेरेब्रोस्पाइनल फ्लुइड लिक) गळती, मेंदुज्वर (मेनिंजायटिस) आणि लघवी व शौचावर नियंत्रण न राहणे किंवा पायांमध्ये अशक्तपणा येणे यांसारख्या न्यूरोलॉजिकल समस्या उद्भवू शकतात, अशी माहिती देण्यात आली.

सिनियर न्यूरोसर्जन डॉ. परेश कोरडे आणि असोसिएट न्यूरोसर्जन डॉ. प्रिन्स वर्मा यांच्या मदतीने मोठी मेनिंगोमायलोसील गाठ अत्यंत



कुशलतेने काढण्यात आली. शस्त्रक्रियेच्या वेळी सर्व मज्जातंतू संरचना सुरक्षित ठेवण्यात आल्या आणि रक्तस्रावही खूप कमी झाला. शस्त्रक्रियेनंतर बालक पूर्णपणे ठणठणीत बरा झाला असून आता तो हळूहळू सामान्य आणि निरोगी जीवन जगत आहे.

न्युरो-ॲनेस्थेशिया विभागाच्या प्रमुख डॉ. प्राची कोरडे यांच्या नेतृत्वाखाली शस्त्रक्रियेच्या वेळी अतिशय अचूक आणि सुरळीत ॲनेस्थेशिया व्यवस्थापन करण्यात आले. मेंदूवरील शस्त्रक्रियेसाठी मुलाला पाठीवर झोपवून (सुपाईन पोझिशन) आणि नंतर मणक्यावरील शस्त्रक्रियेसाठी पोटावर झोपवून (प्रोन पोझिशन) शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आली. बालरोग विभागाचे विभागप्रमुख डॉ. सी. बोकाडे आणि बालरोगतज्ज्ञ डॉ. हर्षा यांच्या मार्गदर्शनाखाली उत्कृष्ट समन्वय साधण्यात आला. तसेच, ॲनेस्थेशिया विभागाच्या प्रमुख डॉ. अंजली मोडक आणि संचालक ॲनेस्थेशिया डॉ. प्रतिभा देशमुख यांनी मुलाची काळजी घेण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. बालरोग विभाग आणि ऑपरेशन थिएटर (ओटी) नर्सिंग टीमने शस्त्रक्रियेपूर्व, शस्त्रक्रियेच्या दरम्यान आणि शस्त्रक्रियेनंतरच्या काळात अत्यंत काळजीपूर्वक आणि तज्ज्ञ पद्धतीने सेवा दिली.

डॉ. कोरडे यांनी सांगितले की मेनिंगोमायलोसील सारखा न्युरल ट्यूब आजार गर्भावस्थेदरम्यान मेंदू आणि मणक्याची नळी पूर्णपणे बंद न झाल्यामुळे होतात. त्यांनी पुढे सांगितले की वाढती जनजागृती आणि सुधारित प्रसूतीपूर्व (अँटेनाटल) काळजी यामुळे अशा प्रकरणांची संख्या अलीकडच्या काळात लक्षणीयरीत्या कमी झाली आहे. तसेच त्यांनी रुग्णालयाचे मुख्य वैद्यकीय अधीक्षक डॉ. वसंत गावंडे, शस्त्रक्रिया विभागप्रमुख डॉ. राजीव सोनारकर आणि संपूर्ण रुग्णालय टीमचे सातत्यपूर्ण सहकार्य आणि पाठबळाबद्दल आभार व्यक्त केले.

# द हाउस ऑफ अभिनंदन लोढा (एचओएबीएल) तर्फे फुटाळा तलावावर शानदार हवाई प्रदर्शन

**नागपूर, ८ नोव्हेंबर २०२५:** भारतातील सर्वात मोठी ब्रँडेड प्लॉटेड लँड डेव्हलपर, द हाऊस ऑफ अभिनंदन लोढा (एचओएबीएल) ने अधिकृतपणे ऑरेंज सिटी, नागपूरमध्ये प्रवेश केला आहे. आपल्या ठळक आणि अनुभवात्मक लाँच शैलीशी प्रामाणिक राहून, एचओएबीएल ने फुटाळा तलावावर एका आकर्षक पॅरामोटर प्रदर्शनाद्वारे आपला आगामी प्रकल्प, नागपूर मरीना, जाहीर केला, जो शहरात आणत असलेल्या वॉटरफ्रंट मरीना-प्रेरित जीवनशैलीचा प्रतीकात्मक संकेत आहे. या विकासात ४० हून अधिक जागतिक दर्जाच्या सुविधा असतील आणि विश्रांती, उत्सव व कल्याण यांना प्रोत्साहन देण्यासाठी डिझाइन केलेले आहे, जे वॉटरफ्रंट राहणीमानाचे वैशिष्ट्य असून नागपूरसाठी हे पहिलेच आहे.

४ नोव्हेंबर २०२५ रोजी पॅरामोटर्सचे मोठे हवाई बॅनर घेऊन तीन वैमानिकांनी ब्रँडच्या नागपूरमध्ये प्रवेशाची घोषणा करताना फुटाळा तलाव एका नेत्रदीपक दृश्यासह जिवंत झाला.या क्षणाने नागपूरमध्ये ब्रँडची ओळख करून देण्याचा एचओएबीएल चा अनोखा दृष्टिकोन प्रभावी आणि प्रतीकात्मक अशा प्रकारे प्रतिबिंबित झाला. हे लाँच शहरासाठी, त्याच्या लोकांसाठी आणि ते निर्माण करू




शकतील अशा वारशासाठी एक नवीन सुरुवात असल्याचे प्रतीक आहे.

महाराष्ट्राच्या जीडीपी मध्ये तिसरे सर्वात मोठे योगदान देणारे म्हणून, नागपूर भारताच्या आर्थिक नकाशावर आपले स्थान पुन्हा परिभाषित करत आहे, आधुनिक भारताच्या आकांक्षा आणि गतिमानता प्रतिबिंबित करणारे एक उत्साही केंद्र म्हणून विकसित होत आहे, असे द हाऊस ऑफ अभिनंदन लोढा चे चीफ एक्झिक्यूटिव्ह ऑफिसर समुज्वल घोष म्हणाले. नागपूरमधील आमचा प्रवेश आमच्यासाठी एक नवीन अध्याय आहे. एचओएबीएलच्या सुव्यवस्थित आणि पारदर्शक विकासाच्या वैशिष्ट्यासह, आम्ही विलासिता एक नवीन लाट आणण्याचे उद्दिष्ट ठेवतो -केवळ आकांक्षापूर्णच नाही तर खोलवर अर्थपूर्ण देखील अनुभव निर्माण करणे, जिथे प्रत्येक गुंतवणूक विश्वासावर आधारित असते आणि वारसा म्हणून टिकून राहण्यासाठी डिझाइन केलेली असते.

भारताच्या मध्यभागी धोरणात्मकदृष्ट्या स्थित, नागपूर संधींनी भरलेले शहर बनले आहे, जे त्याच्या समृद्ध नैसर्गिक संपत्तीसह औद्योगिक विकासाचे संतुलन साधते. स्मार्ट सिटी उपक्रमांमध्ये सतत प्रगती आणि समृद्धी महामार्गाद्वारे वाढत्या कनेक्टिव्हिटी-सह, शहर उच्च -गुणवत्तेच्या राहणीमान आणि जीवनशैलीच्या अनुभवांमध्ये वाढ करण्यासाठी सज्ज आहे, जे चैतन्यशील, विकसित आणि शाश्वत ठिकाणे निर्माण करण्याच्या एचओएबीएलच्या विश्वासाचे प्रतिबिंबित करणारे एक लँडस्केप प्रदान करते.

# आयडीबीआय बँके तर्फे विशेष ओटीएस योजनेची घोषणा

## सुगम ऋण भुगतान योजना (सुगम) २

**नागपूर दि. ०८ नोव्हेंबर :** कर्ज वसूलीच्या प्रयत्नांना चालना देण्याच्या उद्देशाने आयडीबीआय बँके तर्फे आज विशेष अशा वन टाईम सेटलमेंट (ओटीएस) स्कीम सुगम ऋण भुगतान योजना (सुगम)-२या योजनेची घोषणा केली. या योजनेत ३१ मार्च २०२२ पर्यंत वर्गीकृत केलेल्या किरकोळ एनपीएचा समावेश आहे, ज्यामध्ये कर्जदारानुसार एकूण मूळ थकबाकी (जीपीओ) रु.५ लाख आणि त्याहून अधिक तसेच रु. ५ कोटीं पर्यंत आहे, जे योजनेत निर्दिष्ट केलेल्या इतर पात्रता निकषांच्या अधीन आहे. या उपक्रमामुळे आपले कर्ज फेडू इच्छिणाऱ्या आणि एनपीए झालेल्या कर्जदारांना त्यांचे कर्ज फेडण्याची संधी मिळून कायदेशीर कार्यवाही पासून वाचणे शक्य होणार आहे.

# एअर इंडिया एक्सप्रेसच्या नेटवर्कमध्ये नागपूरचा समावेश

## दिल्लीअबू धाबी आणि पुणेअबू धाबी अशी नवीन उड्डाणे सुरू

**मुंबई दि. ०८ नोव्हेंबर :** भारतातील पहिली आंतरराष्ट्रीय व्हॅल्यू कॅरिअर एअर इंडिया एक्सप्रेस आपल्या वाढत्या नेटवर्कमध्ये नागपूरचा समावेश करत असल्याची घोषणा केली आहे. गेल्या दोन महिन्यांत एअर इंडिया एक्सप्रेसने ५ नवीन स्टेशनची भर घातली असून, नेटवर्कवरील एकूण गंतव्यस्थानांची संख्या ६० झाली आहे. ०१ डिसेंबर २०२५ पासून एअर इंडिया एक्सप्रेस नागपूर बेंगळुरू दरम्यान दिवसातून दोन उड्डाणे सुरू करणार आहे. या नवीन उड्डाणांसाठी बुकिंग्स एअरलाइनच्या पुरस्कारप्राप्त वेबसाइट ., अधिकृत मोबाइल ॲप आणि प्रमुख बुकिंग प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहेत. नागपूरचा समावेश महाराष्ट्रातील एअर इंडिया एक्सप्रेसची उपस्थिती अधिक मजबूत करतो.

# सोनी सबवर सुरू होत आहे डिटेक्टिव्ह मालिका एकेन बाबू

**मुंबई दि. ०८ नोव्हेंबर :** ८०च्या दशकातील गाजर खाणाऱ्या गुप्तचरापासून ते आजकालच्या मालिकांमधील चाणाक्ष, भावनांची छटा दाखवणाऱ्या डिटेक्टिव्ह्ज पर्यंत गेल्या काही दशकांत भारतीय टेलिव्हिजनवर गुन्ह्याची कोडी सोडविणारे अनेक गुप्तचर येऊन गेले. प्रत्येक दशकात रहस्य पडद्यावर ज्या प्रकारे उलगडते, त्याबाबत वेगळेपण दिसते. आणि आता, ही परंपरा पुढे नेत हिंदी सोनी सब आपल्या प्रेक्षकांसाठी या प्रकारात डिटेक्टिव्ह कॉमेडी एकेन बाबूच्या रूपात एक नवा ट्विस्ट घेऊन येत आहे. या मालिकेच्या केंद्रस्थानी अत्यंत तल्लख डोक्याचा, काहीसा विचित्र बंगाली गुप्तचर एकेन आहे. त्याच्या काहीशा गबाळ्या रूपामागे एक तल्लख मेंदू आहे. ही मुळची बंगाली मालिका असून बंगालमध्ये अत्यंत लोकप्रिय झाली आहे. सोनी सबवर या मालिकेच्या हिंदीत डब केलेल्या आवृत्तीची चाहते वाट बघत आहेत.

ही परंपरा पुढे घेऊन जात एकेन बाबू लवकरच हलक्या-फुलक्या, समस्त कुटुंबासाठी अनुकूल मालिकांबद्दल ओळखल्या जाणाऱ्या सोनी सब वाहिनीवर येत आहे. बंगाली भाषेत आठ यशस्वी सीझन आणि तीन हिट चित्रपट देणारा हा अपारंपरिक डिटेक्टिव्ह देशभरातील हिंदी प्रेक्षकांना रिझवण्यासाठी सज्ज आहे. एकेन बाबू ही एकेन्द्र सेन (बंगाली अभिनेता अनिर्बन चक्रवर्ती द्वारा अभिनीत) या विचित्र, खवैय्या आणि चतुर डिटेक्टिव्हची गोष्ट आहे. त्याच्या अती सामान्य रूपाच्या मागे एक अत्यंत तल्लख मेंदू दडलेला आहे. त्याच्या विशिष्ट सवयी आणि त्याचा गंमतीशीर स्वभाव नेहमीच्या गंभीर स्वरूपाच्या डिटेक्टिव्हच्या प्रतिमेला शह देतो. आपुलकी आणि हुशारीच्या



आवरणात लपेटलेल्या रहस्यांसह एकेन बाबू नक्कीच डिटेक्टिव्ह प्रकारात एक नवीन परिमाण घेऊन येईल आणि हे सिद्ध करून दाखवेल की अतिशय कठीण प्रकरणे सोडवण्यासाठी तुम्हाला ट्रेन्च कोट परिधान करण्याची गरज नाही!

गुन्हेगारी प्रकरणांचा शोध घेणाऱ्या मालिकांचे स्वरूप बदलत असते. सोनी सबवरील एकेन बाबू या विश्वात एक तल्लख आणि गंमतीशीर डोस घेऊन येणार आहे. ही मालिका आपल्याला याची जाणीव देईल की, जगात अनेक क्लू (संकेत) असले तरी, बऱ्याचदा सत्याचा शोध सगळ्यात आधी विचित्र डोक्यांनाच लागतो.

# अदाणी पॉवरला मिळाला बिहारमध्ये २,४०० मेगावॅटचा वीज प्रकल्प

**दिल्ली दि. ०८ नोव्हेंबर :** बिहार सरकारने स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेनंतर २,४०० मेगावॅट क्षमतेच्या भागलपूर (पीरपैंती) तापवीज प्रकल्पाचा करार अदाणी पॉवर लिमिटेडला दिला आहे. या कंपनीने तीन अन्य दावेदारांच्या तुलनेत सर्वात कमी दराची बोली लावली होती, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

निविदा प्रक्रियेतील सूत्रांनी सांगितले की, अदाणी पॉवरने या प्रकल्पासाठी ६.०७५ रुपये प्रति युनिट दराची बोली लावली होती, जी टोरेंट पॉवर, जेएसडब्ल्यू एनर्जी आणि ललितपूर पॉवर जनरेशन यांच्या बोल्यांपेक्षा सर्वात कमी आहे. या दरात ४.१६५ रुपये प्रति युनिटचे स्थिर शुल्क आणि १.९१ रुपये प्रति युनिटचे इंधन शुल्क समाविष्ट आहे.

बिहार सरकारने याला अत्यंत स्पर्धात्मक दर म्हणत सांगितले की, अलीकडे मध्य प्रदेशात अशाच एका प्रकल्पासाठी झालेल्या बोलीत स्थिर शुल्क ४.२२२ ते ४.२९८ रुपये प्रति युनिट इतके राहिले आहे. राज्य सरकारने ही खुली निविदा राज्यातील वाढत्या वीज मागणीची पूर्तता करण्यासाठी काढली होती. अंदाजानुसार, २०३४-३५पर्यंत राज्याची वीज मागणी दुप्पट होऊन १७,००० मेगावॅटहून अधिक होईल.

टोरेंट पॉवरने या प्रकल्पासाठी ६.१४५ रुपये प्रति युनिट, ललितपूर पॉवरने ६.१६५ रुपये प्रति युनिट आणि जेएसडब्ल्यू एनर्जीने ६.२०५ रुपये प्रति युनिट अशी बोली लावली होती. सूत्रांनी सांगितले की सर्व प्रस्तावांचे मूल्यांकन ई-बोलीप्रणालीद्वारे करण्यात आले, जेणेकरून संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक राहील.

या प्रकल्पात सुमारे ३०,००० कोटी रुपयांची गुंतवणूक होण्याची शक्यता आहे, ज्यामुळे राज्यात औद्योगिक क्रियाकलाप आणि रोजगारात लक्षणीय वाढ होईल. मात्र अदाणी समूहाच्या या कंपनीला वीज प्रकल्पाचे वाटप राज्यातील सुरू असलेल्या विधानसभा निवडणुकीच्या प्रक्रियेदरम्यान झाल्याने हा विषय राजकीय वादाचा मुद्दा बनला आहे.

माजी केंद्रीय वीजमंत्री आर. के. सिंह यांनी बिहारमध्ये वीज खरेदीतील घोटाळ्याचे आरोप केले आहेत. विरोधी पक्ष काँग्रेसचे महासचिव के. सी. वेणुगोपाल यांनी सोशल मीडिया मंच एक्सवर एका पोस्टमध्ये म्हटले, अदाणी समूहाला बिहारमध्ये विशेष सवलती दिल्या जात आहेत. सहा रुपये प्रति युनिट दराने वीज खरेदी करणे म्हणजे गरीब आणि मध्यमवर्गीयांच्या पैशांचे मोदींच्या जवळच्या उद्योगपतींच्या खिशात टाकण्यासारखे आहे.

मात्र सूत्रांनी या आरोपांना फेटाळून लावत सांगितले की, ६.०७५ रुपये प्रति युनिटचा दर हा उत्पादन खर्चात झालेल्या अलीकडील वाढीच्या पार्श्वभूमीवरही स्पर्धात्मक आहे आणि अदाणी पॉवरला कोणतीही सवलत देण्यात आलेली नाही.

प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेली जमीन राज्य सरकारच्या मालकीची आहे आणि ती नाममात्र भाड्याने बिहार औद्योगिक गुंतवणूक प्रोत्साहन धोरण, २०२५ अंतर्गत पट्ट्यावर देण्यात आली आहे. प्रकल्पाची मुदत संपल्यानंतर ही जमीन पुन्हा राज्य सरकारकडे परत जाईल. अधिकाऱ्यांनी सांगितले की, अदाणी पॉवरला कोणतीही विशेष सवलत देण्यात आलेली नाही आणि कंपनीलाच या वीज प्रकल्पाचा विकास व संचालन करावे लागेल.

भागलपूर प्रकल्पाची संकल्पना सर्वप्रथम २०१२ मध्ये बिहार राज्य विद्युत उत्पादन कंपनी लिमिटेडने मांडली होती, परंतु पुरेसे गुंतवणूकदार न मिळाल्याने हा प्रकल्प २०२४ मध्ये नव्याने सुरू करण्यात आला.

# जगातील पहिला टेलीसर्जन कन्सोल एसएसआयआय मंत्रासन लाँच

## एसएस इनोव्हेशन्स इंटरनॅशनलने सर्जरीच्या भविष्याला दिला नवा आयाम

**पुणे, ७ नोव्हेंबर २०२५:** आधुनिक सर्जिकल रोबोटिक तंत्रज्ञान विकसित करणारी आणि रोबोटिक सर्जरी सर्वांसाठी परवडणारी व सुलभ बनवण्याच्या दिशेने कार्यरत असलेली एसएस इनोव्हेशन्स इंटरनॅशनल कंपनीने पुन्हा एकदा इनोव्हेशनच्या सीमा ओलांडत जगातील पहिला टेलीसर्जन कन्सोल एसएसआयआय मंत्रासन सादर केला आहे.

मंत्रासन हे जगातील पहिले पूर्णपणे इंटिग्रेटेड, एर्गोनॉमिक आणि पोर्टेबल टेलीसर्जरी कन्सोल आहे, जे रिमोट प्रिसीजनसह रोबोटिक्स क्षेत्रात क्रांती घडवणारे आहे. या कन्सोलमुळे सर्जिकल कौशल्य कोणत्याही तज्ज्ञ सर्जनच्या ऑफिसमधून विस्तारित केले जाऊ शकते, ज्यासाठी पूर्ण ऑपरेटिंग रूमला जोडण्याची गरज राहत नाही. ही रचना सर्जिकल केअरमध्ये महत्त्वपूर्ण ठरते कारण तज्ज्ञ सर्जन आता एक कॉम्पॅक्ट, सेल्फ-कंटेन्ड रोबोटिक सिस्टिमद्वारे दूरवरून ऑपरेशन करू शकतात। विशेष म्हणजे, हा कन्सोल भारतामध्येच डिझाइन आणि तयार करण्यात आला आहे.

लाँचच्या वेळी डॉ. सुधीर श्रीवास्तव, संस्थापक आणि चेअरमन, एसएस इनोव्हेशन्स इंटरनॅशनल म्हणाले, टेलीसर्जन कन्सोलच्या माध्यमातून आम्ही आधुनिक सर्जिकल केअर सर्वांसाठी सुलभ करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. मंत्रासन टीएससीद्वारे आम्ही दाखवून देत आहोत की भारतीय इनोव्हेशन सर्जनच्या कौशल्याला जगातील कोणत्याही कोपऱ्यात पोहोचवू शकते आणि आरोग्यसेवा वितरणात परिवर्तन घडवू शकते. कन्सोलचा आकार लहान असल्यामुळे सर्जन स्वतःच्या ऑफिसमधूनच टेलीसर्जरी करू शकतात। त्यामुळे ऑपरेटिंग रूम किंवा पूर्ण मंत्रा सिस्टिमची आवश्यकता नाही. या कन्सोलचे लहान फूटप्रिंट आणि सेल्फ-कंटेन्ड चेअरमुळे हे अत्यंत उपयुक्त आहे। सर्व इलेक्ट्रॉनिक्स या खुर्चीतच इनबिल्ट आहेत.

## राशीभविष्य

**मेष :** आज, तुम्ही सध्याची व्यावसायिक कामे पूर्ण कराल. भविष्यासाठी बनवलेल्या योजना यशस्वी होतील. एकत्र काम केल्याने नफा मिळण्याची शक्यता आहे. घरात वाद होऊ शकतो.

**वृषभ :** आज तुमचा दैनंदिन दिनक्रम व्यवस्थित ठेवा. जर मालमत्तेशी संबंधित एखादा प्रश्न प्रलंबित असेल तर तो सोडवण्याचा हाच योग्य दिवस आहे. तुम्हाला मोठ्या व्यक्तीकडून मौल्यवान सल्ला देखील मिळेल.

**मिथुन :** आज तुम्हाला एखाद्या कार्यक्रमात किंवा परिषदेत सहभागी होण्याचे आमंत्रण मिळेल. तुमच्या शिक्षण किंवा करिअरशी संबंधित अडथळे दूर होतील. तुमची आर्थिक परिस्थिती पूर्वीपेक्षा चांगली असेल.

**कर्क :** आजचा दिवस तुम्हाला काही काळापासून त्रास देत असलेल्या समस्यांपासून थोडीशी सुटका देईल. तुमचे व्यक्तिमत्व सुधारण्यासाठी तुम्ही केलेल्या प्रयत्नांचे सकारात्मक परिणाम मिळतील. तब्येत चांगली राहील.

**सिंह :** आजचा दिवस तुमच्यासाठी खूप चांगला जाणार आहे. तुमच्या कौटुंबिक जीवनात सुसंवाद वाढेल. तुम्हाला एखादी महत्त्वाची जबाबदारी स्वीकारावी लागू शकते. आर्थिक लाभाच्या संधी निर्माण होतील.

**कन्या :** अनुभवी व्यक्ती तुम्हाला मार्केटिंगच्या कामांमध्ये मदत करतील. तुम्ही दमदार सुरुवात कराल आणि यश मिळवाल. अडकलेली कामं आज नक्की मार्गी लागतील. आर्थिक परिस्थिती मजबूत होईल.

**तुळ :** आज तुम्ही तुमच्या दैनंदिन दिनचर्येत असे बदल कराल जे फायदेशीर ठरतील. तुम्ही तुमच्या कौटुंबिक आणि व्यावसायिक जबाबदाजया उत्साहाने पार पाडाल. तुमची कीर्ती आणि आदर वाढेल.

**वृश्चिक :** बाहेरील लोकांना तुमच्या कुटुंबात हस्तक्षेप करू देऊ नका. एकत्र बसून घरातील सर्व समस्या सोडवण्याचा प्रयत्न करणे चांगले. आज तुमची सामाजिक प्रतिमा देखील सुधारेल.


**धनु :** दैनंदिन कामांमध्ये जास्त वेळ लागू शकतो. व्यवसायात पैसे गुंतवण्यापूर्वी वडिलांचा सल्ला घेणे फायदेशीर ठरेल. वडील त्यांच्या मुलांच्या इच्छा पूर्ण करण्याचा प्रयत्न करतील.

**मकर :** आज तुमच्या वैयक्तिक आणि कौटुंबिक बाबींमध्ये बाहेरील लोकांना हस्तक्षेप करू देऊ नका. कौटुंबिक आणि सामाजिक कार्यात तुमचे स्वत:चे निर्णय प्राधान्याने घ्या.

**कुंभ :** आईकडून आनंदाची बातमी मिळेल, ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल. परदेशात व्यापार करण्याची योजना आखू शकता. ऑफिसातील वाद, लफडी ऑफिसातच मिटवा,नाहीतर प्रकरण वाढू शकतं.

**मीन :** नवीन व्यवसाय सुरू करण्याआधी बाजाराची नीट कल्पना घ्या, अभ्यास करा. मुलांकडून आनंददायी बातमी मिळेल. कामात यश मिळेल आणि कामे वेळेवर पूर्ण होतील. मित्रांसोबत वेळ घालव.

## शब्दकोडे क्रमांक २२६२




**आडवे शब्द :-**
१) अटीच्या करारातील जोडीने येणारे दोन शब्द
४) महिषी
६) सोने
८) योगी, साधना करणारा
१०) रात्र
११) काळ्या तोंडाचे माकड
१३) मनाची फिरणारी इच्छा
१५) मनाचा ओढा
१७) रंग (इं )
१८) सापाची एक जात
१९) स्तुती करणारा
२०) प्रयत्न
२२) अनर्थ, बिकट प्रसंग, अतिरेक
२४) पलंग, माचा, झोपाळा
२५) एक द्विदल धान्य
२६) प्रफुल्लता
२८) पुरुषांच्या नावापुढील राव सारखा एक बहुमानाचा शब्द
३०) मैत्रीण
३१) मांडणे, सजावट
३२) उच्च, श्रेष्ठ
३४) मुलाची किंवा मुलीची मुले
३७) ठराव, निश्चय
३९) धोबी
४०) वर्षानुवर्षे
४३) गाजावाजा
४५) नेत्रसुखद
४८) वाहून नेणे
४९) वाम
५१) काळोख
५३) केसाला पूर्वरंग आणणारा पदार्थ
५५) सारख्या अंतरावर
५६) शोभणारा
५८) वेतन
५९) प्रतिष्ठा, गळ्यामागील अवयव
६२) दिवसाचा चोवीसावा भाग
६३) खवाळ
६५) मुलगा
६७) विद्येचे माहेरघर
६८) मर्कट
६९) ढेकूण
७१) मुसलमान
७३) जास्तीतजास्त
७४) कडक व चिवट
७५) हिंदुस्तान

**उभे शब्द:-**
१) पिता, वडील
२) होडी
३) सिनेमाचा पडदा
५) प्रश्न
६) पराभव
७) लेखणी
८) तात्पर्यार्थ
९) लबाडी, कारस्थान
१२) यमनगरी
१४) हनुमान
१६) चकचकीत
१८) पात्याची तीक्ष्णता घ्राणेंद्रिय
१९) शपथ
२१) आवरणावरील निघालेला छोटा तुकडा
२३) उगाच
२५) निरिच्छ
२७) शूर
२८) पक्ष, दोन आठवडे
२९) बरोबर, सारखा
३२) उद्याच्या नंतरचा दिवस
३३) मातीचा कण, पराग
३५) नमस्कार
३६) एक प्रकारचा अमेरिकन गहू
३८) संताप
४०) तुलनेतील सारखेपणा
४१) दक्षतेचा इशारा
४२) मनाची फिरणारी इच्छा
४४) रानरेडा
४६) नवरा
४७) रुपेरी मुलामा
५०) पुत्र, तनय
५२) आतापावेतो
५३) दगडाचा उडालेला पापुद्रा
५४) माघारी येणे
५५) अगदी सारखे प्रमाण
५७) ढीग
६०) मीठाची चव
६१) गाल
६३) नरमच्या विरुद्ध
६४) आगमन येऊन पोहचलेला
६६) शरीर
६७) हत्तीच्या सोंडेचे अग्र
७०) स्वत:ला
७२) पारंब्या असलेले झाड

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर






देव ही एक व्यक्तिसापेक्ष संकल्पना आहे. कोणी देव मानतो तर कोणी मानत नाही. कोणी दगडाच्या–धातूच्या मूर्तीमध्ये देव शोधतो तर कोणी देवत्वाच्या शोधात माणसांच्या गर्दीत भटकत राहतो. कोणाला निसर्गामध्ये देवाचा शोध घ्यावासा वाटतो तर कोणी कर्मकांडांद्वारे देवाच्या समीप जाऊ इच्छितो. माझ्या मते, श्रद्धा आणि अंधश्रद्धा यातील सीमारेषा अत्यंत पुसट आहे. माझी एखाद्या देवावर श्रद्धा असताना दुसऱ्याची असेलच असं नाही. माझा दर महिन्याचा संकष्टीचा उपवास असतो. कदाचित तो माझ्या बहिणीला पटणार नाही. उपवासाने काय साधतं असं ती म्हणू शकते. आई श्रावणी शुक्रवार करते, पौषातले उपवास करते. हे न करता कोणी मार्गशीर्षातले उपवास महत्त्वाचे मानू शकतं. म्हणजेच कोणी कुठल्या देवाची उपासना करावी, कोणाची आराधना करावी हे प्रत्येकाच्या मतांवर, श्रद्धेवर अथवा अनुभूतीवर अवलंबून असतं. म्हणूनच श्रद्धा हा व्यक्तिसापेक्ष विषय आहे असं मी म्हणते. ही पार्श्वभूमी लक्षात घेतली तर माणसं अंधश्रद्ध आहेत असं आपण सरधोपटपणे म्हणू शकत नाही हे ही लक्षात घ्यायला हवं. श्रद्धा अथवा अंधश्रद्धा हे विषय जटील आहेत, गुंतागुंतीचे आणि बहुपेडी आहेत. हा सरसकट एका नियमात बंदिस्त करता येणारा विषय नाही.

भक्ती विशेष

भक्ती, श्रद्धा या भावना विश्वासावर बेतलेल्या असतात. आपण एखाद्या घटकावर श्रद्धा ठेवतो तेव्हा विश्वास अभिप्रेत असतो. तुम्ही निसर्गावर विश्वास ठेवता, चराचराला कार्यान्वित ठेवणाऱ्या अनामिक शक्तीवर विश्वास ठेवता, पृथ्वीतलावर अथवा आसमंतात एक नैसर्गिक शक्ती आहे यावर विश्वास ठेवता तेव्हाच त्याविषयी मनात श्रद्धा उत्पन्न होते. म्हणूनच श्रद्धा आणि विश्वास या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत असं मला वाटतं. अंधश्रद्धा निर्मुलनाचं काम करणाऱ्या काही मंडळींचा देखील देव नाही, यावर ठाम विश्वास असतो. म्हणूनच हा सगळा विश्वासाचा भाग आहे असं मी म्हणेन. एखादी व्यक्ती कर्मकांडांमध्ये, पूजाअर्चेमध्ये आकंठ बुडालेली असणं हे एक थोतांड आहे असं आपल्याला वाटतं. पण जेजुरीसारखा अवघड गड किंवा वैष्णोदेवीच्या दर्शनासाठी कठीण चढण चढून जाणाऱ्यांच्या चेहऱ्याकडे पाहिलं तर आपण त्याला थोतांड म्हणण्याचं धाडस करु शकत नाही, कारण तिथे निखळ भक्तीच दिसते. अर्थात सध्याच्या काळात देवस्थानांना एखाद्या बाजाराचं रूप आलंय ही बाब अलाहिदा, याला कोणी काही करु शकत नाही. पण लोकांच्या देवाप्रतीच्या श्रद्धेवर, विश्वासावर आक्षेप घेण्याचं कारण नाही. गणपती उत्सवात पावित्र्य कमी होऊन धांगडधिंगा वाढलाय हा त्या शक्तीचा दोष नाही. ती अतिउत्साही आणि निर्बुद्ध माणसांची समस्या आहे. पण याचा अर्थ गणपती उपासना करणारे चुकीचे आहेत असं म्हणता येणार नाही.

सश्रद्ध वातावरणाचे संस्कार असल्यामुळे मी लहानपणापासूनच देव मानणारी आहे. आमच्या घरात गणपतीची पूजा होते, कुलदैवत अंबाबाई आहे. तिची नित्य पूजा होते. आजोबा दत्ताचे उपासक होते. बहीण गजानन महाराजांची भक्त आहे. मी स्वामी समर्थांची उपासक आहे. आई दररोज पोथी वाचते. गुरुचरित्राचं पारायण करते. या सगळ्यामुळे घरात सकारात्मक शक्ती अनुभवायला मिळतात असं मला वाटतं. घरात गणपती बसतो तेव्हा प्रसन्न वातावरणाची निर्मिती होते. चार माणसं येतात. त्यांच्यातील सकारात्मक ऊर्जा आपल्यापर्यंत पोहोचते. अन्यथा, एकमेकांकडे जाण्याचे योग तसे कमीच येतात. एखाद्या दुखद घटनेच्या निमित्ताने सांत्वन करण्यासाठी भेटीगाठींचे योगच तुलनेने जास्त वेळा येतात. पण गणपती, नवरात्र, दिवाळी यासारख्या सणांच्या निमित्ताने पार पडणाऱ्या अर्चनेच्या निमित्ताने लोक भेटतात आणि उत्साह वृद्धिंगत होतो. मी वारंवार या सकारात्मकतेचा अनुभव घेते. आमच्याकडे नवरात्रीत अखंड नंदादीप असतो. त्या निमित्ताने आई घरात थांबते. ती सायंकाळी देवीचे पाठ वाचते, आरती होते. या सगळ्यामुळे काय घडत मला माहीत नाही पण आसपास प्रसन्नता जाणवते हे नाकारुन चालणार नाही. आजूबाजूला देव असल्याची ती जाणीव सुखावणारी आणि आश्वस्त करणारी ठरते.

आम्हा कलाकारांसाठी रंगमंच हा देव आहे.

**चराचरात घडणाऱ्या घडामोडींवर नियंत्रण ठेवणाऱ्या अनामिक शक्तिच्या अस्तित्वावर माझी दृढ श्रद्धा आहे. दैवी शक्ती प्रत्येकाच्या आयुष्यावर परिणाम दाखवत असते. या शक्तीचं साह्य असेल तर अनेक कठीण कामंही सुकर होतात. ही शक्ती कधी संधीच्या तर माणसांच्या रुपात तुमची सोबत करत असते. संकटातून बाहेर काढत असते. म्हणूनच तिचं अधिष्ठान मान्य करायला हवं.**




मग मी तिथे नृत्यासाठी जाईन, अभिनयासाठी जाईन अथवा पुरस्कार प्रदान करण्यासाठी जाईन... नमस्कार केल्याशिवाय रंगमंचाला पाय लावू शकत नाही. मेक अप दादा आमच्यासाठी देवस्वरुप असतात. त्यामुळे मेक अप केल्यावर आम्ही त्यांना नमस्कार करतो. ती रंगदेवता आहे, एक विश्वास आहे ज्यामुळे आपण रंगमंचावर छान दिसणार असल्याची खात्री मिळते. याच विश्वास आणि आदराने आम्ही नृत्यप्रशिक्षकांनाही नमस्कार करतो. हा रिवाज सगळेच पाळतात. शास्त्रीय नृत्य शिकणारे गुरूला वंदन करुनच नृत्य करतात आणि संपल्यावरही वंदन करुनच घुंगरु काढतात. नृत्याच्या अन्य प्रकारांमध्येही हा रिवाज पाळला जातो. कारण गुरू शिष्यांसाठी देवतास्वरुप असतो. दिवसातला पहिला शॉट देते तेव्हा मी कॅमेऱ्याला नमस्कार करते. ही आपल्या संस्कृतीची महती आहे की आपल्याला असे संस्कार मिळाले आहेत. कृपा करणाऱ्या, सक्षम बनवणाऱ्या प्रत्येक घटकाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी या संस्कृतीनेच आपल्याला दिली आहे. आपल्याकडे प्रत्येकाबाबत आदर व्यक्त करण्यासाठी विशिष्ट दिवसांचं प्रयोजन आहे. व्यासपौर्णिमा गुरूला समर्पित आहे. पिठोरी अमावस्या मातृदिन आहे. बैलपोळा हा बैल या प्राण्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. हे दिवस साजरे करण्यामागील भावना खूप सुंदर आहे.

माझ्यासाठी देव ही अशी शक्ती आहे जी कायम आसपास असते. ती कधी माणसाच्या स्वरुपात भेटते तर कधी चांगल्या संधीच्या स्वरुपात... वाईट काळात चांगली माणसं सोबत असणं हा देवाचा आशीर्वादच असतो. बुद्धीरुपानेही देव आपल्यावर वरदहस्त ठेवत असतो. माझं भाषेवर प्रभुत्व आहे. भाषेचा अभ्यास केलाय, भरपूर वाचते, योग्य वेळी योग्य तेच बोलते, नेमकेपणाने आणि नेटकेपणाने बोलते. हीदेखील एक शक्ती आहे, असं मला वाटतं. ही सकारात्मक शक्ती कायमच आपल्याबरोबर असते. कधी पुढच्या अथवा मागच्या गाडीला अपघात होतो आणि आपण सुखरुप बचावतो तेव्हा हीच शक्ती कवच बनून आपलं संरक्षण करत असते अशी माझी श्रद्धा आहे. बाबा अचानक गेले. तेव्हा मी शूट करत होते. त्यावेळी या शक्तीला माझी परीक्षा बघायची होती. अशा वेळी कवी चंद्रशेखर गोखले यांचं एक वाक्य मला खूप पटलं. ते म्हणतात, आपल्याला सोसेल एवढंच दु:ख देव देत असतो. ही इतकं सोसू शकते, ही इतकं भोगू शकते अथवा ही इतका आनंद व्यक्त करु शकते हे माहीत असल्यामुळे आपल्याला तेवढंच मिळतं. मध्यंतरीच मी क्रिकेटपटू युवराज सिंगचं आत्मचरित्र वाचलं. त्यात तो म्हणतो, मी कधीच विधात्याला प्रश्न केला नाही की मला कॅन्सर का झाला? त्याच्या या विधानातून खूप काही शिकण्यासारखं आहे. देवाला प्रश्न विचारण्याच्या भानगडीत कधीच पडू नये. नियतीने, देवाने, शक्तीने प्रत्येकासाठी काही तरी लिहून ठेवलं आहे. हे प्राक्तन कायम आपल्याबरोबर असतं. त्यामुळे कर्म करत रहावं आणि बाकी सगळं त्याच्यावर सोडावं.


माझा ज्योतिषशास्त्रावर, वास्तुशास्त्रावर विश्वास आहे. या दोन्ही शास्त्रांचा थोडाबहुत अभ्यासही केला आहे. एका मर्यादेपर्यंत मी यातील सूचनांचा आणि नियमांचा अवलंबही करते. पण कुठे थांबायचं हे मला कळतं. दररोज घरात कापूर जाळ, असं कोणी सांगितलं तर मी नक्कीच करेन. कारण त्यामुळे काहीही बिघडणार नाही पण, घराच्या रचनेत आमुलाग्र बदल करण्यास कोणी सांगितलं तर मी निश्चितच ऐकणार नाही. ही सीमारेषा प्रत्येकाने ठरवायला हवी. दररोज सकाळी ठराविक स्तोत्र म्हणणं ही माझी सवय आहे. यामुळे तोंडात देवाचं नाव येतंच शिवाय वाणी शुद्ध होते, जीभेला वळण लागतं आणि मेंदू तल्लख राहतो. भक्तीबरोबरच हे लाभही मला महत्त्वाचे वाटतात.

सरतेशेवटी सगळं आपल्या समजुतीवर आहे. देव कोणत्याही रुपात आपल्या साह्यासाठी धावून येत असतो. त्याचं स्वागत करायला हवं. माझ्या आयुष्यात एक काळ अत्यंत तणावाचा होता. वैवाहिक आयुष्य मोडू घातलं होतं. घटस्फोटासाठी अर्ज दाखल झाला होता. दुसरीकडे करिअरमध्येही अस्थिरता होती. त्या काळातच भाचीचा जन्म झाला आणि त्या इवल्याशा जीवाच्या आगमनाने माझ्यासह घरातील सर्वांना ताणाचा विसर पडला. मरगळ, नैराश्य दूर झालं आणि घरात नवचैतन्य पसरलं. वडिलांचं अचानक निधन झालं तेव्हा याच चिमुरडीनं माझ्या आईला, मला आपल्या बोबड्या बोलांनी रिझवलं. स्वत:कडे खेचून घेत दु:खाचा विसर पाडला. तिच्या रुपानं देवच माझ्या मदतीला आला होता. म्हणूनच मी त्याच्या साथीचा आदर राखते, त्याचं अधिष्ठान मनापासून स्विकारते.

**भार्गवी चिरमुले, अभिनेत्री**

## करावे आत्मनिवेदन

नवविधा भक्तीमधली अखेरची भक्ती म्हणजे आत्मनिवेदन भक्ती. समर्थ रामदासस्वामी या भक्तीचं वर्णन करतात. ते म्हणतात, नवमी निवेदन जाणावे। आत्मनिवेदन करावे। तेहिं सांगिजेल स्वभावे। प्रांजळ करूनि।।२।। ऐका निवेदनाचे लक्षण। देवासि वाहावे आपण। करावें तत्त्वविवरण। म्हणिजे कळे।।३।। मी भक्त ऐसे म्हणावें आणी विभक्तपणेचि भजावें। हे अवघेचि जाणावें। विलक्षण।।४।। लक्षण असोन विलक्षण। ज्ञान असोन अज्ञान। भक्त असोन विभक्तपण ते हे ऐसे।। ५।।



म्हणजे नवव्या भक्तीला निवेदन भक्ती म्हणतात. यात आत्मनिवेदन करायचं असतं. ते कसं करायचं हे स्वाभाविक रितीने मी स्पष्ट करून सांगतो. निवेदनाची लक्षणं सांगतो ती ऐका. यात आपण स्वत:स देवाला अर्पण करायला हवं. ते कसं करायचं हे तत्त्वविवरणानं कळतं. 'मी भक्त' असं म्हणायचं आणि विभक्तपणे देवाला भजायचं हे सर्वथा अयोग्य आहे. लक्षण असून लक्षणहीन म्हणावं, ज्ञान असून अज्ञानी म्हणावं आणि भक्त असून विभक्तपणे रहावं हे सगळं विलक्षण आणि विपरीत आहे.

दासबोधातून...

समर्थ पुढे म्हणतात,

भक्त म्हणजे विभक्त नव्हें। आणी विभक्त म्हणजे भक्त नव्हे। विचारेविण काहींच नव्हे। समाधान।।६।। तस्मात विचार करावा। देव कोण तो वोळखावा। आपला आपण शोध घ्यावा अंतर्यामी।।७।। मी कोण ऐसा निवाडा। पाहों जाता तत्त्वझाडा। विचार करितां उघडा। आपण नाही।।८।। याचा अर्थ असा की, जे विभक्त नाहीत त्यांना भक्त म्हणता येईल. जो विभक्त आहे तो भक्त असू शकत नाही. या विरोधाभासाचं समाधान विचाराशिवाय होणार नाही. म्हणूनच साधकाने विचार करावा. देव कोणाला म्हणायचं ते ओळखावं आणि मी कोण याचा शोध आपणच आपला घ्यावा. यासाठी अंतर्मुख व्हायला हवं. मी कोण याचा निवडा करू लागल्यावर, एकेका तत्त्वाचा विचार करू लागल्यावर शेवटी प्रकृतीचाही विचार होतो आणि मी म्हणून कोणी उरतच नाही.

## रहस्य पुनर्जन्माचं

हिंदू धर्मात पुनर्जन्माला मान्यता आहे. ८४ लक्ष योनींमधून फिरल्यानंतर मनुष्यजन्म मिळतो, असं म्हटलं जातं. मनुष्याचा पुढचा जन्म कर्मावर आधारित असतो असं म्हणतात. कर्मानुसार मनुष्याला कोणता जन्म मिळणार, याबाबतचं वर्णन धर्मग्रंथांमध्ये आढळतं. पुनर्जन्माविषयी धर्मग्रंथांमध्ये काय सांगितलं आहे याविषयी...





* महाभारतातल्या वनपर्वात प्रयोगैर्देवत्वं व्यामिश्रैर्मानुषो भवेत। असं नमूद करण्यात आलं आहे. याचा अर्थ असा की, मनुष्याने चांगली कर्म केली तर त्याला देवयोनी प्राप्त होते. मनुष्याने पाप आणि पुण्य सम प्रमाणात केली असतील तर त्याला पुढचा जन्म मनुष्याचाच मिळतो.

* योनिमन्ये प्रपघन्ते शरीरत्वाय देहिन:। स्थाणुमन्येनुसंयन्ति यथाकर्म यथाश्रूतम।। असं कठोपनिषदात नमूद करण्यात आलं आहे. याचा अर्थ असा की, पृथ्वीवरच्या प्रत्येक जीवाला त्याच्या ज्ञान आणि कर्मानुसार विविध योनींमध्ये जन्म मिळतो. याच आधारावर काहींना पुनर्जन्म मिळतो तर काहींना मोक्षप्राप्ती होते.

* क्लेशमूल: कर्माशयो दृष्टादृष्ट जन्मनेदनीय:। सतिमूले तदिपाको जात्यामुर्भोगा:। असं पतंजली योगसूत्रात नमूद करण्यात आलं आहे. याचा अर्थ असा की,

धर्मग्रंथातून...


एखाद्या व्यक्तीची पूर्वकर्म चांगली असतील तर त्याला पुढच्या जन्मात उत्तम योनी, आयुष्य आणि योगाची प्राप्ती होते. मनुष्याने शरीर त्यागल्यानंतर त्याचं ज्ञान आणि कर्म सोबत जातं. याच आधारावर त्याला पुढचा जन्म मिळतो.

* एहिकं प्रोक्त नं वापि कर्म यदचित्तं स्फुरन। पौरूषोसो परो यत्नो कदाचन निष्फल:। असं योगवषिष्ठांमध्ये नमूद करण्यात आलं आहे. याचा अर्थ असा की, कोणत्याही माणसाला आधीच्या तसंच या जन्मातल्या कर्मांची फळं मिळतात. कोणत्याही जन्मातली कर्म वाया जात नाहीत.

* यं यं वापि स्मरन्भावं त्यजत्यन्ते कलेवरम। तं तमेवैति कौन्तेय सदा तद्भाव भावित:। असं गीतेत नमूद करण्यात आलं आहे. याचा अर्थ असा की, मृत्यूसमयी माणूस मनात असणाऱ्या सुप्त इच्छा आणि आकांक्षांचं स्मरण करत असतो. मनातल्या गोष्टींचं स्मरण तो करतो. मृत्यूसमयी त्याच्या मनात जो भाव असतो त्याची प्राप्ती त्याला पुढच्या जन्मात होते.

## यशप्राप्तीचा सोपान

प्रयत्नांती परमेश्वर असं म्हटलं जातं. अपयश ही यशाची पहिली पायरी असते. त्यामुळे अपयशाने निराश होण्याचं कारण नाही. इतरांनी केलेले प्रयत्न अयशस्वी ठरले तरी त्यातून आपल्याला काही गवसू शकतं. नव्या कल्पना मिळू शकतात. आयुष्यात यशस्वी होण्यासाठी नेमकं काय करायला हवं याविषयी...



स्वसाह्य

* मनातल्या विचारांना मूर्त स्वरूप देण्याचा प्रयत्न करा. तुमच्या प्रयत्नांना यश आलं नाही तरी घाबरू नका. यातूनच तुम्हाला नव्या गोष्टी कळतील. * ज्ञान वाढवण्याचा प्रयत्न करा. नव्या गोष्टी शिका. आपल्या आवडीच्या क्षेत्राबद्दल ज्ञान मिळवण्यासाठी भरपूर वाचन करा. नव्या माणसांना भेटा. त्यांचे विचार जाणून घेण्याचा प्रयत्न करा.

* नव्या गोष्टींच्या निर्मितीचा विचार करा. काहीतरी नवं पाहिलं की आपण उपभोग घेण्याचा विचार करू लागतो. त्याऐवजी नवनिर्मितीचा विचार करा.

* मोठी स्वप्नं बघा. व्यवसाय करत असाल तर मोठं उद्दिष्ट समोर ठेवा. नोकरीत वरचं पद मिळवण्यासाठी प्रयत्न करा. मनात मोठा विचार बाळगा.

* छोट्या–छोट्या प्रश्नांकडे लक्ष द्या. या समस्या सोडवण्याचा प्रयत्न करा. यातूनच तुम्हाला नवं काही सुचत जाईल.

* इतरांच्या प्रयत्नातून शिका. त्यांना अपयश आलं म्हणजे तुम्हाला येईल असं नाही.

## काय ठेऊ नये जमिनीवर?

हिंदू धर्मातल्या विविध ग्रंथांमध्ये पुराणांचं मोठं महत्त्व आहे. विविध पुराणांपैकी एक म्हणजे ब्रह्मवैवर्त पुराण. हे दहावं पुराण मानलं जातं. यात श्रीकृष्णाच्या विविध लीलांचं वर्णन करण्यात आलं आहे. या पुराणाचे चार खंड आहेत. ब्रह्म, प्रकृती, श्रीकृष्ण जन्म आणि गणेश असे हे चार खंड होत. या पुराणाच्या पहिल्या खंडात पूजनासंबंधीचे काही नियम नमूद करण्यात आले आहेत. पूजनसामुग्रीतल्या काही वस्तू थेट जमिनीवर ठेऊ नये, असंही यात नमूद करण्यात आलं आहे. याबाबत जाणून घेऊ या...



* दिवा किंवा निरंजन थेट जमिनीवर ठेऊ नये. दिवा जमिनीवर ठेवल्याने घरात नकारात्मक शक्तींचा वास राहतो, असं यात नमूद करण्यात आलं आहे. निरंजन किंवा दिवा थेट जमिनीवर न ठेवता तांदळाच्या दाण्यावर ठेवणं योग्य ठरतं.

* पूजनात सुपारीचंही विशेष महत्त्व असतं. देवाला पान आणि सुपारी अर्पण केली जाते. ही सुपारी थेट जमिनीवर ठेऊ नये. सुपारी एखाद्या नाण्यावर ठेवावी.

* आपल्या देव्हाऱ्यात शाळीग्राम असतो. हा शाळीग्राम विष्णूचा अवतार मानला जातो. शैव आणि वैष्णव अशा दोन्ही पंथाचे लोक शाळीग्रामाची पूजा करतात. शाळीग्राम थेट जमिनीवर ठेऊ नये. जमिनीवर पांढऱ्या रंगाचं रेशमी कापड अंथरून त्यावर शाळीग्राम ठेवावा.

* जानवं किंवा यज्ञोपवित जमिनीवर ठेऊ नये. हिंदू धर्मात चार आश्रमांचं वर्णन करण्यात आलं आहे. ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ आणि संन्यास असे हे चार आश्रम होत. ब्रह्मचर्य आश्रमात बालकाची मुंज करून त्याला जानवं घातलं जातं. त्यानंतर त्याला गुरूकडे विद्यार्जनासाठी पाठवलं जाण्याची प्रथा पूर्वीच्या काळी होती. विवाहित पुरुषांच्या गळ्यातही जानवं असतं. कोणत्याही शुभकार्याला जानवं घालण्याचा संकेत आहे. या जानव्याचा

जाणून घ्या

वापर पूजनादरम्यानही केला जातो. जानवं जमिनीवर न ठेवता स्वच्छ कापडावर ठेवावं असं धर्मग्रंथामध्ये सांगितलं आहे. हा नियमही पाळावा.

## परमेश्वरावर हवा अढळ विश्वास

परमेश्वर आपल्याला भरभरून देत असतो. देवाने आपल्या प्रत्येकासाठी काही ना काही ठरवून ठेवलेलं असतं. अर्थात सगळ्याची वेळ यावी लागते. सगळं काही परमेश्वरावर सोडलं की आपल्या साऱ्या चिंता तो वाहतो. अपेक्षांपेक्षाही बरंच जास्त तो आपल्याला देतो. एक कथेच्या माध्यमातून आपण हे समजून घेऊया...

एकदा एक राजा प्रजेची विचारपूस करण्यासाठी नगरात फिरत होता. चालता चालता त्याच्या अंगरख्याचं बटण तुटतं. तुटलेलं बटण लावून घेण्यासाठी शिंप्याचा शोध घे, असा आदेश तो प्रधानाला देतो. गावात एकच शिंपी असल्याचं प्रधानाला कळतं. या शिंप्याला राजवाड्यात बोलावण्यात येतं. तू हे बटण लावून देशील का, असं राजा शिंप्याला विचारतो. शिंपी होकार देतो आणि पटकन



बटण लावून देतो. याचे किती पैसे घेणार असं विचारल्यावर शिंपी थोडा विचार करतो. हे खूप छोटसं काम होतं त्यामुळे राहू द्या, असं तो सांगतो. पण राजा ऐकत नाही. किती पैसे घेणार ते सांग, असं राजा म्हणतो. दोन रूपये घ्यावे, असा विचार शिंपी करतो. जुन्या काळात दोन रूपये खूप जास्त समजले जायचे. आपण राजाकडून दोन रूपये घेतो म्हणजे प्रजेकडून किती घेत असू, असं राजाला वाटेल आणि तो आपल्याला शिक्षा देईल असा विचार करून तुम्हाला जे योग्य वाटेल ते द्या, असं तो राजाला सांगतो.

मग राजा प्रधानाला या शिंप्याला दोन गावं भेट देण्याचा आदेश देतो. शिंप्याला अपेक्षेपेक्षा खूप जास्त मिळतं. असंच आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यात घडत असतं. त्यामुळे सगळं काही परमेश्वरावर सोडायला हवं. आपल्यासाठी योग्य आहे ते तो

आत्मबोध

करणारच यावर दृढ विश्वास असायला हवा. परमेश्वरावरचा अटळ विश्वास आपल्याला बरंच काही देऊन जातो हे नेहमी लक्षात ठेवावं.

## इंडोनेशियातील प्रम्बानन मंदिर

जगभरात भगवान शंकराची अनेक मंदिरं आहेत. इंडोनेशियातल्या जावामध्येही शंकराचं असंच एक सुंदर आणि भव्य मंदिर आहे. अत्यंत प्राचीन असं हे मंदिर दहाव्या शतकात बांधण्यात आलं. प्रम्बानन मंदिर या नावाने ते ओळखलं जातं. हे मंदिर शंकराचं असलं तरी इथे देवी दुर्गेचंही एक रूप आहे. दुर्गा देवी इथे कशी आली, याबाबत एक आख्यायिका सांगितली जाते. आज या मंदिराविषयी आणि आख्यायिकेविषयी जाणून घेऊ या...

आख्यायिका अशी की, प्राचीन काळी जावावर प्रबू बका नावाच्या दैत्याचं राज्य होतं. या राजाला रोरो जोग्गरंग नावाची खूप सुंदर मुलगी होती. बाडुंग बोंडोवोसो नावाच्या व्यक्तीला रोरोशी लग्न करायचं होतं. पण रोरोला त्याच्याशी लग्न करायचं नव्हतं. बाडुंगचा लग्नाचा प्रस्ताव नाकारण्यासाठी रोरोने त्याला एक अट घातली. एका रात्रीत एक हजार मूर्ती घडवल्या तरच मी तुझ्याशी लग्न करेन, असं तिने सांगितलं. ही अट पूर्ण करण्यासाठी बाडुंग तयारीला लागला. त्याने ९९९ मूर्ती घडवल्या. आता त्याने शेवटची मूर्ती घडवायला घेतली होती. ही बातमी रोरोपर्यंत पोहोचली. यामुळे बावरलेल्या रोरोने शहरातल्या भातशेतीला आग लावली. यामुळे दाही दिशा उजळल्या.



तीर्थक्षेत्र

सकाळ झाली असं वाटून बाडुंगने काम थांबवलं. पण सत्य परिस्थिती कळल्यानंतर त्याला खूप राग आला आणि तू अखेरची मूर्ती बनशील, असा शाप त्याने रोरोला दिला. त्यामुळे या मंदिरात रोरो जोग्गरंग मूर्तीरूपात विराजमान असल्याचं मानलं जातं. रोरोला दुर्गेचं रूप मानलं जातं. रोरो जोग्गरंग मंदिर म्हणूनही या मंदिराची ख्याती आहे. हिंदू धर्मीयांसोबत स्थानिक लोकही इथे येतात.

प्रम्बानन मंदिरात शंकरासोबतच ब्रह्म आणि विष्णू या देवतांची मंदिरंही आहेत. मुख्य मंदिराच्या समोर म्हणजे पश्चिम दिशेला या देवतांच्या वाहनांची मंदिरं आहेत. यासोबत इतर काही देवतांची मंदिरंही आहेत. प्रम्बानन मंदिरातलं शिवाचं मंदिर खूप मोठं आहे. या मंदिराचे चार भाग आहेत. एका भागात शंकराची मोठी मूर्ती आहे तर इतर भागांमध्ये अनुक्रमे शंकराचा शिष्य अगस्त्य, पार्वती आणि गणपतीची मूर्ती आहे. या मंदिराच्या उत्तरेला विष्णूचं तर दक्षिणेला ब्रह्मदेवाचं मंदिर आहे. मंदिरावर सुरेख कोरीव काम आहे. भिंतींवर रामायणातल्या कथा मूर्तीरूपात साकारण्यात आल्या आहेत.

## खासदार सांस्कृतिक महोत्सवात ५० हजाराहून अधिक विद्यार्थ्यांचा

# सामुहिक गीता पठणाचा विश्वविक्रम

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीच्या जागर भक्तीचा या आध्यात्मिक उपक्रमांतर्गत गीता परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित गीता पठण कार्यक्रमाने नागपूरच्या भूमीवर शनिवारी ऐतिहासिक विश्वविक्रम प्रस्थापित केला.

३०२ शाळांमधील ५ वी ते १२ वीच्या तब्बल ५२,५५९ विद्यार्थ्यांनी एकत्र येत भगवद्गीतेचे १२ वा, १५वा आणि १६वा अध्याय एकाच सुरात पठण केले. हा सामूहिक पठण सोहळा वर्ल्ड रेकॉर्ड बुक ऑफ इंडिया, इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स या तीन संस्थांनी अधिकृतरित्या नोंदवला.

ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या पटांगणावर झालेल्या या उपक्रमाला गीता परिवारचे संस्थापक अध्यक्ष श्रीराम जन्मभूमी न्यासाचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेव गिरी महाराज, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, संस्कार भारतीच्या अध्यक्ष कांचनताई गडकरी, आमदार प्रवीण दटके, गीता परिवारचे राष्ट्रीय अध्यक्ष संजय मालपानी व आंतरराष्ट्रीय कार्याध्यक्ष आशू गोयल, खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीचे अध्यक्ष प्रा. अनिल सोले व संयोजक रेणु अग्रवाल यांची उपस्थिती होती.

गीतेचे अर्थ, उच्चार आणि तत्त्वज्ञान विद्यार्थ्यांना शिकवणारे श्रीनिवास वर्णेकर व वंदना वर्णेकर यांचा नितीन गडकरी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. वर्ल्ड रेकॉर्ड बुक ऑफ इंडियाचे ॲडज्युरिकेटर संजय व सुषमा नार्वेकर, इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स ॲडज्युरिकेटर मनोज तत्ववादी यांची उपस्थिती होती.

दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. मंचावर असलेल्या विद्यार्थ्यांनी गीता पठणाला सुरुवात केली. त्यांच्या सुरात पटांगणावर असलेल्या हजारो विद्यार्थ्यांनी सुर मिळसले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रेणुका देशकर यांनी केले. खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीच्या सर्व पदाधिकारी या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.



### हा अभिमानाचा क्षण : गडकरी

गीता पठणाचा हा विश्वविक्रमाचा क्षण आनंद आणि अभिमानाचा आहे. भगवद्गीता जीवनाचे तत्वज्ञान आहे. लहान मुलांवर गीता पठणातून उत्तम संस्कार व्हावे, जीवन जगयाचा योग्य मार्गावर जाण्याची प्रेरणा मिळावी, हा उद्देश आहे. मागील वर्षी वंदेमातरम व मनाचे श्लोकचा विक्रम झाल्यानंतर या वर्षीचा हा ऐतिहासिक सोहळा खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीचा उपक्रम सर्वांना प्रेरणा देईल.



देशाला जागे करायचे असेल तर प्रत्येक भागात असे उपक्रम राबवले पाहिजे, असे म्हणत स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांनी नितीन गडकरी यांचे या यशस्वी उपक्रमाकरिता अभिनंदन केले. भगवद्गीता ही जीवनाची मार्गदर्शिका असून प्रत्येकाने तिचा अवलंब



केल्यास उत्तम, सफल, सार्थक आणि योग्य व्यक्ती घडतील. जगातील सर्व ग्रंथाचे सार या ग्रंथात आहे, असे म्हणत महाराजांनी या उपक्रमात इतक्या मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी झाल्याबद्दल त्यांनी सर्वांचे अभिनंदन केले.

### वंदे मातरम्‌चाही जागर

वंदे मातरम् या राष्ट्रीय गीताला १५० वर्ष पूर्ण झाल्यानिमित्ताने देशभरात हजारोंच्या संख्येने सामूहिक गायनाचे कार्यक्रम होत असून त्याच अनुषंगाने गीता पठण कार्यक्रमानंतर ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या पटांगणावर एकत्रित आलेल्या हजारो विद्यार्थ्यांनी एकाचवेळी एक सुरात वंदे मातरम्‌चा जागर केला.

### : क्षणचित्रे :

- ■ सकाळी ५.३० वाजेपासून विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी कार्यक्रमस्थळी येण्यास सुरुवात केली.
- ■ आजुबाजुच्या परिसरातील २९ शाळांची सुमारे ५ हजार विद्यार्थी पायी कार्यक्रमस्थळी पोहोचले.
- ■ कुही येथून ३ हजार विद्यार्थी सहभागी झाले होते.
- ■ ईश्वर देशमुख पटांगणाव्यतिरिक्त शहरातील ७ शाळांमध्ये हजारोच्या संख्येने ऑनलाईन माध्यमातून या उपक्रमाची जोडले गेले.
- ■ दृष्टिहीन, मतिमंद, आश्रमशाळा, ग्रामीण, आदिवासी भागातील विद्यार्थी या उपक्रमात सहभागी

## भूखंड घोटाळ्यांचा पाडाव!

### जमीन व्यवहारांची श्वेतपत्रिका काढा हर्षवर्धन सपकाळांची मागणी



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ८ :

राज्यातील सत्ताधाऱ्यांनी बेशरमपणाचा कळस गाठला असून, रोज नव्या भ्रष्टाचाराच्या बातम्या समोर येत आहेत, परंतु कारवाई मात्र शून्यच आहे, असा स्फोटक आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला. त्यांनी थेट मागणी केली ह्लमुंबई, पुणेसह राज्यभरातील कोट्यवधी रुपयांचे जमीन व्यवहार उघड झाले आहेत, त्यामुळे या सर्व भूखंड घोटाळ्यांची श्वेतपत्रिका तातडीने काढा आणि येत्या हिवाळी अधिवेशनात एक दिवस संपूर्ण चर्चा घडवा!

सपकाळ म्हणाले की, मंत्रालयातच दलालांचे सूत्रधार बसले असून, हे सर्व जमीन व्यवहार सामूहिक गुन्हेगारीचे कृत्य आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा मुलगा पार्थ पवार यांनी पुण्यातील ४० एकर महार वतनाची जमीन तब्बल ३०० कोटी रुपयांना खरेदी केली, पण मुद्रांक शुल्क फक्त ५०० रुपये भरले! त्या जमिनीवर आयटी पार्कचा प्रस्ताव तातडीने मंजूर झाला आणि दस्तावेजांमध्ये मोठ्या प्रमाणात फेरफार करण्यात आला, असा आरोप त्यांनी केला.

आता सांगितले जात आहे की जमीन खरेदी व्यवहार रद्द केला – म्हणजे चोरी मान्य केली, पण गुन्हा दाखल का नाही? एफआयआरमध्ये पार्थ पवारांचे नाव का नाही? त्या व्यवहारासाठी पैसा आला कुठून? एका साखर कारखान्यातून तो पैसा कसा आणि कोणी दिला? असे प्रश्न सपकाळांनी उपस्थित केले.

ते पुढे म्हणाले, अमेडिया कंपनीने याआधीच बोपोडीतील ?ग्रीकल्चर डेअरीची सरकारी जमीन बोगस कागदपत्रांद्वारे हडपली होती. आता ही दुसरी कारवाई म्हणजे चौकशी समिती नेमून धुळफेक करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. सपकाळांनी भाजप नेत्यांवरही घणाघाती आरोप केले केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी पुण्यात जैन बोर्डिंगची जमीन लाटली, ते प्रकरण अजून संपलेले नाही. धर्मादाय आयुक्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नातेवाईक असून त्यांच्यावर कोणती कारवाई झाली? मुंबईत अदानीला शेकडो एकर जमीन फुकट दिली, भाजपच्या कार्यालयासाठी सरकारी जमीन बळकावली, मोहित कंभोजला एसआरए जमीन वाटली हीच का विकासाची नवी व्याख्या?

पुण्यात रिंगरोडच्या अधिग्रहणात, समृद्धी महामार्गात आणि सरकारी जमिनींच्या वाटपात कोट्यवधींचा खेळ झाला आहे. समृद्धी महामार्गात नेमकी कोणाची समृद्धी झाली? असा सवाल करत त्यांनी या सर्व व्यवहारांवर सखोल चौकशीची मागणी केली. संघाच्या शाखेत कधीच वंदे मातरम् गायले गेले नाही, आणि आज मात्र ते राजकीय हेतूने वापरले जात आहे, असे ते म्हणाले.